३) औरंगाबाद महानगरपालिकेने त्यांच्या दायित्व चा भंग केल्यास ( कलम १०.२.(अ) व कलम १०.२.(आ) ह्या कलमाखालील किंवा कालमर्यादेचा भंग ह्यामध्ये समाविष्ट )

४) कलम ५.९(अ) नुसार सवलतधारकाच्या दायित्वा चे औरंगाबाद महानगरपालिकेने अधित्यजन केल्यास,

तर औरंगाबाद महानगरपालिकेने त्यांच्या पूर्वअटींची पूर्तता केली असल्यास, औरंगाबाद महानगरपालिकेस

अ) सवलतधारकाला त्याच्या पूर्वअटींची पूर्तता करण्यासाठीच्या वेळेची मर्यादा वाढवून देणे व झालेल्या विलंबाकरिता बोलीच्या प्रतीभूतीची प्रती आठवडा अथवा त्याच्या भागात १% (एक टक्का ) ह्या दराने वटविणे

आ) विनाविलंब कराराची समाप्ती करून संपूर्ण बोलीची प्रतिभूती समायोजित करणे

ह्यापैकी एका गोष्टीची निवड करण्याचा हक्क असेल.

इ) जर सवलतधारकाने वरील (अ) मधील वाढीव वेळेच्या मर्यादेत सुद्धा जर पूर्वअटींची पूर्तता केली नाही व औरंगाबाद महानगरपालिकेने आपल्या पूर्वअटींची पूर्तता केली

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



असेल, तर हा करार समाप्त करण्याचा व बोली प्रतीभूतीतील शिल्लक रक्कम वटविण्याचा अधिकार औरंगाबाद महानगरपालिकेस असेल.

**५.८ औरंगाबाद महानगरपालिकेने पूर्वअटींची पूर्तता न केल्यास**

अ) जर खालील उल्लेखित कारणे वगळता औरंगाबाद महानगरपालिकेने करारावर सह्या झाल्यावर ६ (सहा) महिन्यांच्या आत पुर्वदाखल अटींची पूर्तता केली नाही

१) अपरिहार्य घटना

२) कलम ५.९(आ) नुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या दायित्वा चे सवलतधारकाने अधित्यजन केल्यास,

तर सवलतधारकाला हा करार त्वरित समाप्त करण्याचा अधिकार राहील.

आ ) सवलतधारकाने वरील (अ) नुसार करार समाप्त केल्यानंतर औरंगाबाद महानगरपालिका

१) सवलतधारकाला बोली रकमेची प्रतिभूति तत्काळ परत करेल
२) जर कार्यनिश्पादन प्रतीभूती कलम ५.९ (अ) (अ) ला अनुसरून वटविली गेली असेल तर औरंगाबाद महानगरपालिका जी काही रक्कम वटविली असेल ती सवलतधारकाला प्रतिपूर्त करेल

**५.९ पूर्वअटींचे अधित्याजन करणे**

अ) औरंगाबाद महानगरपालिका त्यांच्या स्वेछाधिकारात लेखी स्वरूपात सवलतधारकाच्या पूर्वअटींचे अधित्यजन करू शकेल.

आ) सवलतधारक त्यांच्या स्वेछाधिकारात लेखी स्वरूपात औरंगाबाद महानगरपालिकेच्या कोणत्याही कार्याचे वा पूर्वअटींचे अधित्यजन करू शकेल.

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

# ६ ) कार्यपूर्तीची प्रतिभूती

## ६.१ वाणिज्यिक परिचालन दिनांकापर्यंत कार्यपूर्ती प्रतिभूतीचे मूल्य व वैधता

नियत दिनांकास वा तत्पूर्वी सवलतधारक औरंगाबाद महानगरपालिकेकडे कार्यापुर्तीची प्रतिभूती स्वरुपात रु ७९, २२,००,०००/- ( रु एकोणऐंशी कोटी बावीस लाख फक्त ) मूल्य असलेले व वाणिज्यिक परिचालन दिनांका पर्यंत वैध असलेले एक रद्द न करता येण्याजोगे बँकेचे हमीपत्र सादर करेल .( **बांधकाम व पुनर्वसन कार्यपूर्तीची प्रतिभूती** )

## ६.२ परिचालन व देखभाल कालावधीतील कार्यपूर्ती प्रतिभूतीचे मूल्य व वैधता

वाणिज्यिक परिचालन दिनंकाच्या दिवशी सवलतधारक औरंगाबाद महानगरपालिकेकडे कार्यापुर्तीची प्रतिभूती स्वरुपात वार्षिक परिचालन अनुदानाच्या रकमेएवढे मूल्य असलेली व एक वर्ष मुदतीची व जी सवलत काळामध्ये दरवर्षी वार्षिक परिचालन अनुदानाच्या रकमेएवढे मूल्य असलेल्या बँक हमीपत्र सादर करेल. (**परिचालन व देखभाल कार्यपूर्ती प्रतिभूती** )

## ६.३ कार्यपूर्ती प्रतीभूती व पुनःपुर्ती

अ) औरंगाबाद महानगरपालिकेने कलम ३२ अनुसार कार्यपूर्ती प्रतिभूती ( अथवा त्याचा काही हिस्सा) समायोजित करून घ्यावा

आ) कलम ३२ नुसार असे काही समायोजन झाले असेल व करार समाप्त झाला नसेल तर सवलतधारकाने १५ (पंधरा ) दिवसांचे आत कार्यपूर्ती प्रतीभूतीची पुनःपुर्ती केली पाहिजे.

## ६.४ कार्यपूर्ती प्रतिभूती मोकळी करणे

बांधकाम व पुनर्वसन कार्यपूर्ती प्रतिभूती व परिचालन व देखभाल कार्यपूर्ती प्रतिभूती वटविल्याची बाब सोडल्यास, औरंगाबाद महानगरपालिकेने

अ) बांधकाम व पुनर्वसन कार्यपूर्ती प्रतिभूती (अथवा त्याचा काही हिस्सा) वाणिज्यिक परिचालन दिनांकाच्या ३० (तीस ) दिवसांचे आत सवलतधारकाला परत दिली पाहिजे.

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



आ) परिचालन व देखभाल कार्यपूर्ती प्रतिभूती (अथवा त्याचा काही हिस्सा) सवलतीचा कालावधी किंवा तो आधी समाप्त झाल्यास ६ (सहा) महिन्यांचे आत सवलतधारकाला परत दिली पाहिजे.

## ७ प्रकल्पाची जागा

## ७.१ प्रकल्पाच्या जागेशी संबंधित सर्वसामान्य तरतुदी

अ) औरंगाबाद महानगरपालिका सवलतधारकाला, सवलतधारकाने औरंगाबाद महानगरपालिकेच्या विनंतीवरून मुदतवाढ जास्तीतजास्त ६ ( सहा ) महिन्यांपेक्षा जास्त दिली नसल्यास , जमिनीचा ताबा देण्याचे वेळापत्रक असलेल्या अनुसूची ६ नुसार प्रकल्पाच्या जागेच्या ब भागातील जमिनीचा ताबा, हा करार स्वाक्षरी झाल्याच्या दिनांकाच्या २४ (चोवीस) महिन्यांच्या कालावधीत देईल. औरंगाबाद महानगरपालिका जमिनीचा ताबा देण्याचे वेळापत्रक असलेल्या अनुसूची ६ नुसार प्रकल्पाच्या जागेच्या ब भागातील जमिनीत जाण्याचा हक्क व परवाना सवलतधारकाला देईल.

आ) औरंगाबाद महानगरपालिका,जमिनीचा ताबा देण्याचे वेळापत्रक असलेल्या अनुसूची ६ नुसार प्रकल्पाच्या जागेच्या ब भागातील जमिनीचा ताबा देण्यास अयशस्वी झाली, तर औरंगाबाद महानगरपालिका सवलतधारकाला खालील सूत्राप्रमाणे नुकसानभरपाई देण्यास बांधील असेल

$d = \underline{p \times EIRR \times t}\ /100$

d= सवलतधारकाला प्रदान करावयाची नुकसानभरपाई

p = सवलतधारकाने नुकसानभरपाईचा हिशोब करतेवेळी गुंतवलेले भांडवल व स्वतंत्र अभियंत्याने प्रमाणित केलेल्या अशा काही रकमा

EIRR = भांडवलावरील अंतर्गत नफ्याचा दर

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा



t= प्रकल्पाच्या जागेच्या ब भागाचा ताबा देण्यास वर्षांमध्ये झालेला विलंब

एक उदाहरण म्हणून औरंगाबाद महानगरपालिकेने ,जमिनीचा ताबा देण्याचे वेळापत्रक असलेल्या अनुसूची ६ नुसार प्रकल्पाच्या जागेच्या ब भागातील जमिनीचा ताबा देण्यास ६ (सहा ) महिन्यापेक्षा जास्त कालावधी घेतलं व जर सवलतधारकाने प्रकल्पामध्ये भांडवल म्हणून रु ३०,००,००० (रु तीस लाख फक्त ) गुंतविले असतील तर एकूण दंड रु२,३२,५०,०००/- ( रु दोन करोड बत्तीस लाख पन्नास हजार असेल ( रु ३०००००० x १५.५ % /२)

इ) औरंगाबाद महानगरपालिका सवलतधारकाला हा प्रकल्प सुरु करण्यासाठी आवश्यक व योग्य असतील , (स्वखर्चाने व अस्तित्वात असलेल्या कायद्याला व पर्यावरणीय व सामाजिक आकारणी अहवालाला अनुसरून ) रहिवाश्यांच्या जागा रिकाम्या कारणे, पुनर्स्थापन, पुनर्वसन, रस्ते बंद वा त्याला फाटे तयार करणे, अशी त्यांच्या अधिकारातील कार्ये करेल

ई) वरील कलम ७.१ (अ) नुसार प्रकल्पाच्या जागेच्या ब भागाचा ताबा मिळायच्या दिनांकापासून सवलतधारक त्या जागा अतिक्रमित होऊ नयेत म्हणून सर्वतोपरी प्रयत्न करेल व औरंगाबाद महानगरपालिका हे पार पाडण्यासाठी सवलतधारकाला सहकार्य करेल.

उ) प्रकालापाची जागा व मालमत्ता याच्याशी संबंधित मालमत्ता कर किंवा उपकर, कर, शुल्क किंवा आयातकर प्रदान करणे ही औरंगाबाद महानगरपालिकेचे दायित्व असेल.

ऊ) औरंगाबाद महानगरपालिकेने लेखी परवानगी असल्याखेरीज, ह्या करारात नमूद केल्याप्रमाणे सवलतधारक प्रकल्पाच्या जागेचा वापर फक्त ह्या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठीच करेल.

### ७.२ प्रकल्पाच्या जागेशी संबंधित इतर तरतुदी

ह्या कराराच्या कलम ७.३ अन्वये निसंदिग्ध तरतूद असल्याखेरीज, प्रकल्पाच्या संबंधित जागेचा ताबा मिळाल्याच्या दिनांकापासून त्या जागेच्या अवस्थेचे संपूर्ण दायित्व सर्व

काळाकरिता सवलतधारकाचे असेल. त्यानुसार (ह्या करारातील सवलतधारकाप्रती असलेल्या इतर कोणत्याही जबाबदाऱ्या यांचा कोणताही पूर्वग्रह न ठेवता ) सवलतधारकाने खालील बाबी केल्या असे मानले जाईल

अ) प्रकल्पाची जागा, त्याचा सभोवताल, (जिथे लागू असेल तिथे ) जागेत, जागेवर, जागेखाली अस्तित्वात असलेली बांधकामे व मालमत्ता यांचे अवलोकन व परीक्षा केली आहे.

आ) जागेची अवस्था, जमीन, भूपृष्ठाखालील जमीन, प्रकल्पाच्या जागेचा आकार व स्वरूप, जागेची वजन पेलण्याचे व इतर संबंधित गुणधर्म, प्रकल्प जागेजवळ असणाऱ्या व्यक्ती व मालमत्ता यांना दुखापत किंवा नुकसान होण्याची जोखीम, खनन करताना निघणाऱ्या साहित्याचे ( नैसर्गिक वा अन्य ) स्वरूप, व काम पार पडण्यासाठी आवश्यक असलेले प्रारूप, काम व साहित्य, याविषयी सवलतधारकाने स्वतःची खात्री करून घेतली आहे.

इ) ह्या करारातील जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी, प्रकल्पाच्या जागेत व जागेतून जाण्यासाठी पुरेसा हक्क, अधिकार व जागा असण्याविषयी ( जसे प्रकल्पा बाहेरील एखादी इमारत अथवा अतिरिक्त जमीन ) स्वतःची खात्री करून घेतली आहे.

ई) प्रकल्पाच्या जागेलागत असणाऱ्या जमीनिच्या मालकांचा व ताबेदारांचा,(औरंगाबाद महानगरपालिकेखेरीज ) प्रकल्पाच्या जागेचा वापर करण्याचा व त्यात व त्यातून जाण्या येण्याचा हक्क असणाऱ्या सर्व वर्णनाच्या व्यक्तीची खात्री करून घेतली आहे.

उ) कोणत्याही खासगी वा सार्वजनिक त्रयस्थ पक्षाला होणारा त्रास वा हस्तक्षेप टाळण्यासाठी घ्यावयाची खबरदारी, वेळ व काम करण्याच्या पद्धतीची स्वतः खात्री करून घेतली आहे.

### ७.३ जागेच्या अपरिहार्य प्रतिकूल बाबी

अ) कलम ७.२ च्या तरतुदी विचारात न घेता , प्रकल्पाच्या जागेत अथवा त्याच्या कोणत्याही भागात काही प्रतिकूल बाबी वा दूषितपण असल्यास व औरंगाबाद महानगरपालिका व सवलत धारक यांनी परस्परांच्या संमतीने नेमलेल्या व सुज्ञ औद्योगिक

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



पद्धती मानणाऱ्या कोणत्याही ठेकेदारास त्याचा रास्त अंदाज आला नाही व सवलतधारकाने अशा काही प्रतिकूल बाबी वा दूषितपण प्रकल्पाच्या जागेत अथवा त्याच्या कोणत्याही भागात असल्याचे खालील प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या लक्षात आणून दिल्यास

१) प्रकल्प जागेच्या अ भागाच्या बाबतीत नियत दिनांकापूर्वी

२) प्रकल्प जागेच्या ब भागाच्या बाबतीत (जे औरंगाबाद महानगरपालिकेने नियत दिनांकापूर्वी अधिग्रहित केलेले नाही ) ब भाग ताब्यात दिल्याच्या दिनांकाला ६ (सहा) महिन्याचा कालावधीपूर्वी

सवलतधारक अशा प्रतिकूल बाबी वा दूषितपणास  जबाबदार असणार नाही

ब)   प्रकल्पाच्या जागेची स्थिती ही लागू होणाऱ्या कायद्याच्या नुसार आहे ही खात्री करण्यासाठी जो रास्त खर्च सवलतधारकाला येईल, त्याची प्रतिपूर्ती करण्याची हमी औरंगाबाद महानगरपालिका देत आहे.

क) कोणत्याही शंका न येण्यासाठी, येथे असे निसंदिग्धपणे स्पष्ट केले जाते की जर सवलतधारकाने अशा काही प्रतिकूल बाबी वा दूषितपण प्रकल्पाच्या जागेत अथवा त्याच्या कोणत्याही भागात असल्याचे खालील प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या लक्षात आणून दिल्यास

१) प्रकल्प जागेच्या अ भागाच्या बाबतीत नियत दिनांकानंतर

२) प्रकल्प जागेच्या ब भागाच्या बाबतीत (जे औरंगाबाद महानगरपालिकेने नियत दिनांकापूर्वी अधिग्रहित केलेले नाही ) ब भाग ताब्यात दिल्याच्या दिनांकाला ६ (सहा) महिन्याचा कालावधीनंतर,

तर औरंगाबाद महानगरपालिका कोणत्याही तऱ्हेची नुकसानभरपाई देण्यास बांधील असणार नाही.

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



## ८) अस्तित्वात असलेली मालमत्ता, अस्तित्वात असलेल्या मालमत्तेची विल्हेवाट व घसारा

### ८.१ अस्तित्वात असलेली मालमत्ता वापरण्याचा हक्क

नियत दिनांकापासून ते सवलतीचा कालावधी समाप्त होईतोवर, सवलतधारकाला एका अनन्य अनुज्ञप्ती द्वारे ह्या करारातील व प्रकल्पापोटी असणाऱ्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी अस्तित्वात असलेली मालमत्ता वापरण्याचा हक्क असेल.

### ८.२ घसारा

लागू असलेल्या कायद्याच्या आधीन राहून, सवलतीच्या कालावधी मध्ये सवलतधारकाने प्राप्त केलेली प्रकल्पाची मालमत्ता असणारी भांडवली गुंतवणूक ही औरंगाबाद महानगरपालिकेने प्राप्त केल्याची व मालकीची असल्याचे मानले जाईल, परंतु औरंगाबाद महानगरपालिका अशा प्रकल्प मालमत्तेच्या घसार्याच्या फायद्यावर  वर कुठलाही हक्क सांगणार नाही व सवलतधारकाला अशा प्रकल्प मालमत्तेच्या घसार्यावरील फायद्यावर हक्क सांगण्याचा अधिकार राहील

### ८.३ मालमत्तेची विल्हेवाट

सवलतीच्या काळामध्ये प्रकल्पाच्या वापरल्या गेलेली काही यंत्रसामग्री बदलावी लागेल किंवा प्रकल्पासाठी आवश्यक नसेल.  कोणतीही शंका न येण्यासाठी येथे हे निसंदिग्धपणे नमूद केले जाते की सवलतधारक अशा विक्री केलेल्या कोणत्याही प्रकल्प मालमत्तेची रक्कम स्वतः जवळ ठेऊ शकणार नाही.  अशा यंत्रसामग्रीची वा मालमत्तेची, भंगारात वा अन्य

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



तऱ्हेने विक्री केल्यास अशा विक्रीतून येणारी रक्कम ही औरंगाबाद महानगरपालिकेच्या फायद्याकरिता असेल ती रक्कम जल प्रदान राखीव निधीत जमा करावी लागेल.

## ९ प्रतिनिधित्व व हमी

सवलतधारक महानगरपालिकेला निवेदित करून हमी देतात की :

अ) ते रीतसर संघटीत असून भारतातील कायद्यान्वये वैध रीतीने अस्तित्वात असून ह्या व अन्य प्रकल्प करारान्वये पडणाऱ्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्याचा, सोपविण्याचा व पार पाडण्याचा व त्या अनुषंगाने याद्वारे व त्याद्वारे व्यवहार करण्याचा अधिकार व प्राधिकार त्यांना आहे.

आ)ह्या व अन्य प्रकल्प करारान्वये पडणाऱ्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी, सोपविण्या साठी व पार पाडण्यासाठी, अस्तित्वात असलेल्या कायद्याखाली सर्व आवश्यक निगमीय व इतर कार्ये त्यांनी केली आहेत.

इ) ह्या व अन्य प्रकल्प करारान्वये हा प्रकल्प हाती घेण्यासाठी आवश्यक ती आर्थिक उभारणी व क्षमता त्यांच्याकडे आहे.

ई) हे व अन्य प्रकल्प करार कार्यान्वित करतेवेळी किंवा केले जातील, त्यावेळी रीतसर कार्यान्वित केले आहेत किंवा असतील व कराराच्या शर्तीनुसार त्याअन्वये येणाऱ्या जबाबदाऱ्या, कायदेशीर, वैध व बंधनकारक असून यामुळे व त्यामुळे शर्तीनुसार त्यांचेविरुद्ध अमलात येतील व ह्या व अन्य प्रकल्प करारान्वये जबाबदाऱ्या, कायदेशीरदृष्ट्या वैध बंधनकारक व अमलात येतील असून यामुळे व त्यामुळे शर्तीनुसार त्यांचेविरुद्ध अमलात येतील.

उ) बोली कागदपत्रांमध्ये दिलेली व कराराच्या दिनांकापूर्वी किंवा दिनांकाला अद्ययावत केलेली सर्व माहिती कराराच्या दिनांकाच्या दिवशी त्यांच्या विश्वास व समजुतीनुसार सर्व महत्वाच्या बाबींमध्ये खरी व अचूक आहे.

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



ऊ) ह्या कराराचे कार्यान्वयन, सोपविणे व पूर्ण करणे ही ह्या सवलतधारकाच्या किंवा संघातील कुठल्याही सभासदाच्या संक्षेप लेख व संस्थापन नियमावली अथवा लागू असलेल्या कोणत्याही कायद्याच्या किंवा ते पक्ष असलेल्या किंवा ज्याद्वारे ते अथवा त्यांची कुठलीही मिळकत किंवा मालमत्ता कोणत्याही प्रसंविदा, कंत्राट, करार, व्यवस्था, सहमती, हुकुमनामा किंवा आदेश ह्या मुळे बाधित किंवा परिणामीत होणार नाहीत, यामुळे कुठलाही भंग किंवा कसूर होणार नाही.

ऋ) त्यांच्या समजुती व विश्वासानुसार त्यांच्या विरुद्ध कुठल्याही कायद्यान्वये कुठल्याही न्यायालयासमोर किंवा न्यायिक, अर्धन्यायिक वा इतर प्राधिकरणासमोर, ज्याचा निकाल हा ह्या कराराचा भंग करेल किंवा व्यक्तिगत अथवा सामुहिक दृष्ट्या ह्या करारातील महत्वाच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्याच्या क्षमतेला हानी पोहोचवेल अशी कुठलीही कारवाई, खटला कायदेशीर इलाज, किंवा तपास सुरु नाही.

ऌ) त्यांच्या समजुतीनुसार ह्या करारातील जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या त्यांच्या क्षमतेवर विपरीत परिणाम  करतील असा कुठल्याही न्यायालयाचा आदेश, रिट, हुकुम, किंवा न्यायनिर्णय अथवा शासनाच्या कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक असणाऱ्या कुठल्याही आदेशाचे त्यांनी उल्लंघन किंवा भंग केलेला नाही व अशी  कुठलीही तथ्ये किंवा परिस्थिती नाही ज्यामुळे कार्यवाही होऊन ह्या करारातील जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या त्यांच्या क्षमतेवर विपरीत परिणाम  करतील.

ऍ) त्यांनी सर्व महत्वाच्या बाबींमध्ये सर्व लागू कायद्यांचे पालन केले असून,  ह्या करारातील जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या त्यांच्या क्षमतेवर विपरीत परिणाम करतील अशा कुठल्याही दंड, शिक्षा, महादेषक अनुतोष किंवा दिवाणी / फौज्दारी स्वरुपाची देणी नाहीत.

ऎ) ह्या प्रकल्पाशी संबंधित किंवा सवलत मिळविण्यासाठी किंवा हा करार करण्यासाठी किंवा औरंगाबाद महानगरपालिका किंवा कोणत्याही शासकीय निमितत्वाच्या कुठल्याही कर्मचाऱ्यावर  अथवा अधिकाऱ्याला ह्या संदर्भात प्रभावित करण्यासाठी

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा



किंवा प्रभावीत करण्याचा प्रयत्न करण्यासाठी कुठल्याही व्यक्तीला शुल्क, दलाली, वा अन्य स्वरुपात रोख रक्कम किंवा ऐवज त्यांनी किंवा त्यांच्या तर्फे दिलेला नाही.

ए) ह्या प्रकल्पाशी संबंधित औरंगाबाद महानगरपालिकेला किंवा कुठल्याही शासकीय निमितत्वाला सादर केलेल्या कुठल्याही कागदपत्रात (सर्व परवान्याशी संबंधित माहिती सुद्धा समाविष्ट ), कुठलेही निवेदन व हमी मध्ये महत्वाच्या बाबी लपविणारे कुठलेही असत्य किंवा दिशाभूल करणारे विधान नाही किंवा असणार नाही.

**९.२ औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे आश्वासने व हमी**

औरंगाबाद महानगरपालिका सवलतधारकाला आश्वस्त करून हमी देते की

अ) परवाने व सवलती बहाल करण्याचा त्यांना पूर्ण अधिकार असून या करारातील सर्व जबाबदाऱ्याचे कार्यान्वयन, सोपविणे व काम करणे, व जल प्रदान राखीव निधी करार व त्याचे संपूर्ण व्यवहार करण्याचा अधिकार व प्राधिकर असून व हा करार कार्यान्वित करण्यासाठी, ह्या करारातील जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी व अधिकार शाबित करण्यासाठी यामुळे व त्यामुळे अपेक्षित व्यवहार करण्यासाठी त्यांनी आवश्यक ते सर्व कार्ये केली आहेत वा करतील.

आ)ह्या व अन्य प्रकल्प करारान्वये हा प्रकल्प हाती घेण्यासाठी आवश्यक ती आर्थिक उभारणी व क्षमता त्यांच्याकडे आहे.

इ) हा व जल प्रदान राखीव खाते करार कार्यान्वित करतेवेळी किंवा केले जातील, त्यावेळी रीतसर कार्यान्वित केले आहेत किंवा असतील व कराराच्या शर्तीनुसार त्याअन्वये येणाऱ्या जबाबदाऱ्या, कायदेशीर, वैध व बंधनकारक असून यामुळे व त्यामुळे शर्तीनुसार त्यांचेविरुद्ध अमलात येतील व ह्या व अन्य प्रकल्प करारान्वये जबाबदाऱ्या, कायदेशीरदृष्ट्या वैध बंधनकारक व अमलात येतील असून यामुळे व त्यामुळे शर्तीनुसार त्यांचेविरुद्ध अमलात येतील.

ई) ह्या व जल प्रदान राखीव खाते कराराच कार्यान्वयन, सोपवणे व काम करणे ज्याद्वारे ते अथवा त्यांची कुठलीही मिळकत किंवा मालमत्ता कोणत्याही प्रसंविदा, कंत्राट,

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



करार, व्यवस्था, सहमती, हुकुमनामा किंवा आदेश ह्या मुळे बाधित किंवा परिणामीत होणार नाहीत, यामुळे कुठलाही भंग किंवा कसूर होणार नाही.

उ) त्यांच्या समजुती व विश्वासानुसार त्यांच्या विरुद्ध कुठल्याही कायद्यान्वये कुठल्याही न्यायालयासमोर किंवा न्यायिक, अर्धन्यायिक वा इतर प्राधिकरणासमोर, ज्याचा निकाल हा ह्या कराराचा भंग करेल किंवा व्यक्तिगत अथवा सामुहिक दृष्ट्या ह्या करारातील महत्वाच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्याच्या क्षमतेला हानी पोहोचवेल अशी कुठलीही कारवाई, खटला कायदेशीर इलाज, किंवा तपास सुरु नाही.

ऊ) त्यांच्या समजुतीनुसार ह्या करारातील जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या त्यांच्या क्षमतेवर विपरीत परिणाम करतील असा कुठल्याही न्यायालयाचा आदेश, रिट, हुकुम, किंवा न्यायनिर्णय अथवा शासनाच्या कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक असणाऱ्या कुठल्याही आदेशाचे त्यांनी उल्लंघन किंवा भंग केलेला नाही व अशी कुठलीही तथ्ये किंवा परिस्थिती नाही ज्यामुळे कार्यवाही होऊन ह्या करारातील जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या त्यांच्या क्षमतेवर विपरीत परिणाम करतील.

ऋ) त्यांनी लागू असलेल्या कायद्यांचे सर्व महत्वाच्य बाबतीत पालन केले आहे.

ऌ) त्यांच्या समजुतीप्रमाणे, प्रस्तावाची विनंती, इरादा पत्र व निवाडा पत्राद्वारे दिलेली सर्व माहिती बरोबर व अचूक आहे.

ऍ) अनुसूची ६ मध्ये तपशीलवार वर्णन केलेल्या ह्या प्रकल्पाची जागा सवलतधारकाला हस्तांतर करते वेळी, प्रकल्पाच्या जागेवर त्यांचे पर्याप्त व वैध अधिकार व हक्क असून ह्या करारान्वये नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार सवलतधारकाला अनुज्ञाप्ती बहाल करण्याचा अधिकार व प्राधिकार आहे.

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



# १० ) सर्वसामान्य हमी

## १०.१ ) औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसामान्य हमी

कुठल्याही पूर्वग्रहाशिवाय व ह्या करारान्वये औरंगाबाद महानगरपालिकेच्या अन्य हमी व जबाबदाऱ्या मर्यादित न करता

अ) औरंगाबाद महानगरपालिका सवलतीच्या कालावधीमध्ये पुरवठा क्षेत्रातील अंतिम उपयोगकर्त्यांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी कोणत्याही त्रयस्थ पक्षाच्या सेवा पुरविणार वा वापरणार नाही.

आ)औरंगाबाद महानगरपालिका सवलतधारकाला कलम २६ अनुसार जल प्रदान करेल.

इ) औरंगाबाद महानगरपालिका सवलत धारकाला कलम २७ नुसार वीज पुरवठा करेल.

ई) औरंगाबाद महानगरपालिका सवलत धारकाला कलम १८.६, कलम १९.२ व कलम ३५ नुसार अनुतोष आणि / किंवा भरपाई देईल.

उ) औरंगाबाद महानगरपालिका कलम २५ नुसार जल प्रदान निधी खाते स्थापन करेल .

ऊ) औरंगाबाद महानगरपालिका जल प्रदान निधी खाते कराराचे पालन करेल.

ऋ) लागू असलेल्या कायद्याद्वारे अधिकार असल्यास, एखाद्या व्यक्तीला बांधकाम करणे, पाईप टाकणे, झाडे लावणे किंवा प्रकल्पाच्या जागी सारतः व प्रतिकूल परिणाम होऊ शकेल अशी परवानगी देण्यापूर्वी औरंगाबाद महानगरपालिका सवलतधरकाशी सल्लामसलत करेल व अशी कामे योग्य रित्या फेरबदल होण्यासाठी सर्वातोपरी प्रयत्न करेल.

ऌ) ह्या / जल प्रदान खाते करार व ह्याद्वारे व त्याद्वारे कोठलेही कार्य रोखण्यासाठी, प्रतिबंधित करण्यासाठी वा अन्य अस्तित्वसुचक वैधते बाबत दावा किंवा कारवाई केली गेल्यास व सवलतधारकाने विनंती केल्यास, असे परिणाम सौम्य करण्यासाठी सवलतधारकाच्या खर्चाने उपलब्ध असलेली उचित कारवाई करेल.

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



ऍ) त्रयस्थ पक्षाच्या (त्यांचे उपकंत्राटदार वगळून) एखाद्या कृतीमुळे किंवा टाळाटाळीमुळे काम, प्रकल्प मालमत्ता, प्रकल्पाची अंमलबजावणी, हा करार व जल प्रदान राखीव निधी करार यामध्ये नमूद सवलतधरकाचे हक्क व फायदे यावर महत्वाचे व प्रतिकूल परिणाम होत असतील तर सवलतधारकाने लेखी विनंती केल्यास व लागू असलेले कायदे जितपत अनुमती देतात, औरंगाबाद महानगरपालिका अशी कारवाई सौम्य करण्यासाठी खालील कारवाई करेल

१) तृतीय पक्ष्याच्या अशा कृती सवलतधारकाच्या कसुरीमुळे असल्यास, सवलतधारकाच्या खर्चाने

२) तृतीय पक्ष्याच्या अशा कृती औरंगाबाद महानगरपालिकेच्या कसुरीमुळे असल्यास, स्वखर्चाने

३) तृतीय पक्ष्याच्या अशा कृती सवलतधारकाच्या व औरंगाबाद महानगरपालिकेच्या कसुरीमुळे असल्यास, सवलतधारकाच्या व औरंगाबाद महानगरपालिकेच्या निम्म्या निम्म्या खर्चाने.

ऐ) जोवर सवलतधारक प्रसंविदि प्रमाणे काम करतो आहे, तोवर औरंगाबाद महानगरपालिका या संबंधीच्या मुदतकाळात सवलतधारकाच्या हक्काचा उपभोग व कर्तव्यांची पूर्ती करण्यामध्ये या कराराच्या व लागू कायद्याच्या तरतुदीशिवाय हस्तक्षेप करणार नाही.

ऑ) या कराराच्या शर्तीच्या अधीन राहून व विशेष करून कराराच्या कलम १५.४ मधील नमूद कर्तव्ये सवलतधारक पार पाडीत आहे, तोवर सवलतधारकाला अनुसूची ७ मधील नमूद प्रकल्प अनुदान प्राप्त होईल.

ऒ) नियत दिनांकापूर्वी अस्तिवात असलेल्या मालमत्तेच्या संदर्भात घेतलेल्या कुठल्याही कर्जाच्या परतफेडीचे दायित्व औरंगाबाद महानगरपालिका घेत आहे.

ओ)अंतिम उपयोगकर्त्यांकडून औरंगाबाद महानगरपालिकेला नियत दिनांकापूर्वी देय असलेल्या पाण्याच्या बिलाच्या वसुली बद्दल अनुसूची ८ मध्ये नमूद प्रोत्साहन भत्ता प्रदान करण्याचे औरंगाबाद महानगरपालिका कबुल करीत आहे.

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



औ) सवलतधारकाला प्रकल्पाशी संबंधित उत्पादन शुल्कामध्ये मिळालेल्या सुटीमुळे कोणत्याही फायद्यामध्ये औरंगाबाद महानगरपालिका हक्क सांगणार नाही.

## १०.२ सवलतधारकाच्या समर्थनार्थ औरंगाबाद महानगरपालिकेची कार्ये

अ) सवलतधारकाने परवाना प्राप्त करण्याचे पात्रता निकष पूर्ण करत भेदभावमुक्त आधारावर अर्ज केल्यास, औरंगाबाद महानगरपालिका त्यांच्या अखत्यारीत असलेले व या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी त्या त्या पातळीला आवश्यक असलेले सर्व परवाने ( नियत दिनांकापूर्वी सवलतधारकाने पूर्तता करावयाच्या पूर्वअटींसाठी आवश्यक असणाऱ्या परवान्यासहित ) बहाल करेल.

आ) कोणत्याही शासकीय तत्वमत्तेकडून ( औरंगाबाद महानगरपालिके खेरीज ) या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी त्या त्या पातळीला आवश्यक असलेले सर्व परवाने ( नियत दिनांकापूर्वी सवलतधारकाने पूर्तता करावयाच्या पूर्वअटींसाठी आवश्यक असणाऱ्या परवान्यासहित ) प्राप्त करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिका साव्लात्धारकला सर्वतोपरी मदत करेल.

इ) सवलतधारकाने प्रस्तावित केलेल्या या कामातील व्याप्तीतील बदलाबाबत विचार करून तो मंजूर करण्यासाठीचा अधिकार औरंगाबाद महानगरपालिका कलम २० अन्वये राखून ठेवीत आहे.

ई) औरंगाबाद महानगरपालिका (गोपनीयतेचे कर्तव्य व दायित्व यांच्या अधीन राहून ) या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक व योग्य ती माहिती (औरंगाबाद महानगरपालिकेकडे जी उपलब्ध असेल ती ) सवलतधारकाला देईल

उ) लागू असणाऱ्या कायद्याप्रमाणे करातून व शुल्कातून सुट प्राप्त करून घेण्यासाठी औरंगाबद महानगरपालिका सवलतधारकाला सर्वातोपाई साहाय्य करेल.

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



ऊ) या प्रकल्पाचे आर्थिक समाप्ती करण्यासाठी औरंगाबद महानगरपालिका सवलतधारकाला सर्वातोपाई साहाय्य करेल.

## १०.३ सवलतधारकाच्या सर्वसामान्य हमी

अ) प्रकल्पासाठी आवश्यक सर्व परवाने प्राप्त करण्यासाठी सवलतधारक स्वखर्चाने वेळेवर, पूर्ण अर्ज करेल. सवलतधारक असे परवाने, ह्या व इतर प्रकल्प करारातील जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी, चालू व अस्तित्वात राहतील याची काळजी घेइल.

आ) सवलतधारक बांधकाम व पुनर्वसनाचे काम कलम १५.२ नुसार तयार करण्यात आलेल्या बांधकाम व पुनर्वसन योजनेनुसार करेल.

इ) सवलतधारक स्वखर्चाने ह्या प्रकल्पातील सुविधांचे बांधकाम, पुनर्वसन, परिचालन व देखभाल ही सर्वोत्तम उद्योग प्रथा, लागू असलेले कायदे व सेवा पातळी आवश्यकता करारप्रमाणे आहेत याची काळजी घेईल.

ई) संघातील प्रत्येक भागधारकांचा हिस्सा हा बोली कागदपत्रामध्ये नमूद व औरंगाबाद महानगरपालिकेने मान्य केल्यानुसार असेल व प्रत्येक भागधारक कलम ११ प्रमाणे हा हिस्सा कायम राखण्यासाठी योग्य ते करारमदार करतील, याची सवलतधारक काळजी घेईल.

उ ) संघातील सर्व सदस्यांकडे हा प्रकल्पा हातात घेण्यासाठी व त्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ते भांडवल व कर्ज उभारण्यासाठी पुरेशी आर्थिक क्षमता व संसाधने असावीत यासाठी सवलतधारक सर्वतोपरी प्रयत्न करेल.

ऊ) संघातील सर्व सदस्य हे योग्यरीत्या संघटीत व त्यांचे अस्तित्व नियत करणाऱ्या कायद्यानुसार अस्तित्वात आहेत यासाठी सवलतधारक सर्वतोपरी प्रयत्न करेल.

ऋ)औरंगाबाद महानगरपालिकेशी प्रकल्पाशी संबंधित व्यवहार करण्यासाठी व माहितीचे आदान प्रदान करण्यासाठी जबाबदार असणारा कर्मचारी सवलतधारक स्पष्टपणे नामनिर्दिष्ट करेल.

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



ऌ) कलम १६ नुसार सवलतधारक प्रतिनियुक्त कर्मचाऱ्यांना कामाला लावेल.

ऍ) हस्तांतरण दिनांका रोजी सर्व हक्क व हितसंबंध हे कुठलेही दावे, बोजा वा तारण हक्क व पुढील करार मदाराशिवाय याशिवाय औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरित होतील, याची सवलत धारक काळजी घेईल.

ऎ) बांधकाम, पुनर्वसन, परिचालन व देखभालीच्या कालावधीमध्ये सवलतधारक स्वखर्चाने, औरंगाबाद महानगरपालिकेने निर्देशित केलेल्या स्वरूप व पद्धतीमध्ये औरंगाबाद महानगरपालिकेला पर्यावरणीय स्थिती अहवाल सादर करेल.

ए) सवलतधारक प्रकल्प सुविधा व मालमत्ता यांची सर्वोत्तम औद्योगिक प्रथा व करारातील नमूद केलेल्या तांत्रिक विनिर्देषाप्रमाणे परिचालन व देखभाल करेल. सर्वसामान्य झीज वगळून सवलतधारक स्वखर्चाने सर्व नुकसान त्वरेने दुरुस्त करेल, जेणेकरून प्रकल्प सुविधा उत्तम स्थितीमध्ये कार्यरत असतील.

ऐ) एखादी व्यक्ती प्रकल्प मालमत्तेला नुकसान पोहोचवू शकते अशी सवलतधारकाला रास्त शंका असल्यास, त्याने औरंगाबाद महानगरपालिकेला त्या व्यक्ती विरुद्ध योग्य ती कारवाई करण्याची विनंती करावी. ही विनंती प्राप्त झाल्यानंतर व सर्व संबंधित कागदपत्रांच्या सहित केलेल्या ह्या विनंतीच्या अधीन राहून औरंगाबाद महानगरपालिका त्यांच्या स्वेछाधिकारात योग्य ती कायदेशीर कारवाई करतील अथवा न करतील. कुठलीही शंका न येण्यासाठी येथे हे स्पष्ट केले जाते की सवलतधारकाने विनंती केल्यावरून न केलेल्या अशा कार्वैसाठी औरंगाबाद महानगरपालिका सवलतधारकाला वा त्या त्रयस्थ पक्षाला जबाबदार असणार नाही.

ऑ)ह्या प्रकल्पाशी संबंधित किंवा सवलत मिळविण्यासाठी किंवा हा करार करण्यासाठी किंवा औरंगाबाद महानगरपालिका किंवा कोणत्याही शासकीय निमितत्वाच्या कुठल्याही कर्मचाऱ्यावर अथवा अधिकाऱ्याला ह्या संदर्भात प्रभावित करण्यासाठी किंवा प्रभावीत करण्याचा प्रयत्न करण्यासाठी कुठल्याही व्यक्तीला शुल्क, दलाली, वा अन्य स्वरुपात रोख रक्कम किंवा ऐवज त्यांनी किंवा त्यांच्या तर्फे दिला जाणार नाही याची सवलतधारक काळजी घेईल .

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा



ऑ) प्रकल्प मालमत्तेचे परिचालन व देखभाल सवलतधारकातर्फे केली जाईल.

## ११) सवलतधारकाच्या संघातील सदस्यांचे भागधारण

अ) सवलतधारक अशी संपुष्टी व कबुल करतो की संघाचा अग्रेसर सदस्य सवलतीच्या कालावधीमध्ये सर्व काळी :

१) सवलतधारकाच्या भाग व भरणा झालेल्या भांडवलामध्ये कमीत कमी २६ (सहवीस ) टक्के हिस्सा धारण करेल.

२) सवलतधरकामध्ये तो सर्वात मोठा हिस्सेदार असेल.

आ) संघाच्या अग्रेसर सदस्याशिवाय इतर सदस्य सवलतधारकाच्या सवलतीच्या कालावधीमध्ये सर्व काळी सवलतधारकाच्या भाग व भरणा झालेल्या भांडवलामध्ये कमीत कमी १० (दहा) टक्के हिस्सा धारण करेल.

इ) जर सवलतधारक हा संघ नसेल तर प्राधान्य बोलीधारक सवलतीच्या कालावधीमध्ये सर्व काळी सवलतधारकाच्या भाग व भरणा झालेल्या भांडवलामध्ये कमीत कमी ५१ (एक्कावन) टक्के हिस्सा धारण करेल.

## १२) विमा

अ) सवलतधारक स्वखर्चाने वित्त करार, लागू असलेले कायदे व सर्वोत्तम औद्योगिक प्रथां व आवश्यकताना अनुसरून आवश्यक अशा रकमेचा विमा उतरवेल (**विमा संरक्षण** ) व असे विमा संरक्षण प्राप्त केल्याचा पुरावा औरंगाबाद महानगरपालिकेला सादर करेल.

आ)बांधकाम व पुनर्वसनाच्या कालावधी मध्ये हे विमा संरक्षण खालील गोष्टींना लागू असेल, पण त्यांच्यापुरतेच मर्यादित असणार नाही.

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



१) प्रकल्पाशी संबंधित व करारापूर्वी औरंगाबाद महानगरपालिकेने निर्माण केलेल्या मालमत्ता, तेथील यंत्रसामग्री, सुटे भाग, इतर साहित्य व झालेल्या अथवा सुरु असलेल्या कंत्राटाच्या कामाचा विमा

२) त्रयस्थ पक्षाला झालेल्या शारीरिक दुखापतीपोटी असलेली कायदेशीर दायित्व किंवा सवलतधारकाकडून किंवा त्याच्या तर्फे चालू असलेल्या कामात मालमत्तेच्या नुकसानीचा समावेश असणारे बहुव्यापक तृतीय पक्ष विमा संरक्षण.

३) प्रकल्पावर कामाला असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा विमा समाविष्ट असलेले बहुव्यापक तृतीय पक्ष विमा संरक्षण.

इ) परिचालन व देखभाल कालावधीमध्ये हे विमा संरक्षण खालील गोष्टींना लागू असेल, पण त्यांच्यापुरतेच मर्यादित असणार नाही.

१) त्रयस्थ पक्षाला झालेल्या शारीरिक दुखापतीपोटी असलेली कायदेशीर दायित्व किंवा सवलतधारकाकडून किंवा त्याच्या तर्फे चालू असलेल्या कामात मालमत्तेच्या नुकसानीचा समावेश असणारे बहुव्यापक तृतीय पक्ष विमा संरक्षण.

२) प्रकल्पावर कामाला असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा विमा समाविष्ट असलेले बहुव्यापक तृतीय पक्ष विमा संरक्षण.

ई) सावलीतीच्या कालावधीतील सवलतधारकाच्या कृतीमुळे किंवा टाळाटाळीच्या कृतीचा परिणाम म्हणून औरंगाबाद महानगरपालिकेवर पडणारी जोखीम सौम्य करण्यासाठी आवश्यक असणारा विमा सवलतधारक प्राप्त करेल. कुठलीही शंका टाळण्यासाठी देय कर्ज पूर्णपणे फेडल्या नंतर विम्याची पातळी ही कर्ज फेडण्याआधी वित्त कर्ज कागदपत्रामध्ये लागू असलेल्या तत्वानुसारच ठेवली पाहिजे.

उ) पूर्वतयारीच्या कालावधीच्या शेवटी सवलतधारक एका सुचनेद्वारे कलम १२ नुसार तो करू इच्छित असलेल्या विम्याचे रास्त तपशील औरंगाबाद महानगरपालिकेकडे कळविणे आवश्यक आहे. अशी सूचना प्राप्त झाल्याच्या ३० (तीस) दिवसांच्या

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



कालावधीमध्ये औरंगाबाद महानगरपालिकेने सवलतधारकाला याव्यतिरिक्त इतर विमा धारण करावयास सांगावे व दोघांमध्ये विम्याच्या या विषयाशी संबंधित काही मतभेद किंवा असहमती  निर्माण झाल्यास कलम ३७ नुसार नमूद केलेले वाद निवारण कार्य लागू होईल.

ऊ) सवलतधारकाने कलम १२ च्या अनुसार प्राप्त केलेले सर्व विमे सर्वोत्तम औद्योगिक प्रथांनुसार विमाकर्त्याकडे चालू ठेवणे आवश्यक आहे.  हे विमा संरक्षण प्राप्त झाल्यावर १५ दिवसांचे आत सवलतधारक औरंगाबाद महानगरपालिकेकडे विमा प्रमाणपत्र, विमा पॉलिसी व अधिमूल्य  प्रदान केल्याच्या पावत्या यांच्या लेख प्रमाणकाकडून प्रमाणित प्रती सादर करेल.  कोणतीही विमा पॉलिसीचे  प्रस्तावित रद्दीकरण, बदल किंवा नुतनीकरण हे सवलतधारकाने महानगरपालिकेला अशी सूचना दिल्यानंतर ४५ (पंचेचाळीस ) दिवसांपूर्वी ती रद्द, बदल केला जाणार नाही किंवा ती संपू  किंवा व्यपगत होऊ दिली जाणार नाही.

ऋ)जर सवलतधारक तो ज्यास जबाबदार आहे असे विमे चालू ठेवण्यात अपयशी ठरला तर औरंगाबाद महानगरपालिकेकडे असे विमें उतरवून त्याचे अधिमूल्य प्रदान करून तो खर्च सवलतधारकाकडून वसूल करावयाचा विकल्प उपलब्ध असेल.  अथवा कलम ३४.४ नुसार अंतिम रक्कम प्रदान करण्याचा प्रसंग आल्यास, विमा संरक्षण प्राप्त करण्याकरिता आलेला खर्च सवलतधारकाला मिळाला आहे असे मानले जाईल.

ऌ) सवलतधारकाने कलम १२ नुसार प्राप्त केलेल्या विमा पॉलिसीमध्ये प्रतिस्थापन किंवा वसुली करण्याच्या तसेच इतर गोष्टींबरोबर औरंगाबाद महानगरपालिका व त्यांचे अभिहस्तांकिती, वारस, अंगीकृत उपक्रम व त्यांच्या अंगभूत उपक्रम, स्वसंबंधी, कर्मचारी, विमाकर्ते व हमीदार  यांच्या उलटदाव्यावर किंवा कोणत्याही कपातीवर टाच आणून अथवा अन्य मार्गाने अशा  पॉलिसीमध्ये संरक्षण असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या दायित्वापोटी किंवा कोणत्याही तऱ्हेने कोणत्याही नुकसान, दायित्व वा दायित्व शी संबंधित सर्व हक्काचे विमाकर्त्याच्या कोणत्याही व सर्व हक्कांचे त्याअंतर्गत त्यजन असणे आवश्यक आहे.

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



ऍ) सवलतधारक याद्वारे इतर गोष्टीबरोबरच औरंगाबाद महानगरपालिका व त्यांचे अभिहस्तांकिती, वारस, अंगीकृत उपक्रम व त्यांच्या अंगभूत उपक्रम, स्वसंबंधी, कर्मचारी, विमाकर्ते व हमीदार यांच्या विरुद्ध, जे त्यांना यांच्या उलटदाव्यावर किंवा कोणत्याही कपातीवर टाच आणून अथवा अन्य मार्गाने अशा पॉलिसीमध्ये संरक्षण असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या दायित्वापोटी किंवा कोणत्याही तऱ्हेने कोणत्याही नुकसान, दायित्व वा दायित्व शी संबंधाने प्राप्त झाले असते, ते प्रतिस्थापन किंवा वसुली करण्याच्या सर्व व कोणत्याही अधिकाराचे त्यजन व सोपविणे करीत आहे.

ऐ) फक्त जीवन व दुखापत सोडून इतर विम्याच्या दाव्याच्या प्राप्त झालेल्या रकमा या आवश्यक ती प्रकल्पाचे दुरुस्ती, पुनर्बांधणी, पुनर्स्थापन, प्रतिस्थापन, सुधारणा व उभारणीसाठी वापरली जाईल व उरलेली रक्कम ही विमा कराराच्या तरतुदीनुसार समायोजित केली जाईल.

## १३) वाणिज्यिक जोखीम

सवलतधारक प्रकल्प सुविधांच्या व प्रकल्प मालमत्तेच्या देखभाल विकास, बांधकाम, परिचालन व देखभालीच्या अंगभूत वाणिज्यिक जोखीम सहन करेल. कोणतीही शंका टाळण्यासाठी असे स्पष्ट केले जाते की वाणिज्यिक जोखिमामध्ये परकीय चलनातील कर्ज व अंतिम उपयोगकर्त्यांकडून उपयोग शुल्काची वसुली ना होणे याचा समावेश आहे, पण ते तेवढ्यापुरते मर्यादित नाही. हे स्पष्ट केले जाते की औरंगाबाद महानगरपालिका सवलतधारकाला कोणत्याही तऱ्हेची राजस्व हमी देणार नाही.

## १४) पर्यावरणीय व सामाजिक आकारणी अहवाल

दोन्ही पक्ष कराराच्या अनुसूची ५ मध्ये असलेल्या पर्यावरणीय व सामाजिक आकारणी अहवालात नमूद केलेल्या शिफारशी व सौम्यीकरण उपायांचे सर्वकाळी पालन करतील.

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा



# १५) पूर्वतयारीच्या कालावधीतील बंधने.

## १५.१) पूर्वतयारीच्या कालावधीतील बंधने

कुठल्याही तऱ्हेच्या शंका टाळण्यासाठी असे निसंदिग्धपणे स्पष्ट केले जाते की कलम १५.१ **(पूर्वतयारीच्या कालावधीतील बंधने )** मध्ये नमूद केलेली बंधने ही हा करार कार्यान्वित करण्याच्या दिनांकापासून सुरु होणाऱ्या बंधनांच्या व्यतिरिक्त आहेत.

अ) पूर्वतयारी कालावधीच्या शेवटी सवलतधारक व औरंगाबाद महानगरपालिका संयुक्तपणे प्रकल्पाच्या सध्या अस्तित्वातील मालमत्तेची तपशीलवार यादी तयार करतील व सध्या अस्तित्वातील मालमत्तेचे नोंदवही तयार करतील. नियत दिनंकाच्या दिवशी ही सध्या अस्तित्वात असलेली मालमत्ता या कराराच्या अनुसूची ९ चा भाग होईल. तदनंतर सवलतधारक वेळोवेळी गरज पडेल तशी सवलतीच्या काळामध्ये मध्ये या मालमत्ता नोंदवही मध्ये दुरुस्ती व अद्ययावत नोंदी करेल.

आ) पुर्वतयारी कालावधीच्या शेवटी औरंगाबाद महानगरपालिका प्रकल्पाच्या जागेच्या ब भागाच्या जमिनीचा ताबा सोपविण्याचे वेळापत्रक सवलतधारकाला सादर करेल. नियत दिनंकाच्या दिवशी ही सोपविलेली जमिन अनुसूची ६ चा ( जमीन सोपविण्याचा करार ) भाग बनेल.

इ) पुर्वतयारी कालावधीच्या शेवटी औरंगाबाद महानगरपालिका सवलतधारकाला देणेकर्यांची यादी व अंतिम उपयोगकर्त्यांकडून येणे असलेल्या उपयोगशुल्काच्या थकबाकीची आकडेवारी (नियत दिनांकापूर्वी देय) सादर करेल. नियत दिनांकाच्या दिवशी अशी देणेकर्यांची यादी व अंतिम उपयोगकर्त्यांकडून येणे असलेल्या उपयोगशुल्काच्या थकबाकीची आकडेवारी (नियत दिनांकापूर्वी देय) ही अनुसूची १०चा भाग बनेल.

ई) पुर्वतयारी कालावधीच्या शेवटी औरंगाबाद महानगरपालिका सवलतधारकाला अपरीश्कृत पाण्यावर संस्करण करण्यासाठी मान्य असलेल्या अपरीश्कृत पाण्याच्या

गुणवत्तेची कक्षा उपलब्ध करून देईल. नियत दिनांकाच्या दिवशी अशी अपरीश्कृत पाण्यावर संस्करण करण्यासाठी मान्य असलेल्या अपरीश्कृत पाण्याच्या गुणवत्तेची कक्षा ही अनुसूची ११ चा भाग बनेल.

उ) पुर्वतयारी कालावधीच्या शेवटी औरंगाबाद महानगरपालिका व सवलतधारक यांनी एक स्वतंत्र अभियंता नियुक्त केला असेल व अशा स्वतंत्र अभियंत्याच्या कार्यकक्षेवर उभय पक्षांचे एकमत झाले असेल.

## १५.२ बांधकाम व पुनर्वसन कार्य योजना

अ) पुर्वतयारी कालावधीच्या शेवटी सवलतधारक औरंगाबाद महानगरपालिकेला व स्वतंत्र अभियंत्याला कामाच्या बांधकाम व पुनर्वसनाची योजना व बांधकाम व पुनर्वसनाच्या कालावधीमध्ये प्रकल्पाच्या परिचालन व देखभालीची योजना सादर करेल. अशा योजनेचा मसुदा औरंगाबाद महानगरपालिकेच्या मंजुरीच्या अधीन राहून त्याची अंमलबजावणी केली जाईल व सवलतधारक खालील बाबी सादर करेल

i. प्रकल्प घटकांची तपशीलवार आरेखन व रेखान्काने
ii. सर्व प्रकल्पा घटकांची तपशीलवार प्रकालीत किंमत, तंत्रज्ञानाचा स्त्रोत, व प्रापण वेळापत्रक
iii. कलम १५.३ मध्ये नमूद केलेल्या तत्वांच्या अनुसार प्रकल्पाचे तिमाही टप्पे
iv. उपकंत्राटाचे मसुदे.
v. लागू असलेल्या कायद्याला अनुसरून बेकायदा जलजोड नियमित करण्यासाठीची योजना
vi. सर्व उपभोक्त्यांच्या जोडांचे मीटरीकारण करण्याची व उत्पादन व वितरण बिंदूंची योजना
vii. सर्व उपभोक्त्यांच्या व वाहण्याच्या मीटरची देखभालीची योजना
viii. संपूर्ण पुरवठा क्षेत्रातील तपशीलवार घरगुती सर्वेक्षण करण्याची योजना

ix. उपभोक्त्यांच्या तक्रारी नोंदविण्याची व त्यावर देखरेख ठेवणारी प्रणाली तयार करण्यासाठीची योजना

x. संगणकीकृत देयके व वसुली प्रणाली बसविण्याची योजना

xi. प्रणाली मध्ये पाणी गळती कमी करण्यासाठीची योजना

xii. पुरवठा केलेल्या पाण्याची वाहून नेण्याचे उपाय व योजना

xiii. पूर्वनियोजित उत्पादन व वितरण बिंदूपाशी योग्य दबाव पातळी ठेवण्यासाठी तपशीलवार योजना सवलतधारक व औरंगाबाद महानगरपालिका यांनी ठरवायची आहे.

xiv. अंतिम उपयोगकर्त्यांच्या संख्येतील वाढीमुळे किंवा भौगोलिक क्षेत्रामध्ये वृद्धी झाल्यामुळे भविष्यातील वाढते पुरवठा क्षेत्र समाविष्ट करून घेण्यासाठी योजना.

xv. तपशीलवार कर्मचारी अभिनियोजन योजना

आ) कार्य योजनेचा मसुदा सादर केल्यानंतर ३० (तीस) दिवसांच्या आत, सवलतधारक, स्वतंत्र अभियंता, औरंगाबाद महानगरपालिका व औरंगाबाद महानगरपालिकेने कोणी सल्लागार निमंत्रित केला असल्यास ,हे कार्य योजनेच्या मसुद्यावर चर्चा करण्यासाठी व तो मंजूर करण्यासाठी भेटतील. औरंगाबाद महानगरपालिका सवलतधारकाकडून आवश्यक ते स्पष्टीकरण मागू शकेल व सवलतधारकाने औरंगाबाद महानगरपालिकेकडून अशी स्पष्टीकरणाची विनंती प्राप्त झाल्यावर ७ (सात) दिवसांचे आत त्यावर उत्तर द्यावयाचे आहे.  सवलतधारकाच्या स्पष्टीकरणानंतर औरंगाबाद महानगरपालिकेचे समाधान झाले असल्यास, औरंगाबाद महानगरपालिकेने असे स्पष्टीकरण प्राप्त झाल्यानंतर १५ (पंधरा) दिवसांचे आत कार्य योजनेचा मसुदा मंजूर केला पाहिजे. अन्यथा कार्य योजनेचा मसुदा औरंगाबाद महानगरपालिकेने मंजूर केला असल्याचे मानले जाईल.  औरंगाबाद महानगरपालिकेची मंजुरी अकारण अडवून ठेवली जाणार नाही व अशा मंजूर योजनेला “ **बांधकाम व पुनर्वसन कार्य योजना** “ असे संबोधले जाईल व नियत दिनांकाच्या दिवशी ही बांधकाम व पुनर्वसन योजना कराराच्या अनुसूची १२ चा भाग बनेल.  सवलतधारक मान्य करतो की या करारान्वये औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



महानगरपालिकेला बांधकाम व पुनर्वसन योजनेशी संबंधित सर्व नोटिसांची प्रत स्वतंत्र अभियंता व औरंगाबाद महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या सल्लागाराला सुद्धा दिली जाईल. औरंगाबाद महानगरपालिकेने मंजूर कार्य योजनेवर चर्चा करण्यासाठी व स्पष्टीकरण ती योजना सादर केल्यानंतर ३० (तीस ) दिवसांच्या आत मागितले नाही, तर औरंगाबाद महानगरपालिकेने तो मंजूर केला असल्याचे मानले जाईल.

## १५.३ प्रकल्पातील टप्पे

अ) बांधकाम व पुनर्वसन योजनेच्या मसुद्याचा एक भाग म्हणून सवलतधारक स्वतःच्या खर्चाने खालील प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका व स्वतंत्र अभियंत्याला बनवून सादर करेल :

i. बांधकाम व पुनर्वसनाच्या कालावधीत पूर्ण करावयाच्या १२ (बारा) त्रैमासिक प्रत्यक्ष टप्प्याच्या (ज्या प्रत्येकाचा उल्लेख प्रकल्पाचा टप्पा योजनेचा मसुदा
ii. प्रकल्पाच्या प्रत्येक टप्प्यासाठी निधीची आवश्यकता
iii. प्रकल्पाच्या प्रत्येक टप्प्यासाठी सवलतधारक देणार असलेले अंशदान
iv. प्रत्येक टप्प्याचे ८५% (पंच्यांशी टक्के ) पूर्णत्व व १०० % (शंभर टक्के) पूर्णत्व वस्तुनिष्ठपणे पडताळून पाहता येईल अश निकषांचे विस्तृत वर्णन

विकासाच्या टप्प्यांची ही योजना औरंगाबाद महानगरपालिकेने द्यावयाच्या मान्यतेच्या अधीन राहून बांधकाम व पुनर्वसन कार्य योजनेचा एक भाग बनेल व नियत दिनांकाच्या दिवशी ह्या कराराच्या अनुसूची १२ चा भाग होईल.

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



## १५.४ प्रकल्पाचे विनिर्देश

सवलतधारक बांधकाम व पुनर्वसन कार्य योजना, प्रकल्पाचे मैलाचे दगड, प्रकल्पा विनिर्देश व या करारा मध्ये नमूद केलेल्या इतर अटी व शर्ती प्रमाणे प्रकल्पाची अंमलबजावणी करेल.

## १५.५ प्रकल्पाच्या नकाशाचे रेखांकन बनविणे व त्यास मंजुरी

अ) पूर्वतयारीच्या कालावधीमध्ये सवलतधारक स्वखर्चाने नवीन सुविधांच्या नकाशाचे रेखांकन तयार करून अथवा तयार करवून घेऊन औरंगाबाद महानगरपालिका व स्वतंत्र अभियंता यांना त्यांच्या प्रत्येकाच्या अभिप्रयार्थ सादर करेल.

आ) जर औरंगाबाद महानगरपालिका व स्वतंत्र अभियंता यांना नकाशाच्या रेखांकनाविषयी काही हरकत असेल तर ते नकाशा रेखांकन प्राप्त झाल्याच्या दिनांकाच्या १० (दहा ) दिवसांच्या आत सवलतधारकाला याविषयी लेखी सूचित करतील व त्यावर खुलासा मागवून किंवा बदल किंवा सुधारणा सुचवू शकतील. त्यानंतर सवलतधारकाने अशी सूचना प्राप्त झाल्याच्या १० (दहा) दिवसांचे आत आवश्यक तो खुलासा स्वतंत्र अभियंता व औरंगाबाद महानगरपालिका यांना सादर करावयाचा आहे अथवा त्यांनी सुचविलेल्या सुधारणा वा बदल समाविष्ट करून सुधारित नकाशा रेखांकने सादर करावयाची आहेत. अशी सुधारित नकाशा रेखान्काने किंवा खुलासे प्राप्त झाल्याच्या १० दिवसांचे आत , औरंगाबाद महानगरपालिका व स्वतंत्र अभियंता त्यांचे शंका समाध झाले असल्यास, सवलतधारकाला आपली मंजुरी कळवू शकतात. जर औरंगाबाद महानगरपालिका व स्वतंत्र अभियंता यांचे समाधान झाले नाही तर औरंगाबाद महानगरपालिका व स्वतंत्र अभियंता यांच्या शंकांचे व आक्षेपांचे पूर्ण निराकरण होईपर्यंत उपरोल्लेखित पद्धती अवलंबली जाईल.

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



## १५.६ संकल्पचित्र व रेखांकने तयार कारणे व स्वतंत्र अभियंत्याने पुनर्विलोकन करणे.

अ) पूर्वतयारीच्या कालावधीत सवलतधारक स्वखर्चाने संकल्पचित्रे व रेखांकने तयार करेल अथवा तयार करून घेऊन ती पुनर्विलोकानासाठी औरंगाबाद महानगरपालिका व स्वतंत्र अभियंता यांचेकडे सुपूर्द करतील.

आ)अशी संकल्पचित्रे व रेखांकने सादर करून सवलतधारक फक्त एवढेच अभिवेदन व खात्री देतात की ही संकल्पचित्रे व रेखांकने ही प्रचलित कायद्यानुसार व सर्वोत्तम औद्योगिक प्रथांनुसार आहेत.

इ) स्वतंत्र अभियंता व औरंगाबाद महानगरपालिका व औरंगाबाद महानगरपालिकेला आवश्यक वाटल्यास, औरंगाबाद महानगरपालिकेचा एक समंत्रक हे सवलतधारकाने सादर केलेली संकल्पचित्रे रेखांकने, विनिर्देश व आकडेमोड यांचे पुनर्विलोकन करतील व खालील उपकलम (ई) च्या अधीन राहून आपले भाष्य अशी संकल्पचित्रे व रेखांकने प्राप्त झाल्याच्या ३० (तीस) दिवसांचे आत सवलतधारकाला कळवतील.

ई) जर स्वतंत्र अभियंता, औरंगाबाद महानगरपालिका व समंत्रक यांना सवलतधारकाने सादर केलेली संकल्पचित्रे रेखांकने, विनिर्देश व आकडेमोड याबद्दल काही आक्षेप असतील तर २१ (एकवीस) दिवसांचे आत कोणताही अनावश्यक विलंब न करता त्यांनी असे आक्षेप सवलतधारकाला सूचित करून त्यावर खुलासे, अथवा बदल, दुरुस्त्या, सुचवायाच्या आहेत. त्यावर सवलतधारक असे सूचित झाल्यावर १४ (चौदा) दिवसांचे आत स्वतंत्र अभियंता, औरंगाबाद महानगरपालिका व समंत्रक यांनी सुचविलेले बदल, दुरुस्त्या समाविष्ट करून ते योग्य त्या खुलाशासह सर्व स्वतंत्र अभियंता, औरंगाबाद महानगरपालिका व समंत्रक यांचेकडे सर्व संकल्पचित्रे रेखांकने, विनिर्देश व आकडेमोड पुनः सादर करावयाची आहेत.

उ) जर स्वतंत्र अभियंता, औरंगाबाद महानगरपालिका व समंत्रक यांनी त्यांना पुनः सादर केलेल्या संकल्पचित्रे रेखांकने, विनिर्देश व आकडेमोड यावर ३० (तीस ) दिवसांचे आत वरील (ई) प्रमाणे काही आक्षेप न घेतल्यास, स्वतंत्र अभियंता, औरंगाबाद महानगरपालिका व समंत्रक यांना त्या संकल्पचित्रे रेखांकने, विनिर्देश व आकडेमोड

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



यावर काही आक्षेप नाही असे मानले जाईल व त्यानुसार सवलतधारक प्रकल्पावर पुढील कार्यवाही करण्यास मोकळा असेल.

ऊ) संकल्पचित्रे व रेखांकने या संबंधी स्वतंत्र अभियंता व औरंगाबाद महानगरपालिका यांचे आक्षेप काहीही असोत, सवलतधारक हाच प्रकल्पाची अथवा त्याच्या कोणत्याही भागाच्या संकल्पचित्रे व रेखांकने यांच्या दोषाबाबत व /वा न्युनतेबाबत जबाबदार राहील व या करारानुसार सदैव जबाबदार व उत्तरदायी असेल.

ऋ)स्वतंत्र अभियंता व औरंगाबाद महानगरपालिका यांनी केलेले पुनर्विलोकन हे औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्वतःच्या माहिती करिता असेल व असे पुनर्विलोकन करून औरंगाबाद महानगरपालिका सवलतधारकाने प्रकल्पाच्या किंवा त्याच्या कुठल्याही भागाच्या केलेल्या कामाच्या गुणवत्तेची, किंवा त्याच्या मजबुतीची दायित्व घेत नाही. औरंगाबाद मनपा व स्वतंत्र अभियंता यांनी मनपाशी केलेल्या विचारविनिमयाच्या किंवा कोणत्याही पुनर्विलोकानाच्या निरपेक्ष, औरंगाबद मनपा प्रकल्पाची रेखांकने व संकल्पचित्रे व त्याच्या बांधकाम व अंमलबजावणी यांची अचूकता व पूर्णता याविषयी कुठल्याही तऱ्हेने जबाबदार व उत्तरदायी नाही.

ऌ) औरंगाबाद मनपा व स्वतंत्र अभियंता यांनी केलेल्या पुनर्विलोकांच्या परिणामस्वरूप औरंगाबाद मनपाने प्रकल्पाच्या किंवा त्याच्या कुठल्याही भागाच्या केलेल्या कामाच्या गुणवत्तेची, किंवा त्याच्या मजबुतीची दायित्व घेतली आहे असे सवलतधारक कुठल्याही व्यक्तीस अभिवेदन करणार नाही. या कराराच्या तरतुदीनुसार प्रकल्पाच्या किंवा त्याच्या कुठल्याही भागाच्या तांत्रिक सुसाध्यता, परिचालन योग्यता व विश्वासार्हता याबद्दल सवलतधारक पूर्णपणे जबाबदार असेल.

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



# १६) प्रतिनियुक्तीवरील कर्मचारी

## १६.१ प्रतीनियुक्तीच्या व मोबदल्याच्या शर्ती .

अ) औरंगाबाद मनपाच्या प्रतिनियुक्ती वरील सेवेच्या शर्तीच्या व कालावधीच्या अधीन राहून, प्रतिनियुक्तीवरील कर्मचारी प्रकल्पावर, औरंगाबाद मनपा मधून त्यांची सेवानिवृत्ती, किंवा या सवलतीच्या कालावधीची समाप्ती किंवा हा करार समाप्त होईपर्यंत, यापैकी जे प्रथम होईल त्या कालावधीपर्यंत पाखरले जातील व कलम १६ अमलात आणण्यासाठी औरंगाबाद मनपा त्यांच्या कर्मचाऱ्यांकडून संमती प्राप्त करेल

आ) ह्या कालावधीमध्ये प्रतिनियुक्तीवरील कर्मचारी हे औरंगाबाद मनपाचे कर्मचारी असतील, पण सवलतधारक, ते औरंगाबाद मनपाकडून त्यांना त्यांचे कर्मचारी म्हणून असतानाचे फायदे म्हणून जे मूळ वेतन, भविष्य निर्वाह निधी, वैद्यकीय सुविधा व इतर फायदे प्रतिनियुक्तीवरील कर्मचारी म्हणून देय असतील, अशी रक्कम त्यां कर्मचाऱ्याना देईल. त्याशिवाय नियत दिनांकानंतर , प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांचे उद्भवलेले कुठलेही दावे व उत्तरदायित्व सवलतधारकाकडून त्यांच्या खर्चाने चुकते केले जातील. कुठलाही संशय टाळण्यासाठी येथे हे स्पष्ट केले जाते की नियत दिनांकाआधी, प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांचे उद्भवलेले कुठलेही दावे व उत्तरदायित्व मनपाकडून त्यांच्या खर्चाने चुकते केले जातील. प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांच्या मोबाद्ल्यातील वार्षिक वेतनवाढीचा खर्च लागू असलेल्या कायद्याप्रमाणे सवलतधारक सोसेल. हे स्पष्ट केले जाते की नियत दिनांकापूर्वी प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांना देय असलेल्या कर्मचाऱ्यांच्या फायद्याच्या किंवा मोबदल्याच्या रकमा औरंगाबाद मनपा देईल व सवलतधारकाला फक्त नियत दिनांकानंतरच्या कालावधीसाठी, मग त्या नियत दिनांकानंतर देय झालेल्या असल्या तरीही, देय असलेल्या रकमा संबंधी उत्तरदायित्व राहील.

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



इ) सवलतधारक वेळोवेळी प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांचा प्रत्याभरण अहवाल सुपूर्द करेल, जेणेकरून मनपा त्यांच्या सेवा पुस्तिकेत त्याची नोंद करेल. प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांच्या बेशिस्त किंवा निष्काळजीपणामुळे काही आर्थिक / परिचालन उत्तरदायित्व उद्भवल्यास, सवलतधारक मनपा कडे अशा कर्मचाऱ्याविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्याची शिफारस करू शकेल व औरंगाबाद मनपा अशा प्रतीनियुकी वरील कर्मचाऱ्याविरुद्ध उचित कारवाई करेल.

ई) प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती ह्या लागू असलेल्या कायद्याप्रमाणे असतील. या कायद्यांमध्ये वार्षिक वेतनवाढ, बढती यांचा समावेश आहे, पण ते तेवढ्यापुरतेच मर्यादित नाही.

उ) प्रतिनियुक्तीवरील कर्मचारी प्रकल्पावर, औरंगाबाद मनपा मधून त्यांची सेवानिवृत्ती, किंवा या सवलतीच्या कालावधीची समाप्ती किंवा हा करार समाप्त होईपर्यंत, यापैकी जे प्रथम होईल त्या कालावधीपर्यंत काम करतील. अशा निवृत्ती नंतर त्याची पुनर्नियुक्ती वा त्याच्या बदल्यात कोणास घेणे हा सवलतधारकाचा अधिकार राहील

ऊ) प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र जल प्राधिकरण मंडळाने १८ एप्रिल १९९५ रोजी नेमलेल्या व वेळोवेळी दुरुस्त व बदल केलेल्या "जल विभागातील कर्मचाऱ्यांचा भाग व दायित्व " प्रमाणे भाग व दायित्व असेल

**१६.२ सवलतधारकाने प्रतीनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांना नोकरी देण्याबाबत**

कुठलीही शंका न येण्यासाठी येथे हे निसंदिग्धपणे स्पष्ट केले जाते की

अ) सवलतधारकाने प्रतीनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांना नोकरी देण्याबाबत कुठलाही आक्षेप नाही.

आ)पण जर प्रतीनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांने सवलतधरकाकडे सवलतीच्या काळात नोकरी स्वीकारल्यास ( म्हणजेच तो प्रतीनियुक्तीवरील कर्मचारी न राहिल्यास) तो औरानागाबाद मनपाचा कर्मचारी असणार नाही.

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



इ) अनुसूची १३ मध्ये यादी केलेले विशिष्ट कर्मचारीच फक्त प्रतिनियुक्तीवरील कर्मचारी असतील.

## १७ बांधकाम व पुनर्वसन कालावधीतील जबाबदाऱ्या

### १७.१ रेखांकने

वाणिज्यिक परीचालनाच्या दिनांकाच्या ९० (नव्वद) दिवसांचे आत, सवलतधारक औरंगाबाद मनपा कडे प्रत्यक्ष बांधलेल्या (किंवा पुनर्वसित ) सुविधांचे परावर्तन असलेली रेखांकने ३ प्रतींमध्ये औरंगाबाद मनपाला सादर करावयाची आहेत.

### १७.२ बांधकाम व पुनर्वसनाच्या जबाबदाऱ्या

उभय पक्ष कराराच्या कलम १८ चे नुसार जे बांधकाम व पुनर्वसन संदर्भातील सर्व कार्याचे संबंधातील संबंध जसे निरीक्षण, पूर्णत्व, बदल, मोजमाप, मूल्यमापन व अन्य अशा बाबी अनुशासित करते, त्याच्या आवश्यकतांचे पालन करतील.

### १७.३ वाणिज्यिक परिचालन दिनांक पूर्व सेवा पातळी आवश्यकता

बांधकाम व पुनर्वसन कालावधीमध्ये सवलतधारक प्रकल्पाचे परिचालन व देखभाल करेल व पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा सेवा क्षेत्रातील अंतिम उपयोगकर्त्यांना वाणिज्यिक परिचालन दिनांक पूर्व सेवा पातळीवर होण्याची काळजी घेईल.

### १७.४ वाणिज्यिक परिचालन दिनांक पूर्व सेवा चाचणी आवश्यकता

बांधकाम व पुनर्वसन कालावधीमध्ये सवलतधारक अनुसूची १४ मध्ये नमूद केल्यानुसार पाण्याच्या गुणवत्तेच्या चाचण्या घेईल.

## १७.५ बेकायदेशीर जोड नियमित करणे

लागू कायद्याच्या अधीन राहून, बांधकाम व पुनर्वसन कालावधी मध्ये सवलतधारक शक्यतोवर , बांधकाम व पुनर्वसन कार्य योजनेनुसार पुरवठा क्षेत्रातील बेकायदेशीर जोड, नियमित करतील. लागू कायद्याच्या अधीन राहून, सवलतधारकाने विनंती केल्यास औरंगाबाद मनपा असे बेकायदेशीर जोड नियमित करण्यासाठी रास्त साहाय्य करेल.

## १७.६ बांधकाम व पुनर्वसन कालावधीमध्ये औरंगाबाद मनपा तर्फे करावयाची कार्ये

अ) बांधकाम व पुनर्वसन कालावधीमध्ये सवलतधारक

i. वाणिज्यिक परिचालन दिनांक पूर्व जोड व तोड कार्यपद्धतीनुसार पुरवठा क्षेत्रातील कुठल्याही आवाराला पिण्या योग्य पाण्याचा पुरवठा जोडू, तोडू किंवा बदलू शकतो.
ii. औरंगाबाद मनपा च्या वतीने व त्यांनी पुरविलेल्या संरुपानुसार वाणिज्यिक परिचालन दिनांक पूर्व शुल्काच्या आधारावर अंतिम उपयोगकर्त्यांवर द्विमासिक देयके काढेल.
iii. कलम २२.२ नुसार औरंगाबाद मनपा च्या वतीने अंतिम उपयोगकर्त्यांकडून उपयोग शुल्काची वसुली करतील.
iv. नियत दिनांका पुर्वी औरंगाबाद मनपाला देय असलेल्या अंतिम उपयोगकर्त्यांकडून पाण्याच्या देयकांची थकबाकी वसूल करणार

सवलतधारक, वरील कलम १७.६ मधील कार्ये औरंगाबाद मनपाच्या वतीने हा करार व लागू कायद्याच्या शर्तीवर हाती घेईल. उपयोग शुल्क न भरल्यास सवलतधारक जल उपविधीच्या तरतुदीनुसार कारवाई करेल. पाणीजोड तोडण्याच्या बाबतीत औरंगाबाद मनपा सवलतधारकाला पोलीस संरक्षण मिळण्यासाठी सर्व शासकीय निमित्तत्वाकडे साहाय्य करेल.

आ ) बांधकाम व पुनर्वसन कालावधी दरम्यान, औरंगाबाद मनपा सवलतधारकाला, अनुसूची ८ मध्ये तपशीलवार दिल्याप्रमाणे, नियत दिनांकापूर्वीच्या कालावधी साठीची औरंगाबाद

मनपाला देय असलेली पाण्याची थकबाकी अंतिम उपयोगकर्त्यांकडून वसूल करण्यापोटी प्रोत्साहन भत्ता प्रदान करेल .

## १८ ) बांधकाम व पुनर्वसनाचे कार्य

### १८.१ सामान्य

सवलतधारक या करारातील तरतुदी, बांधकाम व पुनर्वसन कार्य योजना, प्रकल्पाचे मैलाचे दगड, प्रकल्पा विशिष्ट बाबी व स्वतंत्र अभियंत्याच्या भाष्य / अभिप्राया नुसार प्रकल्पा सुविधांच्या बांधकाम व पुनर्वसनाचे कार्य पार पाडेल.

### १८.२ बांधकाम व पुनर्वसन कार्यावर देखरेख व निगराणी ठेवणे

बांधकाम व पुनर्वसन कालावधी मध्ये सवलतधारक प्रकल्पा सुविधेवरील बांधकाम व पुनर्वसनाच्या कामाचा मासिक प्रगती अहवाल औरंगाबाद मनपा व स्वतंत्र अभियंता यांना सादर करतील.

### १८.३ स्वतंत्र अभियंत्याचा भाग

अ) स्वतंत्र अभियंता ह्या करारामध्ये नमूद केलेल्या जबाबदाऱ्या पार पाडेल.

आ) या करारानुसार व औरंगाबाद मनपा व सवलतधारक यांनी स्वतंत्र अभियंत्याच्या नियुक्तीकरिता मान्य केलेल्या कार्यकक्षेनुसार, स्वतंत्र अभियंता

i. बांधकाम व पुनर्वसन कालावधी मध्ये दर दोन आठवड्यांनी किंवा स्वतंत्र अभियंत्याना योग्य वाटेल अशा योग्य कालावधीने प्रकल्पाच्या जागेचे निरीक्षण करतील

ii. बांधकाम व पुनर्वसन कार्य योजने नुसार प्रकल्पाचे टप्पेपूर्ण झाले आहेत काय, प्रकल्पा विशिष्ट गुणवत्ता व प्रकल्पा सुविधांचे परिचालन हे सेवा पातळी करारानुसार होत आहे काय, याचे परीक्षण करतील.

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



इ) कलम १८.३ (आ) मधील अपेक्षेनुसार प्रकल्पा सुविधांचे परीक्षण करण्यासाठी स्वतंत्र अभियंता सवलतधारकाच्या खर्चाने प्रकल्पातील टप्पा पूर्ण झाला आहे अथवा नाही हे तपासण्यासाठी प्रकल्प सुविधा तपासू शकतात.

## १८.४) प्रकल्पा सुविधांचे प्रमाणीकरण

अ) सवलतधारक हा बांधकाम व पुनर्वसन कार्य योजना, प्रकल्पाचे टप्पेव प्रकल्प विनिर्दिष्ट नुसार प्रकल्पा सुविधांच्या पुनर्वसन, विकास, अंमलबजावणी, सुरवात, चाचणी व क्रीयान्वायान करणेसाठी जबाबदार राहील.

आ)वरील (अ) च्या अधीन राहून, स्वतंत्र अभियंता प्रकल्पाच्या प्रत्येक टप्प्यासंदर्भात पूर्णत्वाचा दाखला देईल.

इ) प्रकल्प सुविधांचे प्रमाणीकरण हे  बांधकाम व पुनर्वसन कार्य योजना, प्रकल्पाचे टप्पेयामध्ये नमूद कार्यपद्धती व वेळेच्या मर्यादेनुसार होईल.  प्रकल्प सुविधांचे प्रमाणीकरणाची सुरवात करण्यापूर्वी सवलतधारकाने औरंगाबाद मनपा व स्वतंत्र अभियंता यांना कमीतकमी ३० (तीस) दिवस आधी सूचित केले पाहिजे.

ई) प्रकल्पा सुविधांच्या प्रमाणीकरणासाठी व चाचणीसाठी लागणारे साहित्य व त्याचा खर्च सवलतधारक सोसेल.

उ) औरंगाबाद मनपाच्या पूर्व लेखी संमतीने, सवलतधारकाच्या विनंतीवरून स्वतंत्र अभियंता, प्रकल्पा सुविधांचे काम पूर्ण झालेले नसले आणि / किंवा प्रकल्प सध्या सेवा पातळी कराराच्या आवश्यकता पूर्ण करीत नसला तरीही सवलतधारकाला परिचालन व देखभाल कालावधीच्या जबाबदाऱ्या किंवा त्याचा काही भाग सुरु करण्याची परवानगी दिली जावी असा  कार्यात्मक पूर्णत्वाचा दाखला देऊ शकतील. अशा प्रामाणिकरणाला “अंशतः वाणिज्यिक परिचालन दिनांक” असे संबोधले जाईल.

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



ऊ) सर्व टप्पेपूर्ण झाल्याचे प्रमाणित झाल्यावर स्वतंत्र अभियंता वाणिज्यिक परिचालन दिनांकाचे प्रमाणपत्र जरी करतील.

ऋ)उपकलम १८.४ (उ) नुसार अंशतः वाणिज्यिक परिचालन दिनांक प्रमाणित करताना स्वतंत्र अभियंता त्यांच्या व सवलतधारकाच्या संयुक्त स्वाक्षरीने शिल्लक मुद्द्यांची एक यादी जारी करतील ( शिक्षात्मक यादी ). सवलतधारकाने शिक्षात्मक यादीतील मुद्दे ,अंशतः वाणिज्यिक परिचालन दिनांक प्रमाणित झाल्याच्या ९० (नव्वद) दिवसांचे आत पूर्ण करावयाचे आहेत. अशा शिक्षात्मक यादीतील मुद्द्यांचे पूर्णत्व झाल्याचे स्वतंत्र अभियंत्यांचे समाधान झाल्यानंतर, स्वतंत्र अभियंता सवलतधारकाला अभियंता वाणिज्यिक परिचालन दिनांकाचे प्रमाणपत्र जरी करतील.

## १८.५ कामाशी संबंधित दोषनिवारक उपाय

बांधकाम व पुनर्वसन कालावधीमध्ये जर प्रकल्प सुविधांचे काम हे बांधकाम व पुनर्वसन कार्य योजना, प्रकल्पाचे मैलाचे दगड, प्रकल्पाचे विशिष्ट किंवा सेवा पातळी करार यामध्ये नमूद कार्यपद्धती किंवा लागू कायदा व सर्वोत्तम औद्योगिक प्रथांनुसार होत नसेल तर आवश्यक ते दोषनिवारक उपायांची शिफारस करण्याचा स्वतंत्र अभियंत्यांना अधिकार राहील. सवलतधारकाला मनपाच्या किंवा स्वतंत्र अभियंत्यांच्या अशा शिफारसी मान्य करून आवश्यक ते दोषनिवारक उपाय योजावे लागतील.

## १८.६ प्रकल्पाचे टप्पेपूर्ण करण्यासाठी विलंब व मुदतवाढ

विलंबामुळे टप्पेपूर्ण होत नसल्यास, टप्पा पूर्ण करण्यासाठी दोन्ही पक्षांनी मुदतवाढीचा लेखी करार केला असल्यास किंवा खालील कारणामुळे विलंब होत असल्यास ( सवलतधारकाच्या कासुरीमुळे थेट नसल्यास ) मुदतवाढ मिळू शकेल.

अ) सवलतधारकाला त्याच्या हातात नसलेल्या कारणामुळे परवाने मिळण्यात

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा



आ)प्रकल्प सुविधांच्या बांधकाम व पुनर्वसन कार्यामध्ये अडथळे आणणाऱ्या सुविधा ( जसे वायू नलिका, तारेचे खांब ई. ) दूर करण्यात

इ) प्रकल्पामध्ये आवश्यक अशा साहित्याची काहीच किंवा कमी तरतूद असल्यामुळे

ई) अपरिहार्य कारणामुळे

उ) या करारानुसार मनपा कडून दायित्व चा भंग झाल्यास

ऊ) बांधकाम व पुनर्वसन कार्य योजनेनुसार किंवा प्रकल्प विशिष्ट नुसार काम होत नसल्यामुळे, स्वतंत्र अभियंत्याच्या शिफारशीनुसार काम निलंबित केल्यास

ऋ)औरंगाबाद मनपा किंवा तृतीय पक्षाच्या एखाद्या कृती किंवा टाळाटाळी मुळे सवलतधारकाच्या प्रकल्पाच्या जागी जाण्याच्या हक्कावर प्रतिकूल परिणाम झाल्यामुळे

ऌ) कलम ३५ नुसार औरंगाबाद मनपा ने हस्तक्षेप केल्यास

ऍ) कलम ७.३ नुसार प्रकल्प जागी प्रतिकूल परिस्थिती असल्यास

ऐ) कामाच्या व्याप्तीत बदल झाल्यास

ए) कायद्यात बदल झाल्यास

अशा बाबीमध्ये सम्बंधित प्रकल्प टप्पा पूर्णत्वाचा कालावधी, स्वतंत्र अभियंत्याच्या अभिप्रयानुसार रास्त मुदतवाढ दिली जाईल, जेणे करून सवलतधारक विलंब न होता ज्या परिस्थितीत असता, त्या परिस्थितीत असेल.

## १९ प्रकल्प अनुदान व वार्षिक परिचालन मदत अनुदान

### १९.१ प्रकल्पा अनुदानाची सामान्य तत्वे

अ) दोन्ही पक्ष याची पोच देतात की औरंगाबाद मनपाला केंद्र व महाराष्ट्रा शासनाकडून प्रकल्पास निधी (**निधी अनुदान** ) म्हणून रु ३,९९,५३,००,०००/- ( रुपये तीनशे नव्व्याणव

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



कोटी त्रेपन्न लाख) प्राप्त होणार आहे. दोन्ही पक्ष याचीसुद्धा पोच देतात की औरंगाबाद मनपाला हे अनुदान मिळण्यासाठी :-

i. औरंगाबाद मनपाला केंद्र शासन व महाराष्ट्रा शासनाने लादलेल्या काही आवश्यकतांचे पालन करावे लागेल. अशा आवश्यकता ह्या प्रकल्पाशी संबंधित असतीलच असे नाही.

ii. हा प्रकल्प सवलतधारकाने अनिवार्य प्रकल्प आवश्यकतेनुसार व डीपीआर नुसार अंमलबजावणी करावयाचा आहे.

आ ) एकदा औरंगाबाद मनपाला केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाकडून प्रकल्प अनुदान प्राप्त झाल्यावर, औरंगाबाद मनपा सवलतधारकाला अनुसूची ७ मध्ये नमूद केलेल्या वेळ मर्यादेनुसार व रकमांच्या हस्त्यांमध्ये प्रदान करेल. अनुसूची ७ मध्ये नमूद केलेल्या वेळ मर्यादेनुसार व आधीच्या रकमांच्या हस्त्यांच्या कमीतकमी ८५% निधीचा उपयोग केल्यावर व स्वतंत्र अभियंत्याने प्रमाणित केलेले प्रकल्प अनुदान उपयोगिता प्रमाणपत्र औरंगाबाद मनपाला मिळाल्यावर, अनुवर्ती हस्त्यांचे प्रदान केले जाईल. औरंगाबाद मनपा, प्रकल्पा अनुदानाच्या कोणत्याही हस्त्याच्या ७०% रक्कम उपयोगित झाल्याचे स्वतंत्र अभियंत्याने प्रमाणित केल्यानंतर तीन दिवसांच्या कालावधीत उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनाला व राज्य शासनाला पाठवून देईल.

वाणिज्यिक परिचालन दिनांकापर्यंत, प्रकल्प अनुदानाच्या प्रत्येक हस्त्यातील ५% ( पाच टक्के ) रक्कम बिनव्याजी तत्वावर आकस्मिक राखीव निधी (आकस्मिक राखीव निधी ) म्हणून ठेऊन घेण्याचा अधिकार, औरंगाबाद मनपा राखून ठेवीत आहे.

इ ) ह्या करारपत्रातील यासंबंधी कहीही विचारात न घेता, जर केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाने औरंगाबाद मनपाला प्रकल्प अनुदान किंवा त्याचा काही भाग खालील कारणांमुळे रोखून धरले / विलंब केला

i. कलम १९.१ (अ)(१) मध्ये वर्णन केलेल्या आवश्यकता औरंगाबाद मनपाने पूर्ण केल्या नाहीत.

ii. सवलतधारकाने प्रकल्पाची अंमलबजावणी करताना डीपीआर नुसार केली नाही व याचे कारण सवलतधारक अनिवार्य प्रकल्पा आवश्याक्तांचे पालन करीत होता

iii. कोणत्याही कारणाने केंद्र शासन किंवा महाराष्ट्रा शासनाकडे ते आरोपित होत असल्यास व औरंगाबाद मनपा व सवलतधरकाकडे कोणत्याही कारणाने आरोपित होत नसल्यास

तर औरंगाबाद मनपा प्रकल्प अनुदानातील किंवा त्याच्या भागातील असा फरक भरून काढण्यासाठी आकस्मिक राखीव निधीतील ठेवलेली रक्कम वापरेल. जर आकस्मिक राखीव निधीतील ठेवलेली रक्कम सुद्धा हा फरक भरून काढण्यास कमी पडत असेल, तर सवलतधारकाला हा फरक भरून काढण्यासाठी स्वतःचा निधी उभारावा लागेल व त्यापोटी त्याला कलम १९.२ मधील नमूद अनुतोष मिळेल. असे विलंबित अनुदान प्राप्त झाल्यानंतर आकस्मिकता निधीतून अनुदानातील किंवा त्याच्या भागातील फरक भरून काढण्यासाठी प्रदान केलेला निधी समतुल्य पणे त्या निधीत ठेवला जाईल.

कुठलीही शंका टाळण्यासाठी येथे हे स्पष्ट केले जाते की सवलतधारकाने प्रकल्पाची अंमलबजावणी करताना डीपीआर नुसार केली नाही व याचे कारण सवलतधारक अनिवार्य प्रकल्प आवश्यकतांचे पालन हे नाही, या कारणाने केंद्र किंवा राज्य शासनाने प्रकल्प अनुदान किंवा त्याचा काही भाग खालील कारणांमुळे रोखून धरले / विलंब केला तर सवलतधारकाला ह्या करारान्वये कुठलीही सुट मिळणार नाही.

### १९.२ प्रकल्प अनुदान विलंबामुळे अथवा प्रदान न केल्याने मिळणारा अनुतोष

अ) जर औरंगाबाद मनपा कडून त्यांच्यावर आरोपित होणाऱ्या कृतीमुळ अथवा टाळाटाळीमुळे प्रकल्प अनुदान प्रदान करण्यात विलंब झाल्यास

i. सवलतधारकाला प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी स्वतःच्या खर्चाने निधी उभारणी करावी लागेल.

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



ii) औरंगाबाद मनपा सवलतधारकाने प्रकल्प अनुदानातील किंवा त्याच्या काही भागातील फरक भरून काढण्यासाठी कर्जाऊ घेतलेल्या अशा निधीवर जास्तीतजास्त १५% ( पंधरा टक्के ) वार्षिक व्याज अदा करेल. असे व्याज हे सवलतधारकाने असे कर्ज उचलल्याच्या दिनांकापासून दिले जाईल.

आ ) जर केंद्र शासन अथवा राज्य शासनाकडून त्यांच्यावर आरोपित होणाऱ्या कृतीमुळ अथवा टाळाटाळीमुळे प्रकल्प अनुदान प्रदान करण्यात विलंब झाल्यास

i) सवलतधारकाला प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी स्वतःच्या खर्चाने निधी उभारणी करावी लागेल.

ii) औरंगाबाद मनपा सवलतधारकाने प्रकल्प अनुदानातील किंवा त्याच्या काही भागातील फरक भरून काढण्यासाठी कर्जाऊ घेतलेल्या अशा निधीवर जास्तीतजास्त १५% ( पंधरा टक्के ) वार्षिक व्याज अदा करेल. असे व्याज हे सवलतधारकाने असे कर्ज उचलल्याच्या दिनांकापासून दिले जाईल.

इ ) औरंगाबाद मनपा कडून प्रकल्प अनुदान प्रदान करण्यात बांधकाम व पुनर्वसनाच्या कालावधी पेक्षा जास्त विलंब झाल्यास व त्यामुळे प्रकल्प अनुपलब्ध झाल्यास, सवलतधारकाला त्याच्या अशा अतिरिक्त गुंतवणुकीबद्दल / निधीबद्दल भरपाई मिळेल व प्रकल्प अनुदानातील फरक भरून काढण्यासाठी गुंतवलेल्या / निधी घेतलेल्या मुद्दलाएवढी असेल याची काळजी औरंगाबाद मनपा घेईल. या भरपाईची पद्धत खालीलप्रमाणे, पण तेवढ्या पूर्ती मर्यादित नसेल.

i. औरंगाबाद मनपाने सवलतधारकाला थेट प्रदान कारणे
ii. उपयोगकर्ता शुल्क वाढविणे ( अंतिम उपयोगकर्त्यांना ही किम्मत देता येत असल्यास )
iii. दोन्ही पक्षांनी मान्य केलेल्या अन्य उपायांनी
iv. सवलतीचा कालावधी जास्तीतजास्त १० वर्षांनी वाढवून

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



v. वरील ४ उपायांचे संयोगीकरण करून.

**१९.३ आकस्मिकता निधीत ठेवलेल्या रकमेचे प्रदान**

बांधकाम व पुनर्वसन कालावधी संपल्यानंतर औरंगाबाद मनपा आकस्मिकता निधीत ठेवलेली रक्कम ४ ( चार) सामन तिमाही हस्त्यांमध्ये सवलतधारकाला प्रदान करेल

**१९.४ वार्षिक परिचालन मदत निधीची सामान्य तत्वे.**

अनुसूची १५ मधील तरतुदीनुसार औरंगाबाद मनपा वार्षिक परिचालन मदत निधी प्रदान करेल.

**२० व्याप्तीतील बदल**

**२०.१ व्याप्तीतील बदलाची व्याख्या**

अ) औरंगाबाद मनपाला ह्या करारामध्ये योजलेल्या व प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट नसलेल्या अतिरिक्त कामाची तरतूद आवश्यक वाटू शकते.

आ) जर सवलतधारकाला कोणत्याही वेळी असे वाटले की अंतिम उपयोगकर्त्यांना उत्तम सेवा पुरविण्यासाठी किंवा प्रकल्पाची आर्थिक क्षमता वाढविण्यासाठी किंवा कार्यक्षम सेवा पुरविण्याच्या संबंधाने कोणत्याही कारणास्तव अतिरिक्त काम करायला पाहिजे, तर लेखी सूचना देऊन औरंगाबाद मनपाला अतिरिक्त कामांच्या तरतुदीचा विचार करावयास लावू शकतात. (यानंतर याचा उल्लेख “**व्याप्तीतील बदल** “ असा केला आहे )

इ) व्याप्तीतील कुठलाही बदल हा कलम २० च्या तरतुदीनुसारच होईल व परिणामी वाढलेला खर्च सवलतधारक सोसेल व औरंगाबाद मनपा कलम २० नुसार तो प्रतिपूर्त करेल

**२०.२ औरंगाबाद मनपा हद्द वाढ हा मानीव व्याप्ती बदल**

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



जरी सवलतीच्या कालावधीमध्ये पुरवठा क्षेत्र हे औरंगाबाद मनपाच्या हद्दीप्रमाणे सीमांकित केले असले तरीही हा करार निष्पादित केल्याच्या दिनांकानंतर औरंगाबाद मनपाच्या हद्दीमध्ये वाढ झाली तरी प्रकल्पाच्या व्याप्तीत हा मानीव बदल समजून सवलतधारकाला अशा वाढीव हद्दीला सेवा पुरविल्याबद्दल वाढीव मोबदला देण्याची पद्धत व कार्य प्रणाली कलम २०.४, २०.५ व २०.६ प्रमाणे असेल.

२०.३ **व्याप्तीतील बदलाची कार्यप्रणाली**

अ) अ) जर औरंगाबाद मनपाला कलम २०.१(अ) नुसार व्याप्तीत बदल आवश्यक वाटत असेल किंवा औरंगाबाद मनपा सवलतधारकाने कलम २०.१.(आ) नुसार प्रस्तावित केलेल्या बदलाशी संमत असेल तर औरंगाबाद मनपा सवलतधारक व स्वतंत्र अभियंता यांना व्याप्तीतील बदलामुळे अपेक्षित कार्य व सेवा यांचा रास्त तपशील देईल. **("व्याप्तीतील बदल " सूचना )**

आ)अशी व्याप्तीतील बदलाची सूचना प्राप्त झाल्यानंतर, सवलतधारक महानगरपालिका व स्वतंत्र अभियंता यांना पुरेशी काळजी घेऊन त्याच्या समर्थनार्थ प्राथमिक कागदपत्रांसह खालील माहिती पुरवतील

i. जर प्रस्तावित कार्य किंवा सेवा बांधकाम कालावधीत करावयाचे असल्यास व्याप्तीतील बदलामुळे प्रकल्पातील टप्पेसाध्य करण्यावर होणारा असल्यास, परिणाम.

ii. हा व्याप्तीतील बदल अनुपालन करण्यासाठी सवलतधारकाला येणारा खर्च ( महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने औरंगाबाद विभागाकरीता तयार केलेल्या साहित्य व मजुरीच्या तत्कालीन प्रचलित दराची मर्यादा न बाळगता समाविष्ट करणे )

iii. प्रस्तावित व्याप्तीतील बदल व त्याचे परिणाम यांची अंमलबजावणी करण्यासाठी, असल्यास, काही पर्याय. प्रत्येक पर्यायामध्ये अंमलबजावणीसाठी लागणारी किंमत व वेळ, कामातील बदलामुळे काम ठप्प होण्याच्या तपशीलासह, यांचा पुरेशा तपशील नमूद करणे आवश्यक आहे.

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



इ) जर औरंगाबाद मनपा ने व्याप्तीतील बदलास सुरवात केलीच, तर स्वतंत्र अभियंत्याने रास्त म्हणून प्रमाणित केलेल्या मर्यादेत, कलम २०.३ (आ) मध्ये नमूद केलेल्या माहितीच्या व कागदपत्रांच्या पूर्ततेच्या खर्चाची परिपूर्ती औरंगाबाद मनपा सवलतधारकाला करेल.

ई) कलम २०.३ (इ) मध्ये नमूद माहिती व कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर, स्वतंत्र अभियंता, औरंगाबाद मनपा व सवलतधारक यांच्याशी सल्लामसलत करून व्याप्तीतील बदलाच्या अशा विनंतीचे निर्धारण व खातरजमा (वेळापत्रक व किंमत यांच्यावरील परिणाम समाविष्ट) करतील, व उपकलम २०.३(आ) मध्ये नमूद केलेली माहिती प्राप्त झाल्यापासून ९० (नव्वद) दिवसांचे आत प्रस्तावित व्याप्तीतील बदलावरील आपला अहवाल औरंगाबाद मनपाला सादर करतील. जर औरंगाबाद मनपाने व्याप्तीतील बदल पुढे न्यावयाचे ठरविले, तर ते सवलतधारकाला

i. कलम २०.३ (आ) ( iii) मध्ये नमूद पर्यायांपैकी निवडलेला पर्याय
ii. अतिरिक्त काम असल्यास, व्याप्तीतील बदलासाठी मोबदल्याची प्रस्तावित पद्धत.

कळवतील.

उ) स्वतंत्र अभियंता, कलम २०.४ च्या अधीन राहून, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने औरंगाबाद विभागाकरीता तयार केलेल्या साहित्य व मजुरीच्या तत्कालीन प्रचलित दराच्या आधारावर किंमत ठरवून देतील. जर व्याप्तीतील बदलतील काही बाबी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने औरंगाबाद विभागाकरीता तयार केलेल्या साहित्य व मजुरीच्या तत्कालीन प्रचलित दरात नमूद केल्या नसतील तर स्वतंत्र अभियंता प्रचलित बाजारभावावर आधारित त्या बाबींची किंमत ठरवतील.

ऊ) कलम २०.३ (आ) ( iii) मध्ये नमूद पर्यायांपैकी पर्याय निवडल्यानंतर व काम पूर्ण करण्यासाठी मोबदल्याची पद्धत ठरविल्यानंतर, औरंगाबाद मनपा सवलतधारकाला व्याप्तील बदल हाती घेण्यासाठी कार्यादेश जारी करेल. (“व्याप्तीतील बदल आदेश” ).

ऋ)व्याप्तीतील बदल आदेश दोन्ही पक्षांवर बंधनकारक असेल. व्याप्तीतील बदल आदेशाच्या अंमलबजावणीतील किंमत व वेळ याबाबतीतील वादाचा विचार न करता,

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा



सवलतधारकाने व्याप्तीतील बदल आदेशानुसार काम पुढे न्यावयाचे आहे. ह्या वादाचा निर्णय होईतोवर, व्याप्तीतील बदल आदेशानुसार काम पूर्ण झाल्यानंतर, औरंगाबाद मनपा सवलतधारकाला. स्वतंत्र अभियंत्याने रास्त म्हणून प्रमाणित केलेली किम्मत अधिक सवलतधारकाने दावा केलेली रक्कम व स्वतंत्र अभियंत्याने रास्त म्हणून प्रमाणित केलेली किम्मत यामधील फरकाच्या अर्धी रक्कम, एवढी रक्कम प्रदान करेल. अंतिम समायोजन कलम ३७ नुसार नमूद वाद निर्मुलन कार्यप्रणालीनुसार वाद निर्मुलन झाल्यावर केले जाईल.

## २०.४ व्याप्तीतील बदलाबद्दल मोबदला

कलम २०.३ (ऊ) काहीही नमूद केले असले तरी, सवलतधारकाला व्याप्तील बदलाबद्दल मिळणारी मोबदल्याची रक्कम ही, ह्या व्याप्तीतील बदलामुळे सवलतधारकाला व्याप्तीतील बदलाशिवाय, एरवी मिळणाऱ्या अंतर्गत नफा दरावर काहीही परिणाम होणार नाही, अशा पद्धतीने ठरविली जाईल.

## २०.५ व्याप्तीतील बदलामुळे प्रकल्प खर्चातील बचत.

व्याप्तीतील बदलामुळे प्रकल्प खर्च कमी झाल्यास सवलतधारक कमी झालेल्या खर्चाच्या प्रमाणात प्रकल्प अनुदान औरंगाबाद मनपाला परत करेल. ( म्हणजेच व्याप्तीतील बदलामुळे प्रकल्प खर्च ३% (तीन टक्के ) कमी झाल्यास सवलतधारक ३% (तीन टक्के )प्रकल्प अनुदान औरंगाबाद मनपाला परत करेल.)

## २०.६ व्याप्तीतील बदलाबद्दल मोबदला

अ) व्याप्तीतील बदलाबद्दल औरंगाबाद मनपाने सवलतधारकाला द्यावयाच्या मोबदल्याची पद्धत दोन्ही पक्ष, कलम २०.३ ( ऊ), २०.३(उ) व २०.३ (ऋ) प्रमाणे व ती कलम २०.४ च्या आवश्यकता पूर्ण करेल, अशा पद्धतीने ठरवतील. या भरपाईची पद्धत खालीलप्रमाणे, पण तेवढ्या पूर्ती मर्यादित नसेल.

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



i. औरंगाबाद मनपाने सवलतधारकाला थेट प्रदान कारणे
ii. उपयोगकर्ता शुल्क वाढविणे ( अंतिम उपयोगकर्त्यांना ही किम्मत देता येत असल्यास )
iii. दोन्ही पक्षांनी मान्य केलेल्या अन्य उपायांनी
iv. सवलतीचा कालावधी जास्तीतजास्त १० वर्षांनी वाढवून
v. वरील ४ उपायांचे संयोगीकरण करून.

अ) औरंगाबाद मनपान सवलतधारकाला द्यावयाच्या मोबदल्याची पद्धत कलम २०.३ ( ऊ), २०.३(उ) व २०.३ (ऋ) प्रमाणे आहे व ती कलम २०.४ मधील मोबदल्याच्या तत्वाची अपेक्षा पूर्ण होईल, ह्याची काळजी घेईल.

आ)व्याप्तीतील बदलाचे काम पूर्ण झाल्यावर, औरंगाबाद मनपाला कामातील अचूकता ठरविण्यासाठी रास्तपणे पुरेशी असेल, असे कागदपत्रासह विवरण, सवलत धारक औरंगाबद मनपाला सादर करेल.

## २१ परिचालन व देखभाल कालावधीतील जबाबदाऱ्या

### २१.१ देखभाल व दुरुस्ती

अ) सवलतधारक परिचालन व देखभाल कालावधी मध्ये प्रकल्प सुविधांचे सर्वोत्तम औद्योगिक प्रथांनुसार परीचालन व देखभाल करेल व सेवा पातळी कराराच्या आवश्यकता पूर्ण करण्यासाठी चांगले काम करण्याच्या अवस्थेत ठेवेल व सवलत कालावधी संपल्यानंतर वा करार आधी समाप्त झाल्यास, त्या, कलम ३४ .६ नुसार व त्याचा वापर लक्षात घेता सामान्य झीज व खराबी लक्षात घेऊन, चांगल्या कार्यावस्थेत असतील, याची काळजी घेईल.

आ)सवलतधारक त्या यंत्रणेचे उपयोगी आयुष्य समाप्त होण्याआधी स्वखर्चाने त्याच्या बदल्यात नवीन यंत्रणा बसविण्याच्या दृष्टीने नियोजन करेल व सर्वोत्तम

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



औद्योगीक प्रथांनुसार तशी बसवेल. प्रकल्पाचा कुठलाही भाग गहाळ, नुकसान वा नष्ट झाल्यास तो स्वखर्चाने त्वरित काळजीपूर्वक दुरुस्त करेल अथवा बदल्यात दुसरा बसवेल

इ) अनुसूची १४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे पाण्याच्या गुणवत्तेवर देखरेख करण्यासाठी सवलतधारक स्वखर्चाने स्त्रोत, परिष्करण व वितरण प्रणालीतून पाण्याचे नमुने गोळा करून त्याची चाचणी करेल.

## २१.२ परिचालन व देखभाल कालावधीत  पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा

परिचालन व देखभाल कालावधीच्या प्रत्येक दिवशी सवलतधारक सेवा पातळी आवश्यकतेनुसार पुरवठा क्षेत्रातील अंतिम उपयोगकर्त्यांना पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा करेल.  पिण्यायोग्य पाण्याची टंचाई असल्यास सवलतधारकाने घरगुती पुरवठ्याला प्रथम प्राधान्य दिले पाहिजे.

## २१.३ परिचालन व देखभाल कालावधीत औरंगाबाद मनपा तर्फे करावयाची कार्ये

अ) परिचालन व देखभाल कालावधी दरम्यान सवलतधारक

i. जोड व तोड कार्यप्रणाली नुसार पुरवठा क्षेत्रातील कोणत्याही आवराला पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा जोडणे तोडणे किंवा कमी जास्त करणे.

ii. अंतिम उपयोगकर्त्यांना दरमहा पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा केल्याबद्दल बिजके जारी करणे.  ह्या बिजाकांचे मूल्य अनुसूची १६ प्रमाणे मोजले जाईल.

iii. कलम २२.२ नुसार औरंगाबाद मनपाच्या वतीने अंतिम उपयोगकर्त्यांकडून उपयोग शुल्काची वसुली करणे.

आ) वरील कलम २१.३ (अ) नुसार सवलतधारकाने करावयाची कार्ये  औरंगाबाद मनपा तर्फे या कराराच्या अटी व शर्ती अनुसार व लागू कायद्याच्या आवश्यकतेनुसार हाती घ्यावयाची आहेत.

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



इ) सवलतधारकाने विनंती केल्यास औरंगाबाद मनपा, सवलतधारक हाती घेत असलेल्या तोड कार्यामध्ये रास्त साहाय्य करेल. अशा सहाय्यामध्ये सुरक्षा पुरविणे समाविष्ट असेल, पण ते तेवढ्यापुरते मर्यादित असणार नाही.

## २१.४ **पाण्याच्या प्रदानासाठी बिजके**

वाणिज्यिक परिचालन दिनांकोत्तर, सवलतधारक अनुसूची १७ मध्ये नमूद केलेल्या पद्धती नुसार औरंगाबाद मनपावर केलेल्या पाणी पुरवठ्यासाठी दरमहा बिजक काढेल.

## २१.५ **आर्थिक व प्रकल्प माहिती.**

सवलतधारक वेळोवेळी स्वतंत्र अभियंता, स्वतंत्र हिशेब तपासनीस, औरंगाबाद मनपा व औरंगाबाद मनपाच्या निर्देशांवरून औरंगाबाद मनपाचे सल्लागार किंवा कलम २१.५ (ऊ ) च्या बाबतीत कुठल्याही लागू तृतीय पक्षास , खालील कागदपत्रे व माहिती वेळोवेळी खालील उल्लेखित कालांतराने सादर करेल

अ) आर्थिक माहिती

i. सवलतधरकाचे आर्थिक वर्ष समाप्त झाल्यानंतर १८० (एकशे ऐंशी ) दिवसांचे आत वार्षिक लेख परीक्षण केलेले हिशेब (लागू कायद्याला अनुसरून )
ii. त्रैमासिक अपरिक्षित आर्थिक पत्रके (लागू कायद्याला अनुसरून ) असा कालावधी समाप्त झाल्यावर ३० (तीस ) दिवसांचे आत.
iii. कलम २१.४ प्रमाणे पाणी पुरवठ्याचे प्रत्येक बिजक
iv. सवलतधारकाच्या किंवा प्रकल्पाच्या आर्थिक परिस्थिती मध्ये काही महत्वाचे बदल झाले असल्यास , ते झाले असल्यास त्वरित.
v. कलम १८.२ नुसार बांधकाम व पुनर्वसन कार्याशी संबंधित, बांधकाम कार्याच्या प्रगतीचा समावेश असलेले सर्व अहवाल, अधिसूचना व माहिती.

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



vi. अनुसूची १८ नुसार परिचालन व व्यवस्थापन कार्याशी संबंधित, परीचालन कार्याच्या प्रगतीचा समावेश असलेले सर्व अहवाल, अधिसूचना व माहिती.

आ) अतिरिक्त माहिती

औरंगाबाद मनपा स्वतंत्र अभियंता, व स्वतंत्र हिशेब तपासनीस, यांच्या पैकी कोणीही प्रकल्पाची देखरेख करण्यासाठी रास्त विनंती करून काही माहिती मागितल्यास, गोपनीयतेच्या कर्तव्याचे आधीन राहून सवलतधारक ती सादर करेल.

इ) अंदाजपत्रक

प्रत्येक आर्थिक वर्ष्याच्या सुरवातीला सवलतधारक

i. त्याने मागील आर्थिक वर्षामध्ये पत्करलेला किंवा केलेला खर्च
ii. आर्थिक वर्षामध्ये अंदाजित भावी खर्च .

याचे विवरण औरंगाबाद मनपा स्वतंत्र अभियंता, व स्वतंत्र हिशेब तपासनीस यांना सादर करेल.

ई) प्रकल्पाची व महत्वाची करार्पत्रे.

i. सवलतधारक औरंगाबाद मनपाला प्रत्येक प्रकल्पाच्या कराराची ( ह्या करारा व्यतिरिक्त ) प्रत नियत दिनांकाच्या १० ( दहा ) दिवसांचे आत सादर करील.
ii. सवलतधारक औरंगाबाद मनपाला प्रकल्पाच्या प्रत्येक महत्वाच्या कराराची प्रत तो करार केल्याच्या दिनांकाच्या १० ( दहा ) दिवसांचे आत सादर करील.

उ) पर्यावरणीय व सामाजिक निर्धारण अहवाल

सवलतधारक पर्यावरणीय व सामाजिक निर्धारण अहवाला नुसार औरंगाबाद मनपाला किंवा कोणत्याही तृतीय पक्षाला कोणतेही कागदपत्रा सादर करेल.

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



## २१.६ सार्वजनिक गाऱ्हाण्यांची सोडवणूक व प्रकटन

अ) सवलतीच्या द्वितीय वर्षाच्या समाप्तीपूर्वी सवलतधारक औरंगाबाद मनपाच्या पर्यावेक्षणाखाली जनसंपर्क कार्यालय चालवेल व ते सर्वकाळी सार्वजनिक प्रवेशाकरिता खुले असेल. अशा कार्यालयामध्ये सवलतधारक दिवसाच्या वेळी कोणत्याही व्यक्तीच्या गाऱ्हाण्यांची नोंद ठेवण्यासाठी एक नोंदवही सुरु करेल. हे स्पष्ट केले जाते की नियत दिनांकाच्या किंवा जनसंपर्क कार्यालय निर्माण केल्यानंतर, जे आधी असेल ते. पहिली दोन वर्षे औरंगाबाद मनपा व सवलतधारक हे संयुक्तरीत्या सार्वजनिक गार्हण्यांची सोडवणूक करण्याच्या सध्याच्या पद्धतीचे संयुक्त व्यवस्थापन करतील.

आ) तक्रार नोंदणी पुस्तक हे सुरक्षितरीत्या बद्ध केलेले असले पाहिजे व जनसंपर्क कार्यालया मध्ये योग्य अभिराक्षेत ठेवले पाहिजे. तक्रार नोंदणी पुस्तकाच्या प्रत्येक पृष्ठाला व त्यातील प्रत्येक तक्रारीला सुद्धा क्रमांक दिले गेले पाहिजेत. तक्रार नोंदविल्यानंतर २४ (चोवीस ) तासात तक्रार करणाऱ्याला अशा कार्यालयाकडून तक्रारीचा क्रमांक व तारीख असणारी पावती दिली जाईल ज्याचा तक्रारदार पुढील पत्रव्यवहारात किंवा दाव्यात उपयोग करु शकतो. तक्रार नोंदवही मध्ये, तक्रार क्रमांक, तारीख, तक्रार करणाऱ्याचे नाव व पत्ता, तक्रार, व सवलतधारकाने त्यावर केलेली कारवाई इत्यादि योग्य असे रकाने असावेत,पण ते तेवढ्यापुरते मर्यादित असावेत असे नाही.

इ) कलम २१.६(ऊ) मध्ये काय तरतूद आहे याचा विचार न करता, सवलतधारक तक्रार नोंद्वाहीचे रोजच्या रोज निरीक्षण करून तक्रारीत मांडलेल्या प्रत्येक गाऱ्हाण्याचे ३ (तीन) दिवसांमध्ये निराकरण करून त्याची थोडक्यात नोंद “केलेली कारवाई” ह्या रकान्यामध्ये लिहील व तक्रारदाराला योग्य ते उत्तर पाठविले जाईल.

ई) सवलतधारक ग्राहकांना त्यांचे खाते व बिजक पाहता येईल व तक्रार नोंदविता येईल असे औरंगाबाद मनपा तर्फे नियंत्रित संकेतस्थळ निर्माण करेल. ह्या संकेतस्थळावर ग्राहकांना उपयोगी बाबी सेवा पातळी आवश्यकता सुद्धा तपशीलवारपणे नोंदविलेल्या असतील.

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



उ)सवलतधारक प्रत्येक महिन्याला ज्या तक्रारी नोंदविलेल्या आहेत अशा तक्रार नोंद्वाहीच्या पृष्ठांची छाया प्रत औरंगाबाद मनपाला पाठवेल. औरंगाबाद मनपा त्यांच्या स्वेछाधिकारात तक्रारीचे समाधानकारक निराकरण होण्याचे दृष्टीने योग्य अशी कारवाई करण्याचे निर्देश तक्रारदाराला देऊ शकतात.

**२१.७ सवलतधारकाच्या इतर जबाबदाऱ्या**

अ) सवलतधारक ह्या करारातील जबाबदाऱ्या पार पाडताना लागू असलेल्या सर्व कायद्याचे व सर्वोत्तम औद्योगिक प्रथांचे पालन करेल.

आ)सवलतधारक सर्व शासकीय निमितत्वांना त्यांची कर्तव्ये निभावण्यासाठी, ज्यामध्ये प्रकल्पाची बांधकाम, परिचालन , देखभाल व ह्या करारातील तरतुदींचे व लागू कायद्यातील तरतुदींचे पालन करण्यातील प्रगती तपासण्यासाठी प्रकल्पाच्या जागेला भेट देणे समाविष्ट आहे, रास्त वेळेला रास्त प्रवेश देईल.

इ) सवलतधारक स्वतंत्र अभियंता व लेखापरीक्षक यांना त्यांची प्रकल्पाशी संबंधित कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत करेल.

ई) सवलतधारक करारात अन्यथा तरतूद असल्याशिवाय, वीज, इंधन, दूरध्वनी, व इतर सुविधा वापरण्यासाठी व त्याचा भरणा करण्यासाठी त्या त्या प्रधिकारायांना थेट जबाबदार राहील

उ)ह्या प्रकल्पा सुविधाचे परिचालन व देखभाल करण्यासाठी सवलतधारक अर्हताधारक व कुशल कर्मचारी नेमू शकेल. प्रचलित कायद्याशी सुसंगत असल्यास,सवलतधारक त्याला योग्य वाटतील त्या सेवाशर्ती ठरवायला मुखत्यार आहे.

ऊ) सवलतधारक आर्थिक कराराच्या सर्व जबाबदाऱ्या पूर्ण करेल.

ऋ)प्रकल्प कंत्राटदाराशी होणाऱ्या प्रत्येक प्रकल्प करारामध्ये, हा करार समाप्त झाल्यास किंवा सवलतधारकाने ह्या करारामध्ये कसूर केल्यास, त्याच्या जागी औरंगाबाद मनपा किंवा त्यांची नामनिर्देशित व्यक्ती, त्या ऐवजी स्वतःला ठेवू शकतील याची काळजी सवलतधारक घेईल.

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

ल्ट)सवलतधारक औरंगाबाद मनपाच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय कुठल्याही प्रकल्प करारातील प्रकल्प कंत्राटदाराची सेवा किंवा / आणि वचनबंध समाप्त करणार नाही ( किंवा बदलणार नाही).

एॅ)सवलतधारक, आवश्यक असल्यास ज्या सेवा पोलीस विभाग वा अन्य शासकीय निमितत्वा कडून घेईल वा रक्कम प्रदान करून उपलब्ध होतात त्या सर्व रकमांचे प्रदान करेल.

ऐ)सवलतधारक औरंगाबाद मनपाच्या पूर्वपरवानगीशिवाय प्रकल्पाच्या कोणत्याही जागी वाणिज्यिक जाहिरात करण्यासाठी वापरू देणार नाही. अशा जाहिरातींपासून मिळणारे सर्व उत्पन्न औरंगाबद मनपाच्या वेळोवेळी अमलात असलेल्या जाहिरात धोरणानुसार विभागून घेतले जातील.

## २२ उपयोगकर्ता शुल्क

### २२.१ उपयोगकर्ता शुल्क नमूद करणे

अ) अंतिम उपयोगकर्त्यांकरिता अनुसूची १६ प्रमाणे उपयोगकर्ता शुल्क नमूद केले जाईल याची काळजी औरंगाबाद मनपा घेईल.

आ) जर औरंगाबाद मनपाने नमूद केलेले उपयोगकर्ता शुल्क हे अनुसूची १६ मध्ये मनपाने मान्य केलेल्या शुल्कापेक्षा कमी असेल, तर औरंगाबाद मनपा सवलतधारकाला त्यांनी प्रत्यक्षात नमूद केलेले उपयोगकर्ता शुल्क व अनुसूची १६ मध्ये मान्य केलेल्या शुल्कातील फरक प्रदान करेल.

### २२.२ उपयोगकर्ता शुल्काची वसुली

अंतिम उपयोगकर्त्यांकडून वसूल झालेले सर्व उपयोगशुल्क व इतर संबंधित शुल्के ही औरंगाबाद मनपाने ह्या कारणाकरिता निर्धारित केलेल्या खात्यामध्ये भरणा केले जाईल याची काळजी सवलतधारक घेईल. **(वसुली खाते )**

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



वसुली खाते हे विशेष खाते असेल.  भरणा झालेले उपयोगकरता शुल्क हे खालीलप्रमाणे वापरले गेले पाहिजे :

अ) प्रथम अनुसूची १६ नुसार मान्य केलेल्या पातळीपेक्षा अधिक उपयोगकर्ता शुल्क याबाबत औरंगाबाद मनपाला देय असलेली रक्कम

आ)दुसरे, प्रतिनियुक्ती वरील कर्मचारी, वीज व अपरिष्कृत पाणी याबद्दल औरंगाबाद मनपाला देय असलेली रक्कम, वसुली खात्यातून प्रदान केली जाईल.

इ) सवलतधारकाच्या ऋणकोनी विनिर्दिष्ट केलेली रक्कम ह्या वसुली खात्यात भरणा केली गेली पाहिजे

**२४  टँकर द्वारे व अग्निशामक विभागाला पुरवठा.**

अ) सवलतधारकाला हे मान्य आहे की पाणी ही एक आवश्यक वस्तू आहे व प्रकल्पाचे परिचालन निलंबित झाल्यास, पाणी पुरवठ्याच्या यंत्रणेत किंवा त्याच्या काही भागात बिघाड झाल्यास , एखादी आणीबाणीची परिस्थिती उद्भवल्यास किंवा एखाद्या अपरिहार्य घटनेच्या परिस्थितीत, सवलतधारक पुरवठा क्षेत्रातील सर्व उपयोगकर्त्यांना, रास्तपणे शक्य असेल तिथे,  पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा टँकर मार्फत करेल.

आ)सवलतधारक पुरवठा क्षेत्रातील सर्व अग्निशामक दलाच्या कार्यालयांना पिण्यायोग्य पाण्याचा  पुरवठा  निःशुल्क करेल.

इ)  सवलतधारक पुरवठा क्षेत्रातील औरंगाबाद मनपाच्या सर्व विभागांना अथवा त्यांच्या मालकीच्या संस्थांना औरंगाबाद मनपाच्या खर्चाने पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा निशुल्क करेल.

ई) परिचालन व देखभाल कालावधीमध्ये प्रकल्पाचे परिचालन निलंबित झाल्यास, पाणी पुरवठ्याच्या यंत्रणेत किंवा त्याच्या काही भागात बिघाड झाल्यास , एखादी आणीबाणीची परिस्थिती उद्भवल्यास किंवा एखाद्या अपरिहार्य घटनेच्या परिस्थितीत,

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा


| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |




सवलतधारक पुरवठा क्षेत्रातील सर्व उपयोगकर्त्यांना, रास्तपणे शक्य असेल तिथे, पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा टँकर मार्फत अनुसूची १९ मध्ये नमूद दरानुसार करेल.

## २४ स्वतंत्र अभियंता व हिशेब तपासनीस

### २४.१ नेमणूक

अ) औरंगाबाद मनपा व सवलतधारक यावर सहमत आहेत की

i. युनिटी कन्सल्टंट प्रायव्हेट लिमिटेड यांना स्वतंत्र अभियंता म्हणून नेमण्यात यावे

ii. भारतात व्यवसाय करणारी सनदी लेखाकारांची एखादी नामवंत संस्था, स्वतंत्र हिशेब तपासनीस म्हणून नेमण्यात यावी.

iii. औरंगाबाद मनपा व सवलतधारक यांनी मान्य केलेल्या स्वतंत्र अभियंता व हिशेब तपासनीस यांच्या कार्यकक्षा व ह्या करारात नमूद केल्यानुसार कर्तव्ये , कार्ये, सेवा व कृती हाती घेणे व करणे

आ) स्वतंत्र अभियंता व हिशेब तपासनीस यांची नेमणूक ही पारदर्शक स्पर्धात्मक बोली पद्धतीने केली जाईल व स्वतंत्र अभियंता व हिशेब तपासनीस, ( जशी बाब असेल तसे) औरंगाबाद मनपा व सवलतधारक यामध्ये नियुक्ती करार केला जाईल.

इ) स्वतंत्र अभियंता व हिशेब तपासनीस हे जशी परिस्थितीची आवश्यकता असेल त्याप्रमाणे नियमित कालबद्ध अहवालाच्या माध्यामातून त्यांचे कार्य, सेवा व कृती द्वारे औरंगाबाद मनपाला कळवतील. स्वतंत्र अभियंता व हिशेब तपासनीस यांच्या अहवालात औरंगाबाद मनपाला प्रकल्पाची सद्य स्थिती बाबत नियमित व योग्य माहिती मिळेल अशा सर्व बाबींचा समावेश असला पाहिजे. सर्व अहवालांची प्रत सवलतधारकाला दिली गेली पाहिजे.

ई) जिथे असे नमूद केले असेल की औरंगाबाद मनपा, स्वतंत्र अभियंता वा हिशेब तपासनीस यांचा निर्णय अंतिम, बाध्य किंवा निर्णायक असेल ते वगळून औरंगाबाद मनपा, स्वतंत्र अभियंता वा हिशेब तपासनीस यांनी केलेल्या एखाद्या निर्णयाशी किंवा

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



प्रमाणीकरणाशी एखादा पक्ष असहमत असल्यास, ह पक्ष असहमती दूर करण्य्च्या दृष्टीने औरंगाबाद मनपा, स्वतंत्र अभियंता वा हिशेब तपासनीस, जशी बाब असेल तशी यांना भेटून मतभेद मिटविण्याचा प्रयत्न करतील. जर अशी बैठक झाल्यावर ३० ( तीस) दिवसांचे आत मतभेद न मिटल्यास ती बाब कलम ३७ नुसार वाद सोडविण्या करिता सोपविला जाईल.

## २४.२ नेमणुकीच्या शर्ती

स्वतंत्र अभियंता व हिशेब तपासनीस यांची सूरवातीची नेमणूक ३ (तीन) वर्षांच्या कालावधीकरिता असेल. सवलतधारक किंवा औरंगाबाद मनपा हे स्वतंत्र अभियंता व हिशेब तपासनीस यांच्याकरिता असलेल्या नियुक्ती करारा नुसार स्वतंत्र अभियंता व हिशेब तपासनीस यात बदल सुचवू शकतात (जशी बाब असेल तशी ). स्वतंत्र अभियंता व हिशेब तपासनीस यांची नवीन नेमणूक ही पारदर्शक स्पर्धात्मक बोली पद्धतीने केली जाईल व ही प्रक्रिया प्रत्येक स्वतंत्र अभियंता व हिशेब तपासनीस यांची मुदत संपल्यानंतर मुदत संपलेल्या स्वतंत्र अभियंता व हिशेब तपासनीस यांच्याशी असणाऱ्या शर्तीवरच अवलंबिली जाईल.

## २४.३ खर्च

अ) सवलतधारक व औरंगाबाद मनपा, स्वतंत्र अभियंता यांच्या कामाच्या बाबतीत सर्व रास्त खर्च सारख्या प्रमाणात सोसतील व ते

i. बांधकाम व पुनर्वसन कालावधी मध्ये प्रकल्प खर्चाच्या २.३५ % ( दोन पूर्णांक पस्तीस टक्के) अधिक सेवा कर यापेक्षा अधिक नसेल.

ii. परिचालन व देखभाल कालावधीमध्ये प्रकल्प खर्चाच्या ०.२५% ( शून्य पूर्णांक पंचवीस टक्के) अधिक सेवा करा यापेक्षा अधिक नसेल.

आ) सवलतधारक व औरंगाबाद मनपा, स्वतंत्र लेखा परीक्षक यांच्या कामाच्या बाबतीत सर्व रास्त खर्च सारख्या प्रमाणात सोसतील व तो प्रकल्प खर्चाच्या ०.१% ( शून्य पूर्णांक एक टक्का ) यापेक्षा अधिक नसेल.

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



इ) सवलतधारक व औरंगाबाद मनपा, स्वतंत्र अभियंता व हिशेब तपासनीस यांचे मान्यता दिलेले शुल्क, दोन्ही पक्षांनी मान्यता दिलेल्या राष्ट्रीयीकृत बँकेच्या औरंगाबाद शहरातील शाखेत दरवर्षी आगाऊ भरला जाईल. उपरोल्लेखित रकमेवरील वरील अर्जित व्याज हे भविष्यात शुल्क प्रदान करण्याकरिता वापरले जाईल व औरंगाबाद मनपा व सवलतधारक यांचा हिस्सा त्याप्रमाणे समायोजित केला जाईल.

## २५ जल प्रदान राखीव निधी

अ) नियत दिनाकापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत, औरंगाबाद मनपा वार्षिक परिचालन समर्थन अनुदानाच्या १.५ (दिड ) पट रक्कम नामवंत बँकेमध्ये याकरिता उघडलेल्या विशेष खात्यामध्ये जमा करेल. (जल प्रदान राखीव निधी) व ही रक्कम वेळोवेळी अशा तऱ्हेने वाढवत नेईल की जल प्रदान राखीव निधीत त्य वेळच्या लागू वार्षिक परिचालन समर्थन अनुदानाच्या १.५ (दीड) पट रक्कम असेल.

आ) सवलतधारक अशा जल प्रदान राखीव निधीतून अनुसूची २० मध्ये नमूद केलेल्या जल प्रदान राखीव निधीच्या शर्तीवर रक्कम काढू शकेल. जल प्रदान राखीव निधीच्या परीचालनाच्या शर्ती ह्या अनुसूची २० नुसार आहेत याची काळजी औरंगाबाद मनपा घेईल.

इ) सवलतधारकाने जल प्रदान राखीव निधीतून जल प्रदान राखीव निधी करारा नुसार काढले तर औरंगाबाद मनपा जल प्रदान राखीव निधी खाते असे काढल्यापासून १५ (पंधरा ) दिवसात जल प्रदान राखीव निधी पुनःपुर्ती करेल .

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

## २६ जलप्रदानाचे परिगणन

### २६.१ जलप्रदानाची परिगणन

सवलतधारकाला देय असलेले जल प्रदान अनुसूची ८ प्रमाणे दर महा प्रगणित केले जाईल.

### २६.२ जलप्रदानाचे प्रदान

औरंगाबाद मनपा सवलतधारकाला अनुसूची ८ मध्ये नमूद केल्यानुसार दर महिना संपल्या नंतर ७ दिवसांच्या आत वसुली खात्यातून सवलतधारकाने निर्देशित केलेल्या खात्यात अंतरित केले जातील.

## २७ वीज शुल्क व जोड

### २७.१ प्रकल्पाकरिता वीज मिळविण्यासाठी औरंगाबाद मनपाचे साहाय्य

औरंगाबाद मनपा सवलतधारकाला प्रकल्पाकरिता सर्वात स्वस्त दराने वीज मिळावी याकरिता सर्वतोपरी प्रयत्न करेल. लागू कायद्याच्या अधीन राहून, ह्या मदतीत, औरंगाबाद मनपाने प्रकल्पाकरिता स्वतःच्या नावावर वीज जोड घेणे समाविष्ट असू शकते, पण ते तेवढ्यापुरते मर्यादित नाही.

### २७.२ औरंगाबाद मनपा च्या नावाने वीज जोड.

अ) प्रकल्पाला पुरविण्यात आलेली वीज ही औरंगाबाद मनपाच्या नावाने असलेल्या वीज जोडाच्या माध्यमातून असेल तर

i. वीज वितरण कंपनी / उपयोगिते कडून विजेच्या शुल्काचे बीजक प्राप्त झाल्यावर ८ (आठ) दिवसांचे आत, औरंगाबाद मनपा सवलतधारकाला बिजकाची एक प्रत उपलब्ध करून देईल.

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



ii. दोन्ही पक्षांनी मान्य केलेल्या पद्धती नुसार

I. एकतर औरंगाबाद मनपा अशा बिजकाच्या शर्तीनुसार बिजकाची रक्कम अदा करून सादर रक्कम जल प्रदानातून वजा करून घेईल

II. अथवा सवलतधारक असे बिजक परस्पर भरणा करेल.

हे स्पष्ट केले जाते की महाराष्ट्रा राज्य वीज नियामक आयोगाकडे (MERC) अथवा इतर शासकीय निमित्तावा पुढे सवलतधरकाचे प्रतिनिधित्व करण्याची औरंगाबाद मन्पही दायित्व नाह्ही.

आ) दोन्ही पक्षांनी मान्यता दिलेल्या कार्यप्रणालीचा विचार न करता, जर औरंगाबाद मनपाने वीज वितरण कंपनी / उपयोगीतेला वीज शुल्काचा भरणा केला नाही,तर सवलतधारक औरंगाबाद मनपाच्या वतीने विजेचे शुल्क वीज वितरकाला परस्पर भरणा करू शकतो.

इ) एखाद्या शासकीय निमितत्वाने दोन्ही पक्षातील कलम २७ नुसार असलेली ही व्यवस्था अयोग्य ठरविली व त्यापोटी सवलतधारकाला सवलतकाळात काही नुकसानभरपाई, शुल्क, खर्च ( पूर्वीच्या कालावधीकरिता देय शुल्क कमीजास्त करणारे बिजक ) कर, दंड, प्रदान करावे लागले, तर औरंगाबाद मनपाच्या सवलतधारकाला अशी कोणतीही नुकसानभरपाई, शुल्क, खर्च कर, दंड, देण्यास बांधील राहणार नाही.

ई) खालील उपकलम (उ) च्या अधीन राहून दोन्ही पक्ष हे सुव्यक्तपणे मान्य करतात की प्रकल्पाला सवलतीच्या दरात वीज पुरवठा होणार नाही ह्या जोखीमीची, प्राधान्य बोलीदाराने बोली सादर करतेवेळी ती आकस्मिक दायित्व म्हणून वार्षिक प्रकल्प परिचालन अनुदानात हिशोबित केली आहे असे मानले जाईल.

उ) त्याचप्रमाणे विजेच्या दरातील वाढ (यात अनुदानातील कपात समाविष्ट ) ह्या जोखीमीची, प्राधान्य बोलीदाराने बोली सादर करतेवेळी ती आकस्मिक दायित्व म्हणून वार्षिक प्रकल्प परिचालन अनुदानात हिशोबित केली आहे असे मानले जाईल. त्याप्रमाणे विजेच्या दरात १०% (दहा टक्के) वार्षिक वाढ झाल्यास, सवलतधारक

कुठल्याही सुटीस, नुकसानभरपाई, सवलत कालावधीत वाढ ह्या बाबींना हक्कदार असणार नाही.

ऊ) औरंगाबाद मनपा करारावर स्वाक्षरी केलेल्या वर्षासाठीचा विजेचा मूळ दर ठरवेल व सवलतकाळामध्ये तो दरवर्षी १०% ( दहा टक्के ) दराने निर्देशांकित करेल. विजेचा खर्च १०% ( दहा टक्के ) दराने निर्देशांकित केलेल्या खर्चापेक्षा जास्त असल्यास औरंगाबाद मनपा तो जास्तीचा खर्च सोसेल.

ऋ) सवलतधारक हर्सूल व नहर-ए -अंबरी योजनेसह इतर पर्यायी पाण्याच्या स्त्रोता साठीच्या विजेचा खर्च सोसेल.

## २८ अपरिष्कृत पाणी

### २८.१ प्रकल्पाला अपरिष्कृत पाण्याचा पुरवठा

अ) औरंगाबाद मनपा आश्वस्त करीत आहे की सवलतधारक अनुसूची २१ नुसार जायकवाडी प्रकल्प जलाशयातून प्रतिवर्षी ११३.२८ (एकशे तेरा पूर्णांक दोन आठ) दशलक्ष घन मीटर अपरिष्कृत पाणी वापरात आणण्याकरिता उचलू शकेल. सवलतीच्या कालावधीत औरंगाबाद मनपा पाटबंधारे विभागाशी अपरिष्कृत पाणी उचलण्याच्या कराराचे नवीकरण करण्यासाठी जबाबदार राहील. पाटबंधारे विभागाशी अशा कराराचे नुतनीकरण करण्यासाठी आवश्यक ते शुल्क औरंगाबाद मनपा सोसेल.

आ) सवलतधारक जायकवाडी प्रकल्प जलाशयातून प्रतिवर्षी ११३.२८ (एकशे तेरा पूर्णांक दोन आठ) दशलक्ष घन मीटर अपरिष्कृत पाणी वापरात आणण्याकरिता उचलू शकेल व असे अपरिष्कृत पाणीच प्रकल्पाकरिता वापरू शकेल. परंतु पुरवठ क्षेत्रात जर वाटप झालेल्या अपरिष्कृत पाण्याच्या मागणीत वाढ झाल्यास सवलतधारक जर सेवा पातळी आवश्याकता पूर्ण करीत असेल तर अशा अतिरिक्त अपरिष्कृत पाण्याची व्यवस्था करण्याचे दायित्व औरंगाबाद मनपाची असेल.

## २८.२ अपरिष्कृत पाण्याचे प्रदान

अ) जर अपरिष्कृत पाण्याचा पुरवठा औरंगाबाद मनपाच्या नावाने होत असेल, (सवलतधारकाऐवजी ) तर

i. तृतीय पक्षाकडून अशा अपरिष्कृत पाण्याचे बिजक प्राप्त झाल्यावर औरंगाबाद मनपा ८ (आठ) दिवसांचे आत सवलतधारकाला अशा बिजकाची प्रत देईल.

ii. पक्षांच्या दरम्यान ठरलेल्या पद्धतीनुसार :

अ) औरंगाबाद मनपा बिजका  नुसार रक्कम प्रदान करून अशी रक्कम जल प्रदान रकमेतून वळती करून घेईल. किंवा

आ) सवलतधारक अशा बिजकाची रक्कम थेट प्रदान करेल.

## २८.३ गुणवत्तेतील अथवा किंमतीतील बदल

अ) औरंगाबाद मनपा अपरिष्कृत पाण्याच्या गुणवत्तेबद्दल कसलेही निवेदन करीत नाही (फक्त ते अपरिष्कृत पाणी, अपरिष्कृत पाण्याची गुणवत्ता श्रेणी पूर्ण करेल)  व कलम ३१च्या  आधीन राहून असे निसंदिग्धपणे मान्य केले जाते की अपरिष्कृत पाण्याच्या गुणवत्ता श्रेणी अंतर्गत अपरिष्कृत पाण्याच्या  गुणवत्तेतील प्रतिकूल बदल ह्या जोखीमीची, प्राधान्य बोलीदाराने बोली सादर करतेवेळी ती आकस्मिक दायित्व म्हणून वार्षिक प्रकल्प परिचालन अनुदानात हिशोबित केली आहे असे मानले जाईल. त्यानुसार अपरिष्कृत पाण्याच्या गुणवत्तेमुळे ( ते अपरिष्कृत पाण्याच्या  गुणवत्ता श्रेणी अंतर्गत असल्यास) सवलतधारकाला काही अतिरिक्त रक्कम गुंतवावी लागल्यास,  सवलतधारक कुठल्याही सुटीस, नुकसानभरपाई, सवलत कालावधीत वाढ ह्या बाबींना हक्कदार असणार नाही.

आ)त्याचप्रमाणे अपरिष्कृत पाण्याच्या दरातील १५ % ( पंधरा टक्के ) प्रतिवर्ष पर्यंतची वाढ (यात अनुदानातील कपात समाविष्ट )  ह्या जोखीमीची, प्राधान्य बोलीदाराने बोली सादर करतेवेळी ती आकस्मिक दायित्व म्हणून वार्षिक प्रकल्प परिचालन अनुदानात

हिशोबित केली आहे असे मानले जाईल. त्याप्रमाणे अपरिष्कृत पाण्याच्या दरात १५% (पंधरा टक्के) वार्षिक वाढ झाल्यास, सवलतधारक कुठल्याही सुटीस, नुकसानभरपाई, सवलत कालावधीत वाढ ह्या बाबींना हक्कदार असणार नाही.

इ) औरंगाबाद मनपा करारावर स्वाक्षरी केलेल्या वर्षासाठीचा अपरिष्कृत पाण्याचा मूळ दर ठरवेल व सवलतकाळामध्ये तो दरवर्षी १५% ( पंधरा टक्के ) दराने निर्देशांकित करेल. अपरिष्कृत पाण्याचा खर्च १५% ( पंधरा टक्के ) दराने निर्देशांकित केलेल्या खर्चापेक्षा जास्त असल्यास औरंगाबाद मनपा तो जास्तीचा खर्च सोसेल.

ई) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने बसविलेल्या स्थानिक निधी / जल उपकाराचा खर्च सवलतधारकाला करावा लागेल.

## २९ पुरवठा क्षेत्राबाहेरील पुरवठा

अ) सवलतधारकाने आधी सेवा पातळी आवश्यकता, प्रकल्प विनिर्दिष्टे व कराराच्या इतर अटी पूर्ण करीत असेल, तर मार्गावरील ग्राहकांना, जशी गरज असेल तसे, अपरिष्कृत पाण्याचा किंवा पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा करू शकतो. हा पुरवठा मार्गावरील ग्राहकांनी कार्यान्वित केलेल्या करारात नमूद केलेल्या अटी व शर्तींप्रमाणे असेल.

आ) कलम २९ (अ) अनुसार मार्गावर येणाऱ्या ग्राहकांना अपरिष्कृत पाण्याचा किंवा पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा करण्याच्या सवलत धारकाच्या दायित्वा व्यतिरिक्त, जर सवलतधारक जोपर्यंत ह्या करारानुसार आपले दायित्व पार पाडीत आहे तोवर लागू कायद्याच्या अधीन राहून व औरंगाबाद मनपाच्या पूर्वपरवानगीने प्रकल्पाच्या आजूबाजूला पण पुरवठा क्षेत्राच्या बाहेर असणाऱ्या खेड्यांना किंवा ग्राहकांना पाणी पुरवठा करू शकत

इ) कलम २९ (अ) अनुसार मार्गावर येणाऱ्या ग्राहकांना अपरिष्कृत पाण्याचा किंवा पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा करण्याच्या व कलम २९ (आ) नुसार पूर्वपरवानगीने प्रकल्पाच्या आजूबाजूला पण पुरवठा क्षेत्राच्या बाहेर असणाऱ्या खेड्यांना किंवा ग्राहकांना पाणी पुरवठा करण्याच्या सवलत धारकाच्या दायित्वा बरोबरच औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



मनपा जोपर्यंत त्याला अपरिष्कृत पाण्याचा पुरवत्याचे स्त्रोत उपलब्ध करूण देत आहे तोवर सवलतधारकाला पुरवठा क्षेत्राच्या बाहेर असणाऱ्या कोणत्याही जागेला अपरिष्कृत पाण्याचा किंवा पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा करायला सांगू शकते.

## ३० कायद्यातील बदल

### ३०.१ किमतीत वाढ

कायद्यातील बदलाचा परिणाम म्हणून सवलतधारकाला एकूण प्रकल्प किमतीच्या ५% (पाच टक्के ) पेक्षा जास्त किमतीत वाढ किंवा निव्वळ करोत्तर विवरणामध्ये घट किंवा इतर आर्थिक बोजा सहन करावा लागला , तर सवलतधारक तसे औरंगाबाद मनपाला सूचित करेल व करारामध्ये अशा तऱ्हेने दुरुस्ती सुचवेल जेणेकरून सवलतधारकाला भांडवलावरील अंतर्गत नफ्याचा दर हा कलम ३०.३ अन्वये मिळून तो तशाच आर्थिक परिस्थितीत असता, जो अशा कायद्यातील दुरुस्तीमुळे त्याला किमतीत वाढ किंवा निव्वळ करोत्तर विवरणामध्ये घट किंवा इतर आर्थिक बोजा सहन करावा लागला. सवलतधारकाने सूचना दिल्या पासून दोन्ही पक्ष लवकरात लवकर , पण ३० (तीस) दिवसांपेक्षा कमी कालावधीत भेटतील व करारातील अशा दुरुस्तीवर किंवा परस्परसंमतीने इतर पर्यायांवर एकमत करतील.

जर अशी सूचना मिळाल्याच्या ९०( नव्वद ) दिवसांचे आत कुठलेही मतैक्य झाले नाही तर सवलतधारक एका सुचनेद्वारे औरंगाबाद मनपाला, कायद्यात बदल झाला नसता तर तो ज्या आर्थिक परिस्थितीत असता, अशी रक्कम प्रदान करण्याचे सुचवेल व अशी सूचना मिळाल्या नंतर औरंगाबाद मनपाने १५( पंधरा ) दिवसांचे आत अशा रकमेचे प्रदान केले पाहिजे. परंतु औरंगाबाद मनपाने सवलतधारकाच्या दाव्याला आव्हान दिले, तर असे वाद हे कलम ३७ मध्ये सुचविलेल्या वाद निवारण कार्यप्रणाली नुसार निराकरण केले पाहिजेत. कुठलीही शंका न येण्यासाठी हे मान्य केले जाते की हे कलम ३०.१ हे फक्त कायद्यातील बदलामुळे सवलतधारकाला त्याच्या करारातील जबाबदाऱ्या निभाव्ण्यावर जिथे थेट परिणाम होईल अशा बाबींनाच फक्त लागू होईल.

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



## ३०.२ किमतीत घट

कायद्यातील बदलाचा परिणाम म्हणून सवलतधारकाला एकूण प्रकल्प किमतीच्या ५% (पाच टक्के ) पेक्षा जास्त किमतीत घट किंवा निव्वळ करोत्तर विवरणामध्ये वाढ किंवा इतर आर्थिक फायदा झाला, तर औरंगाबाद मनपा तसे सवलतधारकाला सूचित करेल व करारामध्ये अशा तऱ्हेने दुरुस्ती सुचवेल जेणेकरून सवलतधारकाला भांडवलावरील अंतर्गत नफ्याचा दर हा कलम ३०.३ अन्वये मिळून तो तशाच आर्थिक परिस्थितीत असता, जो अशा कायद्यातील दुरुस्तीमुळे त्याला किमतीत घट किंवा निव्वळ करोत्तर विवरणामध्ये वाढ किंवा इतर आर्थिक फायदा झाला. औरंगाबाद मनपाने सूचना दिल्या पासून दोन्ही पक्ष लवकरात लवकर , पण ३० (तीस) दिवसांपेक्षा कमी कालावधीत भेटतील व करारातील अशा दुरुस्तीवर किंवा परस्परसंमतीने इतर पर्यायांवर एकमत करतील.

जर अशी सूचना मिळाल्याच्या ९०( नव्वद ) दिवसांचे आत कुठलेही मतैक्य झाले नाही तर एका सुचनेद्वारे औरंगाबाद मनपा सवलतधारकाला, कायद्यात बदल झाला नसता तर तो ज्या आर्थिक परिस्थितीत असता, अशी रक्कम प्रदान करण्याचे सुचवेल व अशी सूचना मिळाल्या नंतर सवलतधारकाने १५( पंधरा ) दिवसांचे आत अशा रकमेचे प्रदान केले पाहिजे. परंतु सवलतधारकाने औरंगाबाद मनपाच्या दाव्याला आव्हान दिले, तर असे वाद हे कलम ३७ मध्ये सुचविलेल्या वाद निवारण कार्यप्रणाली नुसार निराकरण केले पाहिजेत. कुठलीही शंका न येण्यासाठी हे मान्य केले जाते की हे कलम ३०.२ हे फक्त कायद्यातील बदलामुळे सवलतधारकाला त्याच्या करारातील जबाबदाऱ्या निभाव्ण्यावर जिथे थेट परिणाम होईल अशा बाबींनाच फक्त लागू होईल.

## ३०.३ भांडवला वरील अंतर्गत फायद्याचा दर

कलम ३०.१ व ३०.२च्या अनुरोधाने व सवलतधारक, त्याच्या किंमत, विवरण व नफा तोटा ह्यावर परिणाम करणारी दुरुस्ती कायद्यात न होता ज्या आर्थिक परिस्थितीत असता, त्या परिस्थितीत सवलतधारकाला ठेवण्यासाठी, दोन्ही पक्ष (सवलतधारकाने सादर केलेल्या) आर्थिक प्ररुपावर अवलंबून किमती, उत्पन्न, मोबदला व अन्य संबंधित चालीत मूल्य यामध्ये

समायोजन करून भांडवला वरील अंतर्गत फायद्याचा दर कायद्यात दुरुस्तही न होता जेवढा असता, तेवढा राखावा.

### ३०.४ रोख मोबदल्यावर बंधन

दोन्ही पक्ष कबुल करतात व मान्यता देतात की कलम ३०.४ अन्वये रोख मोबदल्याची मागणी ही त्या आर्थिक वर्षात झालेल्या कायद्यातील दुरुस्तीमुळे होणाऱ्या परिणामापूर्ती मर्यादित राहील व रोख मोबदला ते आर्थीक वर्ष सुरु झाल्यावर कधीही करता येईल, पण ते आर्थिक वर्ष संपल्यावर एक वर्ष्याच्या कालावधी नंतर करता येणार नाही. पुढील आर्थिक वर्षाशी संबंधित व त्यात देय असलेली कुठ्लीही रोख मोबदल्याची मागणी ही ती ज्या आर्थिक वर्षाशी संबंधित आहे, ते सुरु झाल्यावर करता येईल, पण असे आर्थिक वर्ष समाप्त झाल्यावर दोन वर्षाच्या कालावधीनंतर करता येणार नाही.

## ३१ आकस्मिक घटना

### ३१.१ आकस्मिक घटना

जर काही आकस्मिक घटनेने कामात अडथळा आल्यास, औरंगाबाद मनपा व सवलतधारक हे ह्या कराराखालील आपल्या जबाबदाऱ्या निलंबित करू शकतात किंवा थांबवू शकतात.

### ३१. २ आकस्मिक घटनांचे प्रसंग

अ) आकस्मिक घटनेचा प्रसंग म्हणजे असा प्रसंग किंवा परिस्थिती किंवा प्रसंग व परिस्थिती यांचा असा संयोग जो

अ) बाधित पक्षाच्या रास्त नियंत्रणापलीकडे आहे.

आ)असा पक्ष यावर वाजवी काळजी व कौशल्य वापरून तो टाळू किंवा त्यावर वाजवी मात करू शकला नसता.

इ) अशा पक्षाच्या निष्काळजीपणातून किंवा ह्या करारान्वये कुठलीही दायित्व पार पाडण्यात अपयश आल्यामुळे

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा



ई) असमर्थ करण्याच्या स्वरूपाचा आहे व कार्य करु शकत नाही किंवा त्यात विलंब किंवा अडथळा येऊ शकतो.

आ) अशा प्रसंगांमध्ये खालील बाबींचा कोणत्याही मर्यादेशिवाय समावेश होतो :

अ) बिगर राजकीय प्रसंग

i. भूकंप, पूर, जलमय होणे, भूस्खलन, अपवादात्मक प्रतिकूल हवामान तुफान, वादळ, झंजावात, चक्रवात, विजा चमकणे, मेघगर्जना, ज्वालामुखीचा उद्रेक, आग किंवा इतर विषम हवामान परिस्थिती.

ii. किरणोत्सारी दुषितीकरण, किंवा आयनीकरण किंवा जैविक दुषितीकरण, अपवाद फक्त सवलतधारकाने वापरलेले किरणोत्सारी दुषितीकरण, किंवा आयनीकरण किंवा जैविक दुषितीकरण करणारे पदार्थ

iii. महाराष्ट्रा राज्यात सवलतधारकाच्या कृती किंवा टाळाटाळी मुळे न होणारे पण प्रकल्पाची वेळेत अंमलबजावणी व अखंड परिचालन कण्यात अडथळे आणणारे संप, टाळेबंदी, बहिष्कार, किंवा कामगार अडथळे.

iv. अपरिष्कृत पाण्याची उपलब्धता एकूण वाटप झालेल्या अपरिष्कृत पाण्याच्या ५०% ( पन्नास टक्के) पेक्षा कमी असणे

v. कोणतीही घटना किंवा परिस्थिती पूर्वगामी अनुषंगिक प्रकारची असल्यास

इ) राजकीय प्रसंग

i. ह्या करारान्वये ज्या कायद्यातील बदलामुळे अनुतोष दिला गेला आहे त्याव्यतिरिक्त कायद्यातील कोणताही बदल

ii. सवलतधारकाच्या कोणत्याही महत्वाच्या मालमत्तेचे किंवा हक्काचे शासन, महाराष्ट्रा शासन, औरंगाबाद महानगरपालिका किंवा त्यांच्या यथाक्रम संस्था यांनी स्वामित्वहरण किंवा सक्तीने संपादन केल्यास

iii. सवलतधारकाच्या कोणतेही वैध कारण न देता त्याला काम करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कोणताही परवाना देण्यास अथवा त्याचे

नुतनीकरण करण्यास नकार देणे, अथवा बेकायदेशीररित्या किंवा अनधिकृतपणे तो रद्द करणे. मात्र असा विलंब, दुरुस्ती, नकार किंवा रद्द करणे हे सवलतधारकाने, बिगर भेदभावाच्या आधारावर अर्ज केलेल्या अशा कोणत्याही संमती किंवा परवाना देण्यासाठी वा नुतनीकरण करण्यासाठी असलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्यास असमर्थ किंवा अयशस्वी ठरलेला नसावा.

iv. सवलतधारक, लागू असलेला कायदा अथवा परवाना यांचे पालन करण्यास असमर्थ ठरला किंवा कुठलाही करार किंवा या कराराचे किंवा त्यांअतर्गत असलेल्या अधिकाराच्या अंमलबजावणीत भंग झाल्याच्या कारणा व्यतिरिक्त, अधिकार क्षेत्र असलेल्या न्यायालयाने अथवा सक्षम वैधानिक प्राधिकरणाने कुठल्याही कामकाजात सवलतधारकाविरुद्ध निर्णय अथवा आदेश दिल्यास.

v. शासन, महाराष्ट्रा शासन, औरंगाबाद महानगरपालिका, त्यांच्या यथाक्रम संस्था किंवा शासकीय निमित्तत्व यांनी प्रकल्पाची लेखी मागणी केल्यास कुठलीही शंका न येण्यासाठी, या कराराच्या तरतुदी नुसार या प्रकल्पाचे झालेले निलंबन, ही आकस्मिक घटना या कारणा करिता लेखी मागणी म्हणून ग्राह्य धरता येणार नाही.

अ) इतर प्रसंग

i. युद्धाची एखादी कृती ( घोषित अथवा अघोषित), शत्रुभाव, आक्रमण, विदेशी शत्रूचा सशस्त्र संघर्ष अथवा कृती, नाकाबंदी, अवरोध, लांबलेले दंगे, उठाव, दहशतवादी किंवा लष्करी कारवाई, सार्वजनिक अशांतता, किंवा राजकीय हेतूने घातपाती कृत्ये, ७ (सात) दिवसांच्या कालावधीपेक्षा जास्त अखंड चालु राहिल्यास

ii. अपरिष्कृत पाण्याची गुणवत्ता संस्करण करण्याच्या पलीकडे असल्यास

iii. कोणत्याही कारणासाठी अपरिष्कृत पाण्याची उपलब्धता नसणे

### ३१.३ आकस्मिक घटनेस अपवाद

खालीलपैकी कुठल्याही प्रसंगामध्ये सवलतधारकाला आकस्मिक घटना म्हणून विचार करण्याचा अधिकार असणार नाही,

अ) यंत्रसामग्री अथवा साहित्याची विलंबाने प्राप्ती, ती आकस्मिक घटना असणाऱ्या प्रसंगाशी संबंधित नसल्यास

आ) निधीची कमतरता समाविष्ट असलेली आर्थिक विवंचना

इ) सामान्य आर्थिक मंदी.

### ३१.४ आकस्मिक घटनेच्या माहितीची कार्यप्रणाली

आकस्मिक घटना घडल्यानंतर ७ ( सात) दिवसांचे आत, बाधित पक्ष आकस्मिक घटनेबाबत दुसऱ्या पक्षास अधिसूचित करेल. जर दुसऱ्या पक्षाने आकस्मिक घटने मधील भरपाईच्या दाव्यावर वाद उपस्थित केल्यास, ते दावा करणाऱ्या पक्षास अशा वादाबद्दल ३० ( तीस) दिवसांच्या आत सूचित करतील. असे वाद हे कलम ३७ नुसार वाद निवारण प्रणाली द्वारा निवारण केला जाईल. आकस्मिक घटनेची परिस्थिती ओसरल्या नंतर बाधित पक्ष दुसऱ्या पक्षास ७ ( सात) दिवसांचे आत अधिसूचित करेल व दोन्ही पक्ष शक्य तितक्या लवकर या करारान्व्ये आपले दायित्व पार पडतील.

### ३१.५ आकस्मिक घटनेच्या प्रसंगी सहकार्य

कुठल्याही आकस्मिक प्रसंगी, औरंगाबाद मनपाने विनंती केल्यास, सवलतधारक पुरवठा क्षेत्रातील उपयोगकर्त्यांना पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा करण्यासाठी वाजवी साहाय्य करेल. अशा आकस्मिक घटने प्रसंगी सवलतधारकाला योग्य तो मोबदला मिळेल याची काळजी औरंगाबाद मनपा घेईल.

### ३१.६ आकस्मिक घटनेतून उद्भवणाऱ्या खर्चाचे वाटप

अ) आकस्मिक घटना नियत दिनांकापुर्वी उद्भाव्ल्यास, दोन्ही पक्ष आपापला खर्च सोसतील व कोणताही पक्ष एकमेकांना कोणताही खर्च देणार नाही.

आ)आकस्मिक घटना नियत दिनांका नंतर घडल्यास, अशा प्रत्येक प्रसंगी झालेला व प्रकल्पाशी थेट संबंध असलेला खर्च (आकस्मिक घटनेचा खर्च ) खालील प्रमाणे वाटप करून प्रदान केला जाईल

i. बिगर राजकीय प्रसंग घडल्यास, दोन्ही पक्ष आपापला खर्च सोसतील व कोणताही पक्ष एकमेकांना कोणताही खर्च देणार नाही.

ii. आकस्मिक घटनेचे इतर प्रसंग घडल्यास, आकस्मिक घटनेच्या इतर प्रसंगाशी संबंधित व विम्याने संरक्षित असा आकस्मिक घटना खर्च सवलतधारक सोसेल व अशा विमा संरक्षणाच्या वरच्या आकस्मिक घटना खर्चाच्या निम्मी रक्कम औरंगाबाद मनपा सवलतधारकाला प्रतिपूर्त करेल.

iii. राजकीय प्रसंग घडल्यास, अशा राजकीय प्रसंगाशी संबंधित सर्व आकस्मिक घटना खर्चाची रक्कम औरंगाबाद मनपा सवलतधारकाला प्रतिपूर्त करेल.

iv. आकस्मिक घटना खर्चामध्ये, कर्जावरील व्याज प्रदान, परिचालन व देखभाल खर्च, महागाई मुळे कामाच्या खर्चातील वाढ, व आकस्मिक घटनेशी संबंधित सर्व खर्च समाविष्ट असेल, पण उत्पन्नाचे नुकसान किंवा कर्ज परत करणे समाविष्ट नसेल व असा खर्च आर्थिक प्रारूपातील अशा संबंधित माहितीवर विसंबून निश्चित करावा.

v. कलम ३१ मध्ये निसंदिग्ध तरतूद सोडल्यास, कुठलाही पक्ष आकस्मिक घटनेतून किंवा त्याच्याशी संबंधित हक्क बजावताना काही हानी, नुकसान, खर्च, किंमत, दावे मागण्या वा कामकाज झाल्यास , दुसऱ्या पक्षास जबाबदार राहणार नाही.

## ३१.८ सल्लामसलत व सौम्य करण्याचे कर्तव्य

ह्या कलम ३१.८ मध्ये अन्यथा तरतूद असल्याखेरीज, बाधित पक्ष स्वखर्चाने आकस्मिक घटनेचे परिणाम सौम्य करण्यासाठी व या करारातील आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी शक्य तितक्या लवकर सर्व वाजवी उपाय करेल. आकस्मिक घटनेतून होणारे नुकसान कमीतकमी होण्यासाठी अवलंबीण्याच्या वाजवी उपायांबाबत दोन्ही पक्ष एकमेकांशी सल्लामसलत करतील. बाधित पक्ष आकस्मिक घटनेचे परिणामावर उपाय शोधण्यासाठी त्याच्या प्रयत्नाविषयी तो इतर पक्षांना सूचित करेल व ते सौम्य करण्यासाठी निरंतर प्रयत्न करेल व कार्य सुरु झाल्यानंतर लेखी सूचित करेल.

## ३२) महत्वपूर्ण भंग

### ३२.१ बांधकाम कालावधी मध्ये सवलतधारकाकडून महत्वपूर्ण भंग

अ) बांधकाम व पुनर्वसन कालावधीमध्ये जर सवलतधारकाने महत्वपूर्ण भंग करीत असेल ( व औरंगाबाद मनपाचा अशा महत्वपूर्ण भंगाबद्दल नुकसानभरपाई वसूल करण्याचा उद्देश असेल) तर औरंगाबाद मनपा सवलतधारकाला अशा महत्वपूर्ण भंगाची तपशीलात माहिती देणारी सूचना देईल व त्यासाठी ९० (नव्वद) दिवसांचा दुरुस्ती कालावधी देईल.

आ) सवलतधारकाने असा भंग दुरुस्त केला नाही, तर दुरुस्ती कालावधी नंतर औरंगाबाद मनपाला , असा भंग सुरु असेतोवर, १% (एक टक्का ) प्रती आठवडा ह्या दराने कामगिरी प्रतिभूती वाताविण्याचा हक्क असेल.

इ) कोणतीही शंका असू नये यासाठी हे स्पष्ट केले जाते की कार्य योजने मध्ये एखादा टप्पा पूर्ण करण्यास वायद्यापेक्षा जास्त कालावधी लागल्यास, सवलतधारकाकडून कराराचा महत्वपूर्ण भंग झाला असे मानले जाणार नाही. परंतु जर सवलतधारक नियत दिनांकापासून ३६ (छत्तीस) महिन्याच्या आत वाणिज्यिक परिचालन दिनांक साध्य करू शकला नाही, तर कलम ३२.२ च्या तरतुदी लागू होतील.

### ३२.२ वाणिज्यीक परिचालन दिनांक साध्य करण्यातील विलंब

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



अ) नियत दिनांक किंवा परस्परसंमतीने इतर कुठल्याही वाढीव कालावधीच्या ३६ महिने झाल्यानंतर व

आ)कलम ३२.१ नुसार प्रकल्पामधील टप्पेपूर्ण करण्यासाठीचा कालावधी समाप्त झाल्यानंतर

जर स्वतंत्र अभियंत्याने रास्त पणे , सवलतधारक वाणिज्यिक परिचालन दिनांक साध्य करू शकला आहे असे प्रमाणपत्र देऊ शकला नाही, तर औरंगाबाद मनपाला, कलम १८.४ नुसार, सवलतधारक वाणिज्यिक परिचालन दिनांक साध्य करू शकला आहे असे प्रमाणपत्र स्वतंत्र अभियंता देईपर्यंत, १% (एक टक्का ) प्रती आठवडा व जास्तीत जास्त १०% ( दहा टक्के ) ह्या दराने कामगिरी प्रतिभूती वटविण्याचा हक्क असेल.

**३२.३ परिचालन कालावधीमध्ये सवलतधारकाकडून महत्वपूर्ण भंग**

अ) परिचालन कालावधीमध्ये जर सवलतधारक महत्वपूर्ण भंग करीत असेल ( व औरंगाबाद मनपाचा अशा महत्वपूर्ण भंगाबद्दल नुकसानभरपाई वसूल करण्याचा उद्देश असेल) तर औरंगाबाद मनपा सवलतधारकाला अशा महत्वपूर्ण भंगाची तपशीलात माहिती देणारी सूचना देईल व त्यासाठी ९० (नव्वद) दिवसांचा दुरुस्ती कालावधी देईल.

आ) सवलतधारकाने असा भंग दुरुस्त केला नाही, तर दुरुस्ती कालावधी नंतर औरंगाबाद मनपाला , असा भंग सुरु असेतोवर, १% (एक टक्का ) प्रती आठवडा ह्या दराने कामगिरी प्रतिभूती वाताविण्याचा हक्क असेल.

इ) उपरोल्लेखित व्यतिरिक्त, सवलतधारकाच्या महत्वपूर्ण भंगामुळे वटविलेल्या कामगिरी प्रतिभूती पेक्षा औरंगाबाद मनपाचा थेट खर्च जास्त झाला असल्यास, सवलतधारक त्याची भरपाई औरंगाबाद मनपाला देण्यास उत्तरदायी असेल.

**३२.४ औरंगाबाद मनपा कडून महत्वपूर्ण भंग**

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा



अ) सवलतीच्या कालावधीमध्ये जर औरंगाबाद मनपा महत्वपूर्ण भंग करीत असेल ( व सवलतधारक अशा महत्वपूर्ण भंगाबद्दल नुकसानभरपाई वसूल करण्याचा उद्देश असेल) तर सवलतधारक औरंगाबाद मनपाला अशा महत्वपूर्ण भंगाची तपशीलात माहिती देणारी सूचना देईल व त्यासाठी ९० (नव्वद) दिवसांचा दुरुस्ती कालावधी देईल.

आ) कोणतीही शंका असू नये व कोणत्याही मर्यादेशिवाय यासाठी हे स्पष्ट केले जाते की जर औरंगाबाद मनपा अनुसूची ८ नुसार नमूद केलेल्या कालमर्यादित पाण्याचे प्रदान करीत नसेल तर तो औरंगाबाद मनपा कडून महत्वपूर्ण भंग मानला जाईल.

## ३३ कसुरीचे प्रसंग

### ३३.१ सवलतधारकाकडून कसुरीचे प्रसंग

खालील प्रसंग व परिस्थिती हे सवलतधारकाकडून होणाऱ्या कसुरीचे ठरतील

अ) सवलतधारकाकडून ह्या आणि / किंवा इतर प्रकल्प करारान्वये असलेल्या जबाबदाऱ्यांचे असे महत्वाचे उल्लंघन जे औरंगाबाद मनपाने कलम ३२.२ अन्वये दिलेल्या लेखी सूचनेच्या ९० ( नव्वद ) दिवसांचे आत दुरुस्त झाले नसेल तर किंवा ते दुरुस्त होण्यासारखे नसल्यास, औरंगाबाद मनपाने लेखी सुचना दिल्यानंतर त्वरित.

आ) सवलतधारकाकडून अशा एखाद्या व्यक्त अट किंवा हमीचे उल्लंघन, जे औरंगाबाद मनपाकडून अशा विशिष्ट भंगाची लेखी सूचना प्राप्त झाल्यावर ९० ( नव्वद ) दिवसांचे आत दुरुस्त झाले नसेल तर किंवा ते दुरुस्त होण्यासारखे नसल्यास, व अशी अट किंवा हमी महत्वाची असल्यास, औरंगाबाद मनपाकडून अशी लेखी सुचना प्राप्त झाल्यावर त्वरित.

इ) सवलतधारक परीसमापित, विसर्जित, समापित, एकत्रित किंवा पुनर्गठित झाला असल्यास वा होण्याच्या प्रक्रियेत असल्यास व औरंगाबाद मनपाच्या वाजवी अभिप्रयानुसार, अशी बाब प्रकल्पावर महत्वाचा विपरीत परिणाम करणार असल्यास.

ई) सवलतधारकाने कराराचा अस्वीकार केल्यास

उ) सवलतधारकाने ह्या करारामध्ये व्यक्त परवानगी असल्याशिवाय प्रकल्पा मालमत्तेवर एखाद्या व्यक्तीच्या पक्षामध्ये बोजा, भार वा धारणाधिकार निर्माण केल्यास

ऊ) संघाच्या कोणत्याही सदस्याचे भागधारण या कराराच्या कलम ११ अन्वये विहित केल्या पेक्षा कमी झाल्यास व हे झाल्यावर सवलतधारकाने ते झाल्याच्या ९० (नव्वद) दिवसांचे आत स्वतःहून त्यामध्ये दुरुस्ती न केल्यास.

ऋ) एखाद्या कायद्यास अनुसरून सवलतधारकाने कोणत्याही प्रकल्प करारांतर्गत त्यांच्या अधिकारांचे / जबाबदाऱ्यांचे किंवा मालमत्तेचे किंवा हमीचे हस्तांतरण झाल्यास; अपवाद फक्त अशा हस्तांतरणामुळे सवलतधारकाच्या कार्य करण्याच्या क्षमतेवर किंवा त्याच्या आर्थिक व तांत्रिक क्षमतेवर कोणताही परिणाम होणार नाही, असा औरंगाबाद मनपाचे, वाजवी अभिप्राय असल्यास

ऌ) सवलतधारकाने आर्थिक कागदपत्रान्तर्गत कोणताही कसुरीचा प्रसंग झाला असल्यास किंवा धनकोने आर्थिक कागदपत्रान्तर्गत कर्ज परत मागविल्यास

ऍ) जर सवलतधारकाने औरंगाबाद मनपाच्या पूर्वसंमतीशिवाय सलग १५ (पंधरा) दिवस प्रकल्पाचे परिचालन त्यागल्यास ; मात्र असा त्याग एखाद्या आकस्मिक घटनेमुळे किंवा जेव्हा अशा आकस्मिक घटना सुरु असण्याच्या कालावधीत असेल किंवा औरंगाबाद मनपाने कराराचे उल्लंघन केले असल्यास सवलतधारकाने प्रकल्प त्यागला आहे असे मानले जाणार नाही.

ऎ) मालमत्तेवर किंवा यंत्रसामग्रीवर कार्याधिकार भोगावा लागल्यामुळे प्रकल्पावर महत्वाचा प्रतिकूल परिणाम झाल्यास व तो १५ (पंधरा) दिवसांपेक्षा जास्त काळ सुरूच राहिल्यास

ए) सवलतधारकाने ह्या करारान्वये देय असलेले प्रदान करण्यात विलंब केल्यास व असा विलंब ९० ( नव्वद) दिवसांचे पेक्षा जास्त असल्यास ;

## ३३.२ औरंगाबाद मनपाकडून कसूरीचे प्रसंग

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



अ) औरंगाबाद मनपाकडून ह्या आणि / किंवा इतर प्रकल्प करारान्वये असलेल्या जबाबदाऱ्यांचे असे महत्वाचे उल्लंघन जे सवलतधारकाने कलम ३२.२ अन्वये दिलेल्या लेखी सूचनेच्या ९० ( नव्वद ) दिवसांचे आत दुरुस्त झाले नसेल तर किंवा ते दुरुस्त होण्यासारखे नसल्यास, सवलतधारकाने लेखी सुचना दिल्यानंतर त्वरित.

आ) औरंगाबाद मनपाकडून अशा एखाद्या व्यक्त अट किंवा हमीचे उल्लंघन, जे सवलतधारकाकडून अशा विशिष्ट भंगाची लेखी सूचना प्राप्त झाल्यावर ९० ( नव्वद ) दिवसांचे आत दुरुस्त झाले नसेल तर किंवा ते दुरुस्त होण्यासारखे नसल्यास, व अशी अट किंवा हमी महत्वाची असल्यास, सवलतधारकाकडून अशी लेखी सुचना प्राप्त झाल्यावर त्वरित.

इ) औरंगाबाद मनपाने नियत दिनांकाच्या १५ (पंधरा ) दिवसांचे आत पाणी प्रदान राखीव खाते स्थापण्यात अपयश आल्यास व असे अपयश सवलतधारकाने औरंगाबाद मनपाला लेखी सूचना दिल्यानंतर सुद्धा १५ ( पंधरा ) दिवस पर्यंत दुरुस्त न झाल्यास ;

ई) पाणी प्रदान राखीव खात्यातून या करारानुसार सवलतधारकाने वैधरित्या काढल्यावर औरंगाबाद मनपाने १५ (पंधरा ) दिवसांचे आत पाणी प्रदान राखीव खाते पुनर्भरण करण्यात अपयश आल्यास व असे अपयश सवलतधारकाने औरंगाबाद मनपाला लेखी सूचना दिल्यानंतर सुद्धा ३०( तीस ) दिवस पर्यंत दुरुस्त न झाल्यास ;

उ) औरंगाबाद मनपाने ह्या कराराचा अस्वीकार केल्यास

## ३४ समाप्ती

### ३४.१ कसूरीचा प्रसंग झाल्यास समाप्त करण्याचा अधिकार

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



अ) कसुरीचा प्रसंग उदभवल्यास बेकसूर पक्षाला दुसऱ्या पक्षास सुचना बजाविण्याचा ( **समाप्तीच्या उद्देशाची सूचना** ) अधिकार आहे. अशा सुचनेमध्ये ज्या कसुरीच्या प्रसंगामुळे समाप्तीच्या उद्देशाची सूचना द्यावी लागली त्या प्रसंगाचे वाजवी तपशील सूचित केले जावेत.

आ)अशी समाप्तीच्या उद्देशाची सूचना जारी केल्यानंतर दोन्ही पक्ष, ह्या कराराची समाप्ती न होण्यासाठी कोणते उपाय योजावेत ( कराराची बोलणी पुन्हा करणे समाविष्ट ) आणि / किंवा कसुरीचा संबंधित प्रसंग कसा दुरुस्त करावा ह्यासाठी ३० ( तीस) दिवसांच्या किंवा दोन्ही पक्षांनी लेखी संमती दिलेल्या वाढीव कालावधीमध्ये आपसात सल्लामसलत करून सर्वतोपरी प्रयत्न करतील.

इ) अशा सल्लामसलतीचा कालावधी समाप्त झाल्यावर बेकसूर पक्षाला असे वाटले की कसुरीचा प्रसंग दुरुस्त करता येत नाही, तर बेकसूर पक्षाला कसूर करणाऱ्या पक्षाला हा करार समाप्त करण्याची सूचना (**समाप्तीची सुचना** ) देण्याचा अधिकार राहील

ई) जर औरंगाबाद मनपाने समाप्तीच्या उद्देशाची सूचना जारी केली तर त्याची एक प्रत खाते बँकेला दिली पाहिजे.

## ३४.२ आकस्मिक घटनेच प्रसंग घडल्यास समाप्तीचा अधिकार

एखाद्या आकस्मिक घटनेच्या प्रसंगामुळे जर एखाद्या पक्षाच्या दायित्व निभावण्याच्या क्षमतेवर सलग ६ (सहा) महिने पर्यंत परिणाम झाल्यास हा करार समाप्त करण्याचा अधिकार त्या पक्षाला असेल.

## ३४.३ सवलतधारकाकडून कसुरीचा प्रसंग झाल्यास समाप्ती प्रदान

जर समाप्ती सवलतधारकाकडून होणाऱ्या कसुरीच्या प्रसंगामुळे असेल, तर विमा संरक्षण वजा जाता कर्जाएवढी रक्कम सवलतधारकाकडून मनपाला देय राहील. सवलतधारकाकडून देय असलेल्या रकमा वसूल करण्यासाठी औरंगाबाद मनपा कार्यगत प्रतिभूती वटवीण्याचा अधिकार राहील.

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

### ३४.४ औरंगाबाद मनपा कडून कसुरीचा प्रसंग झाल्यास समाप्ती प्रदान

जर समाप्ती औरंगाबाद मनपा कडून होणाऱ्या कसुरीच्या प्रसंगामुळे असेल, तर औरंगाबाद मनपा कडून सवलतधारकाला समाप्ती प्रदानाच्या रुपाने खालील प्रमाणे रक्कम देय राहील

अ) विमा संरक्षण वजा जाता कर्जाएवढी रक्कम

आ) समायोजित केलेले भांडवल

इ) सवलतधारकाला त्याच्या कर्मचाऱ्यांची देणी किंवा प्रकल्प कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांना हा प्रकल्प समाप्त झाल्याबद्दल वाजवी व योग्य मोबदला देण्यासाठी आवश्यक अशी रक्कम.

### ३४.५ आकस्मिक घटनेतील प्रसंगामुळे समाप्ती प्रदान

अ) समाप्ती जर आकस्मिक घटनेतील बिगर राजकीय प्रसंगामुळे असेल , तर औरंगाबाद मनपा कडून सवलतधारकाला विमा संरक्षण वजा जाता कर्जाएवढी रक्कम देय असण्याचा अधिकार असेल.

आ) समाप्ती जर आकस्मिक घटनेतील राजकीय प्रसंगामुळे असेल , तर औरंगाबाद मनपा कडून सवलतधारकाला विमा संरक्षण वजा जाता कर्ज अधिक समायोजित भांडवला एवढी रक्कम देय असण्याचा अधिकार असेल.

इ) समाप्ती जर आकस्मिक घटनेतील इतर प्रसंगामुळे असेल , तर औरंगाबाद मनपा कडून सवलतधारकाला विमा संरक्षण वजा जाता कर्जाएवढी रक्कम देय असण्याचा अधिकार असेल.

### ३४.६ प्रकल्प सुविधा व दोष दायित्वाचे हस्तांतरण

अ) सवलतीचा कालावधी समाप्त झाल्यावर किंवा आधी समाप्त झाल्यास, सर्व प्रकल्प सुविधा ह्या कराराच्या उद्देशानुसार पूर्णपणे प्रचालीत अवस्थेत असतील व ते पूर्ण

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा



प्रचालीत अवस्थेत राहण्यासाठी सवलतधारक सवलतकाळात जी नियमित देखभालीची कामे करीत होते, तो सर्व कार्यक्रम करणे आवश्यक असेल.

आ) प्रकल्प सुविधा पूर्णपणे प्रचालीत अवस्थेत आहेत की नाही, ह्याचे मूल्यमापन करण्यासाठी स्वतंत्र अभियंता सवलतीचा कालावधी समाप्त होण्याच्या ३ (तीन) महिने आधी प्रकल्पाची तपासणी करतील.

इ) अशी तपासणी व मूल्यमापन झाल्यानंतर, प्रकल्प सुविधांमध्ये कलम ३४.६ (अ) मधील निकष पूर्ण करण्यासाठी सवलतधारकाने प्रकल्प हस्तांतरित करण्याआधी परिचालन व देखभाल / नवीनीकरण कार्य हाती घ्यावे असे स्वतंत्र अभियंत्यांना आवश्यक वाटू शकते

ई) जर परिचालन व देखभाल / नवीनीकरण कार्याचा अंदाजित खर्च कार्यगट प्रतीभूतीच्या रकमेपेक्षा जास्त असेल तर सवलतीचा कालावधी संपण्याच्या जास्तीतजास्त ३(तीन ) महिने अगोदर, जोपर्यंत परिचालन व देखभाल / नवीनीकरण कार्य पूर्ण झाल्याबद्दल स्वतंत्र अभियंत्यांची खात्री होत नाही, तोवर औरंगाबाद मनपा पाणी प्रदान राखीव खात्यातून ह्या फरका एवढ्या रक्कम प्रदान करण्यास मनाई करू शकते.

उ) ह्या कलम ३४.६ नुसार औरंगाबाद मनपाने असे प्रदान रोखून धरल्यास, जोपर्यंत हा परिचालन व देखभाल / नवीनीकरण कार्य करारातील नमूद आवश्यकतेप्रमाणे पार पडले आहे असे स्वतंत्र अभियंता प्रमाणित करीत नाहीत तोवर सवलतधारकाचा जल प्रदान राखीव निधीतून काढण्याचा अधिकार निलंबित असेल.

ऊ) कुठलीही शंका नसण्यासाठी हे स्पष्ट केले जाते की जर कलम ३४.६ नुसार जल प्रदान राखीव निधीतून रोक्लेली रक्कम व कार्यगत प्रतीभूतीची मिळून रक्कम प्रकल्प सुविधा आवश्यकतेप्रमाणे प्रमाणित होत नसल्यास, औरंगाबाद मनपाला या करारामध्ये विचार केल्याप्रमाणे प्रकल्प सुविधा परीचालीत करण्याचे सवलतधारकाला निर्देश देण्याचा अधिकार असेल व सवलतधारक वाजवी कालावधी मध्ये त्याचे पालन करण्यात अपयशी ठरल्यास, औरंगाबाद मनपाला अशी दुरुस्ती कामे करून तो अशा

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



अवस्थेला आण्याचा अधिकार राहील व सवलतधारक त्याबद्दल औरंगाबाद मनपाला अशा पुढील खर्चाबद्दल क्षतीपुरण करेल. (असे पुढील खर्च सवलतधारकाला देय असलेल्या रकमांमधून वसूल केले जावेत

### ३४.७ प्रकल्पाच्या जागेच्या हस्तांतरणासाठी सामायिक शर्ती.

अ) सवलतीचा कालावधी समाप्त झाल्यावर किंवा त्याच्या आधी सर्व प्रकल्प मालमत्ता व प्रकल्पा सुविधा **"जे आहे व जेथे आहे"** ह्या तत्वावर कोणत्याही बोजविना, औरंगाबाद मनपाच्या स्वेछाधीकारानुसार, औरंगाबाद मनपाला किंवा त्यांच्या नामनिर्देशित व्यक्तीला हस्तांतरित केले जातील व प्रत्येक पक्ष ह्यासाठी, आवश्यक असल्यास, कागदपत्रे स्वाक्षरीत करेल.

आ) दोन पैकी एक पक्षाने अशी सूचना दिल्यावर १० (दहा) दिवसांच्या कालावधी मध्ये औरंगाबाद मनपा व सवलतधारक एकत्र भेटून प्रकल्प मालमत्ता व प्रकल्प सुविधा यांच्या हस्तांतरणाची तपशीलवार प्रक्रिया ठरवतील. ह्या भेटीच्या वेळी, सवलतधारक तेथील रचना, यंत्रसामग्री, व इतर वस्तू यांची तपशीलवार यादी व त्याच्या हस्तांतरणासाठी नमित असलेल्या त्यांच्या प्रतिनिधींची नावे व औरंगाबाद मनपा हस्तांतरणासाठी नमित असलेल्या त्यांच्या प्रतिनिधींची नावे सवलतधारकाला कळवतील.

इ) ह्या सूचनेच्या अनुषंगाने :

i. सर्व आरेखने, योजना, नियमपुस्तिका, औरंगाबाद मनपाला हस्तांतरित केल्या जातील व दोन्ही पक्ष हस्तांतरणाच्या संबंधित कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या करतील

ii. मुद्रांक शुल्क व नोंदणीचा सर्व खर्च औरंगाबाद मनपा करेल.

iii. सवलतधारक सर्व मुदत न संपलेली हमिपत्रे व विमा पॉलिसी अभिसाक्षांकित करण्यायोग्य असल्यास, औरंगाबाद मनपाला अभिसाक्षांकित करतील.

iv. सवलतधारक सर्व करार, यंत्रसामग्री करार, पुरवठा करार, व प्रकल्पाशी संबंधित इतर सर्व करार ( प्रकल्प करार समाविष्ट) कुठल्याही भाराशिवाय व त्याच अटी व

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा



शर्तींवर औरंगाबाद मनपाला प्राप्त करून अभिसाक्षांकित वा हस्तांतरित करून देईल.

## ३४.८ धनकोंचा हस्तक्षेपाचा अधिकार

अ) सवलतधारकाकडून काही कसूर झाल्यास, धनकोना, अनुसूची २२ मधील नमूद बदली कराराच्या तरतुदीनुसार व बदली कराराच्या कलम ३.३ व ह्या कराराच्या अधीन राहून, हस्तक्षेप करण्याचा अधिकार असेल.

आ) अशा बदलीच्या परिस्थितीत, औरंगाबाद मनपा धनकोना बदली करारांतर्गत त्यांच्या अधिकार बजावण्यासाठी कोणत्याही बदली अधिभूत अस्तित्वाला आवश्यक ते सर्व सहकार्य करेल; मात्र अशा अधिभूत अस्तित्वाने बदली करारात विनिर्दिष्ट असलेल्या सर्व आवश्यकतांची परिपूर्ती केली पाहिजे.

## ३५. औरंगाबाद मनपाचा हस्तक्षेपाचा अधिकार

## ३५.१ औरंगाबाद मनपाच्या हस्तक्षेपाचे प्रसंग

कलम ३५.१ च्या तरतुदी खालील परिस्थिती मध्ये लागू होतील

अ) सवलतधारक कराराचा भंग करीत आहे व औरंगाबाद मनपाला वाजविपणे असे वाटले की असा भंग अंतिम उपयोगकर्त्यांच्या प्रकृती किंवा सुरक्षिततेला गंभीर धोका पोहोचवू शकतो किंवा पिण्यायोग्य पाण्याच्या पुरवठ्यामध्ये गंभीर अडथळा येऊ शकतो.

आ) सवलतधारकाने या करारातील सर्व जबाबदाऱ्या पार पाडलेल्या असल्या तरीही औरंगाबाद मनपाला वाजविपणे असे वाटले की सार्वजनिक आणीबाणीची किंवा टंचाईची परिस्थितीत निर्माण होते आहे किंवा ह्या प्रकल्पाचा किंवा त्याच्या काही भागाचा ताबा घेणे हे सार्वजनिक हितार्थ आवश्यक आहे.

## ३५.२ सूचना व सवलतधारकाने उचलावयाची पाऊले

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा



अ) औरंगाबाद मनपाने हस्तक्षेप करावयाचा प्रसंग आल्यास, औरंगाबाद मनपा वाजवी मताने लेखी सुचनेद्वारे त्यांच्या हस्तक्षेपाचे प्रसंग दुरुस्त करण्यासाठी व त्याची तीव्रता कमी करण्यासठी, जी आवश्यक वाटतात ती सर्व पाऊले उचलण्याचे निर्देस सवलतधारकाला देऊ शकतात. ह्या कराराद्वारे सवलतधारकाने जे करणे आवश्यक आहे, त्या व्यतिरिक्त सवलतधारकाने घ्यावयाच्या इतर उपायांचा समावेश असू शकतो. कोणताही संशय न राहण्यासाठी हे स्पष्ट केले जाते की कलम ३५.२ अन्वये वाजवी कारवाई करताना औरंगाबाद मनपाने, सवलतधरकाकडे असे उपाय योजण्याची पुरेशी क्षमता व कालावधी आहे, याची काळजी घेतली पाहिजे.

आ) कलम ३५.२ (अ) मध्ये उल्लेख केल्यानुसार सूचना प्राप्त झाल्यावर, सवलतधारकाने त्याची पावती देऊन, औरंगाबाद मनपाच्या सूचनेप्रमाणे लवकरात लौकर त्याचे पालन करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करावा.

इ) कलम ३५.२ अन्वये औरंगाबाद मनपाने केलेली कुठलीही विनंती, ही औरंगबाद मनपाला कलम ३३.१ नुसार असणाऱ्या अधिकारांशी किंवा ह्या करारानुसार असणाऱ्या इतर व्यक्त अधिकारांशी पूर्वग्रहविरहित असेल.

## ३५.३ औरंगाबाद मनपा कडून कारवाई

जर

अ) कलम ३५.२ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनेप्रमाणे पाऊले उचलण्यास तयार आहे अशी सवलतधारकाने १० (दहा) दिवसांचे आत (किंवा आणीबाणीच्या परिस्थितीत त्यापेक्षा कमी कालावधी मध्ये ) पुष्टी न केल्यास

आ) कलम ३५.२ अन्वये औरंगाबाद मनपाने अधिसूचित केलेली पाऊले उचलण्यास औरंगाबाद मनपाच्या वाजवी मताने योग्य अशा कालावधीमध्ये सवलतधारक अयशस्वी झाल्यास

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



इ) एखाद्या हस्तक्षेप करण्याच्या प्रसंगी औरंगाबाद मनपाला असे वाटले की त्यांनी ठरविलेल्या कालावधीत सवलतधारक आवश्यक ती पाऊले उचलत नाही किंवा उचलू इच्छित नाही

तर औरंगाबाद मनपा वाजवी कारवाई करून स्वतः किंवा इतर कोणालाही त्यांना आवश्यक वाटतात ती पाऊले उचलायला लावून ह्या करारानुसार आवश्यक अशा पिण्यायोग्य दर्जाचे ( किंवा परिस्थिती नुसार त्या प्रमाणाच्या जवळ जाणारा ) पाणी पुरविण्यासाठी कामाला लावू शकते.

**३५.४ औरंगाबाद मनपाच्या हस्तक्षेपाचा कालावधी**

जिथे औरंगाबाद मनपाला असे करणे आवश्यक व इष्ट वाटेल तिथे औरंगाबाद मनपा हस्तक्षेप करून फक्त हस्तक्षेपाच्या कालावधीपूरते, सवलतधरकाचे प्रकल्प हाती घेण्याचे अधिकार व जबाबदाऱ्या पूर्णपणे वा अंशतः निलंबित करणे समाविष्ट असू शकते.

३५.५ कलम ३५.१ (अ) मध्ये उल्लेखित औरंगाबाद मनपाच्या हस्तक्षेपाचा खर्च

कलम ३५.१ (अ) नुसार हस्तक्षेपाचा प्रसंग आल्याने औरंगाबाद मनपाने स्वतः पाऊले उचलल्यास अथवा हस्तक्षेपाचा प्रसंग सौम्य किंवा दुरुस्त करण्यासाठी सवलतधारकाला जी पाऊले उचलणे मनपाच्या मते आवश्यक व इष्ट आहे अशी पाऊले उचलण्यास भाग पाडल्यास

अ) कलम ३५.२ (अ) नुसार औरंगाबाद मनपाला आवश्यक वाटणारी पाऊले सवलतधारकाने उचलल्यास त्यासाठी झालेला खर्च सवलतधारक सोसेल.

आ) सवलतधारक कलम ३५.३ मध्ये नमूद केल्यानुसार ही पाऊले उचलण्यापोटी किंवा इतरांना ही पाऊले उचलण्यापोटी मनपाचे झालेले सर्व वाजवी खर्च, नुकसान, औरंगाबाद मनपाला प्रतिपूर्त करील.

इ) ह्या कराराच्या तरतुदीनुसार सवलतधारकाला देय असलेल्या कोणत्याही रकमेतून अशी रक्कम वळती करून घेण्याचा अधिकार औरंगाबाद मनपाला असेल.

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

### ३५.६ कलम ३५.१ (अ) मध्ये उल्लेखित औरंगाबाद मनपाच्या हस्तक्षेपाचा खर्च

अ) कलम ३५.१ (अ) नुसार हस्तक्षेपाचा प्रसंग आल्याने औरंगाबाद मनपाने स्वतः पाऊले उचलल्यास अथवा हस्तक्षेपाचा प्रसंग सौम्य किंवा दुरुस्त करण्यासाठी सवलतधारकाला जी पाऊले उचलणे मनपाच्या मते आवश्यक व इष्ट आहे अशी पाऊले उचलण्यास भाग पाडल्यास

i. औरंगाबाद मनपा सवलतधारकाकडून, त्याने त्याच्या करारान्वये असणाऱ्या जबाबदाऱ्या योग्य रीतीने निभावण्यासाठी अन्यथा जो थेट वाजवी खर्च, नुकसान किंवा हानी सोसावी लागली असती, त्या व्यतिरिक्त जो अतिरिक्त वाजवी खर्च, नुकसान किंवा हानी होईल ती वसूल करेल

ii. औरंगाबाद मनपाने अशी पाऊले उचलण्यासाठी अथवा सवलतधारकाला ती पाऊले उचलण्यासाठी जो खर्च सोसला असेल, तो सवलतधारकाला सोसावा लागेल

आ) कलम ३५ नुसार औरंगाबाद मनपाने देय असलेल्या रकमांचे सवलतधारकाकडून हा खर्च सोसल्यावर येणाऱ्या कंत्राटी महिन्याच्या पाणी प्रदानाचा (अनुसूची ८ नुसार ) भाग म्हणून बिजकीकरण केले जाईल.

इ) कलम ३५ नुसार औरंगाबाद मनपाला देय असलेल्या रकमांचे कार्यगत प्रतीभूतीच्या रकमेतून समायोजन केले जाईल.

### ३५.७ औरंगाबाद मनपाच्या हस्ताक्षेक्पाच्या वाजवीपणा बद्दल वाद निर्माण झाल्यास

दोन्ही पक्ष सहमत होतील किंवा कलम ३७ नुसार जर असे निश्चित केले गेले की औरंगाबाद मनपा कलम ३५ मध्ये उल्लेख केल्यानुसार, सवलतधारकाला सांगितलेली पाऊले उचलण्यास सांगण्यात (किंवा ही पाऊलेच उचलण्यात ) वाजवी नव्हती, तर औरंगाबाद मनपा सवलतधारकाला ह्या सर्व सुचनांचे पालन करण्यासाठी त्याने सोसलेल्या सर्व थेट व वाजवी खर्च,नुकसान व हानीची रक्कम (करारातील जबाबदाऱ्या योग्य रीतीने पार पाडण्यासाठी अन्यथा जो थेट वाजवी खर्च, नुकसान किंवा हानी सोसावी लागली असती त्याच्या अतिरिक्त व

व्यतिरिक्त ) प्रतिपूर्त करेल. कुठलाही संशय न राहण्यासाठी हे मान्य केले जाते की सवलतधारकाला औरंगाबाद मनपाने विनिर्दिष्ट केलेली अशी कारवाई करण्यापूर्वी तिच्या योग्यायोग्यतेबद्दल कुठलाही वाद करता येणार नाही, फक्त अशी कारवाई केल्यानंतर ही कारवाई करण्यामध्ये औरंगाबाद मनपा योग्य रीतीने वागली याबद्दलचा वाद निर्णयासाठी उपस्थित करू शकेल.

### ३५.८ सवलतधराकडून भंग झाला नसल्यास जल प्रदान मिळण्याचा अधिकार

जर सवलतधारकाने ह्या करारान्वये असलेल्या त्याच्या दायित्वाचा भंग केला नसेल (कलम ३५.२ (अ) नुसार जारी सूचनांचे पालन करण्याचे दायित्व समाविष्ट ) तर ज्या कालावधी पर्यंत व मर्यादे पर्यंत कलम ३५.३ नुसार उचललेली पाऊले, त्याच्या जबाबदाऱ्या निभावण्या पासून सवलतधारकाला अटकाव करीत असतील तर

अ) सवलतधारक अशा दायित्वातून मुक्त होईल.

आ)ज्या कालावधी करिता अशी पाऊले उचलली जातील व सवलतधारक औरंगाबाद मनपाला वाजवी साहाय्य करीत असेल ( हे साहाय्य औरंगाबाद मनपाच्या खर्चाने अशा वाढीव खर्च केलेल्या मर्यादेपर्यंत ) तर औरंगाबाद मनपा कडून सवलतधारकाला देय असलेले पाणी प्रदान रक्कम ही सवलतधारक ह्या पूर्ण कालावधी मध्ये त्याच्या सर्व जबाबदाऱ्या पूर्ण केल्यावर प्राप्त करेल तेवढी असेल.

### ३५.९ सवलतधराकडून भंग झाला असल्यास जल प्रदान मिळण्याचा अधिकार

जर सवलतधारकाने ह्या करारान्वये असलेल्या त्याच्या दायित्वाचा भंग केला असेल (कलम ३५.२ (अ) नुसार जारी सूचनांचे पालन करण्याची दायित्व समाविष्ट ) तर ज्या कालावधी पर्यंत व मर्यादे पर्यंत कलम ३५.३ नुसार उचललेली पाऊले, त्याच्या जबाबदाऱ्या निभावण्या पासून सवलतधारकाला अटकाव करीत असतील तर

अ) सवलतधारक अशा दायित्वातून मुक्त होईल.

आ) ज्या कालावधी करिता अशी पाऊले उचलली जातील त्या कालावधी करिता औरंगाबाद मनपा कडून सवलतधारकाला देय असलेले पाणी प्रदान रक्कम ही सवलतधारक ह्या पूर्ण कालावधी मध्ये त्याच्या सर्व जबाबदाऱ्या पूर्ण केल्यावर प्राप्त करेल त्यातून कलम ३५.५ (इ) मध्ये नमूद केलेली रक्कम वजा करून असेल.

## ३५.१०प्रकल्प कराराखालील तरतुदी

सवलतधारकाने ही काळजी घ्यायची आहे की प्रकल्प करारामध्ये ह्या कलम ३५ प्रमाणे कलमे असतील, ज्यायोगे औरंगाबाद मनपाला ह्या कलम ३५ प्रमाणे हस्तक्षेप करण्याचा अधिकार प्राप्त होईल.

## ३६ क्षतिपूर्ती

## ३६.१ सर्वसामान्य क्षतिपूर्ती

अ) सवलतधारक, त्यांच्याकडून ह्या किंवा अन्य संबंधित करारातील जबाबदाऱ्यांचे पालन न झाल्यामुळे किंवा कोणत्याही अंतिम उपयोगकर्त्याला मिळणाऱ्या सेवेमध्ये राहिलेल्या त्रुटीमुळे (औरंगाबाद मनपा तर्फे दिल्या जाणाऱ्या सर्व सेवा समाविष्ट ), उद्भवलेल्या सर्व किंवा कोणत्याही दावा, कामकाज, कारवाई, मागणी, व तृतीय पक्षाच्या कुठल्याही प्रकारच्या व स्वरूपाच्या नुकसान व खर्चापासून औरंगाबाद मनपा, त्यांचे अधिकारी, कर्मचारी, त्यांचे प्रतिनिधी, शासकीय निमित्तत्व, शासन अंगीकृत आणि / किंवा नियंत्रित अस्तित्व / उपक्रम, स्वतंत्र अभियंता, स्वतंत्र हिशेब तपासनीस (औरंगाबाद मनपा क्षतीपुरीत व्यक्ती ) यांना क्षतिपूर्त, बचाव, व कोणत्याही नुकसानीपासून मुक्त ठेवीत आहेत, फक्त असा दावा, कामकाज, कारवाई, मागणी, औरंगाबाद मनपाच्या क्षतीपुरीत व्यक्तींच्या कडून झालेल्या निष्काळजीपणा किंवा वगळण्याच्या कृतीमुळे किंवा कराराच्या भंगामुळे झालेला नसावा.

आ)औरंगाबाद मनपा , १) प्रकल्प जागेच्या जमिनीमध्ये औरंगाबाद मनपाच्या सदोष हक्क किंवा अधिकारामुळे २) ह्या अथवा अन्य करारान्वये व जल प्रदान राखीव

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



खात्याच्या करारान्वये औरंगाबाद मनपाने दिलेल्या हमीचा किंवा वाचनाचा भंग झाल्यामुळे आणि /हवा ३) ह्या अथवा अन्य करारान्वये व जल प्रदान राखीव खात्याच्या करारान्वये औरंगाबाद मनपाच्या जबाबदाऱ्या यांचा भंग झाल्यामुळे,ह्या करारान्वये सवलतधारकाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यावर महत्वाचा प्रतिकूल परिणाम झाल्यामुळे, पुनर्वसन व पुन्हा वसविण्याशी संबंधित जबाबदाऱ्या समाविष्ट आहेत, उद्भवलेल्या सर्व किंवा कोणत्याही दावा, कामकाज, कारवाई, मागणी, व तृतीय पक्षाच्या कुठल्याही प्रकारच्या व स्वरूपाच्या नुकसान व खर्चापासून सवलतधारक, स्वतंत्र अभियंता, स्वतंत्र हिशेब तपासनीस यांना क्षतिपूर्त, बचाव करीत आहेत, व कोणत्याही नुकसानीपासून मुक्त ठेवीत आहेत, फक्त असा दावा, कामकाज, कारवाई, मागणी, सवलतधारक, त्यांच्या दुय्यम, संबंधित , कंत्राटदार, कर्मचारी, किंवा प्रतिनिधी यांचे कडून ह्या किंवा जल प्रदान राखीव खात्याच्या करारातील तरतुदींचा त्यांच्या निष्काळजीपणा किंवा वगळण्याच्या कृतीमुळे भंग झालेला असल्यास, ती सवलतधारकाचे दायित्व राहील.

**३६.२ सवलतधारकाकडून क्षतिपूर्ती**

अ) कलम ३६.१ चे सर्वसामान्यात्व मर्यादित न करता, सवलतधारक खालील किंवा त्यांच्याशी संबंधित गोष्टीतून उद्भवणाऱ्या नुकसानी आणि / किंवा हानी पासून औरंगाबाद मनपा क्षतीपुर्ती व्यक्तींना ह्यापुढे क्षतिपूर्त करीत आहे

i. सवलतधारक लागू कायदे व परवाने यांचे पालन करण्यात अपयशी ठरल्यास

ii. सवलतधारकाने त्याच्या कंत्राटदार, पुरवठादार, व प्रतीनिधींच्या प्राप्ती व इतर करांचे प्रदान न केल्यास

iii. सवलतधारकाला किंवा त्याच्या कंत्राटदारांना पुरविलेल्या साहित्य व सेवा ह्याबद्दल सवलतधारक व त्याचे कंत्राटदार यांनी देय असलेली रक्कम प्रदान न करणे

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

आ)कलम ३६.१ चे सर्वसामान्यात्व मर्यादित न करता, सवलतधारकाने किंवा त्याच्या कंत्राटदारांनी त्यांच्या जबाबदाऱ्या निभावण्यासाठी व प्रकल्पाचा अंगीकृत किंवा त्याच्याशी संबंधित भागाच्या कामाशी वापरलेल्या कोणत्याही देशी किंवा विदेशी एकस्व अधिकार, प्रतिलिपीचे अधिकार किंवा इतर स्वामित्व अधिकार, वापरलेल्या एखाद्या साहित्य, माहिती, आरेखन अथवा प्रक्रिया यांच्या मालकीचे किंवा गुप्ततेचे अधिकार यांचा भंग झाल्याच्या दाव्यामुळे उद्भवलेल्या कोणत्याही दावा, खटला, कामकाज किंवा मागणीपासून सवलतधारक औरंगाबाद मनपा क्षतीपुर्ती व्यक्तींना ह्यापुढे क्षतिपूर्त करीत आहे. जर अशा कोणत्याही दावा, खटला, कामकाज किंवा मागणी मध्ये तात्पुरता अवरोध आदेश किंवा प्राथमिक मनाई आदेश लागू झाल्यास, सवलतधारक समाधानकारक बंधपत्र सादर करून असा तात्पुरता अवरोध आदेश किंवा प्राथमिक मनाई आदेश निलंबित किंवा रद्द करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेल. जर अशा कोणत्याही दावा, खटला, कामकाज किंवा मागणी मध्ये प्रकल्प किंवा त्याचा कोणताही भाग हे उल्लंघन आहे असे निष्पन्न होऊन त्याच्या वापरावर कायमस्वरूपी मनाई हुकुम आल्यास, सवलतधारक हे उल्लंघित काम सुरु ठेवण्यासाठी औरंगाबाद मनपाला परवाना मिळण्यासाठी सर्व वाजवी प्रयत्न करेल. जर सवलतधारक वाजवी कालावधीत असा परवाना प्राप्त करून देण्यात अपयशी ठरला तर सवलतधारक स्वखर्चाने व सेवा पातळी आवशकताशी तडजोड न करता, एकतर ते काम किंवा त्याचा भाग व प्रक्रिया यांच्या जागी अनुल्लंघित काम किंवा त्याचा भाग व प्रक्रिया बदली करून देईल किंवा ते अनुल्लंघित होईल अशा रीतीने बदल करून देईल.

## ३६.३ सूचना व दावे लढविणे

जर तृतीय पक्षाकडून एखाद्या पक्षाकडे, तो ज्या बाबीकारिता कलम ३६ नुसार क्षतिपूर्तिग्राही (क्षतिपूर्तिग्राही पक्ष) आहे, अशा बाबीमध्ये दावा किंवा मागणी प्राप्त झाली तर तो दुसऱ्या पक्षाला (क्षतीपुरक पक्ष ) असा दावा किंवा मागणी प्राप्त झाल्यानंतर १५ (पंधरा ) दिवसांचे आत

सूचित करेल व क्षतीपुरक पक्षाच्या पूर्वसंमतीशिवाय, जी देण्यात अवाजवी विलंब होऊ नये, तो दावा चुकता करणार नाही. जर क्षतीपुरक पक्षाने तो दावा लढवायचा असे ठरवल्यास व आपण ह्या खर्चाच्या बाबतीत पूर्णपणे सुरक्षित आहोत अशी क्षतिपूर्तिग्राही पक्षाची वाजवी खात्री असल्यास ते क्षतिपूर्तिग्राही पक्षाच्या नावे कामकाज चालवू शकतात.

**३६.४ दाव्याचे रक्षण**

अ) क्षतिपूर्तिग्राही पक्षास, ज्या बाबीत तो क्षतिपूर्तित असण्याचा त्याचा हक्क आहे अशा किंवा त्याच्याशी संबंधित बाबीतून उद्भवलेल्या कोणत्याही दावा, कारवाई, खटला, किंवा कामकाज लढविण्याचा, संरक्षण करण्याचा किंवा अभियोजित करण्याचा अधिकार असेल पण दायित्व असणार नाही. जर क्षतिपूरक पक्षाने क्षतिपूर्तिग्राही पक्षाला कलम ३६ नुसार हानीच्या रकमे पासून क्षतिपूरण करण्याच्या आपल्या दायित्वाचे लेखी कबुल केले तर क्षतीपुरक पक्षाला स्वतःच्या खर्चाने व स्वतः निवडलेल्या वकिलाच्या द्वारे असा दावा,कारवाई, खटला किंवा कामकाज, दायित्व, प्रदान व जबाबदाऱ्या यांचा बचाव नियंत्रित करता येईल ; मात्र आपल्या असे करण्याच्या उद्दिष्टाची त्वरित सूचना क्षतिपूर्तिग्राही पक्षास दिली पाहिजे व असा बचाव हाती घेण्यापूर्वी क्षतिपूर्तिग्राही पक्षाने पूर्वी अशा बचावासाठी केलेल्या वाजवी खर्चाची परिपूर्ती क्षतिपूरक पक्षाने केली पाहिजे. क्षतिपूरक पक्षाला असा दावा, कारवाई, खटला, किंवा कामकाज यामध्ये क्षतिपूर्तिग्राही पक्षाच्या पूर्व लेखी अथवा क्षतिपूर्तिग्राही पक्षाला अशा तडजोडीमुळे होणाऱ्या नुकसानापोटी त्यांच्या वाजवी आवश्यकतेनुसार पुरेशी प्रतिभूती दिल्याशिवाय संमतीशिवाय कुठलीही तडजोड करता येणार नाही.

आ) जर क्षतिपूरक पक्षाने कलम ३६.३ नुसार आपला हक्क बजावला असेल तर क्षतिपूर्तिग्राही पक्षास क्षतिपूरक पक्षाच्या लेखी पूर्वसंमती शिवाय असा दावा, कारवाई, खटला, किंवा कामकाज यामध्ये कुठलीही तडजोड करता येणार नाही.

इ) जर क्षतिपूरक पक्षाने कलम ३६.३ नुसार आपला हक्क बजावला असेल तर क्षतिपूर्तिग्राही पक्षास आपला वकील नेमण्याचा अधिकार असेल व असा वकील कारवाईमध्ये सामील होऊ

शकेल पण अशा वकिलाचे शुल्क व खर्च, जेव्हा व जसा केला असेल तसा, क्षतिपूर्तिग्राही पक्षास करावा लागेल, अपवाद फक्त खालीलप्रमाणे

i. क्षतिपूरक पक्षाने अशा वकिलाच्या नेमणुकीस मान्यता दिली असल्यास
ii. क्षतिपूर्तिग्राही पक्षाने असा वाजवी निष्कर्ष काढला की ह्या कारवाईच्या बचावाबाबत क्षतिपूरक पक्ष व क्षतिपूर्तिग्राही पक्ष यांच्या हितसंबंधात मतभेद आहेत
iii. क्षतिपूरक पक्षाने अशा कारवाईची बचाव करण्यासाठी क्षतिपूर्तिग्राही पक्षाला वाजविपणे समाधानकारक वाटेल असा वकील नेमला आहे व तशी सूचना क्षतिपूर्तिग्राही पक्षाला दिली आहे
iv. क्षतिपूर्तिग्राही पक्षाने असा वाजवी निष्कर्ष काढून क्षतिपूरक पक्षाला कळविले की
अ) क्षतिपूरक पक्षाला उपलब्ध असलेल्या विशिष्ट बचावापेक्षा वेगळे किंवा अतिरिक्त मुद्दे क्षतिपूर्तिग्राही पक्षाला उपलब्ध आहेत.
आ) अशा दावा, कारवाई, खटला, किंवा कामकाज यांचे क्षतिपूर्तिग्राही पक्षावर ह्या कराराच्या व्याप्तीच्या पलीकडे विपरीत परिणाम होतील.

मात्र कलम ३६.४ (इ) चे (ii), (iii) व (iv) ही उपकलमे लागू झाल्यास क्षतिपूर्तिग्राही पक्षाच्या वकिलांना क्षतिपूर्तिग्राही पक्षाच्या वतीने असा दावा, कारवाई, खटला, किंवा कामकाजामध्ये बचावाचे निर्देशन करण्याचा अधिकार असेल व अशा वकिलाचे वाजवी शुल्क व संवितरण हे येणेप्रमाणे कायदेशीर खर्च असतील

## ३६.५ परिणामरूप दावे नसणे

कलम ३६ मध्ये असलेल्या उलट तरतुदींचा विचार न करता, ह्यामध्ये दिलेल्या क्षतिपूर्ति मध्ये, ह्या करारात स्पष्ट तरतूद असल्याशिवाय कुठल्याही अप्रत्यक्ष किंवा अनुषंगिक किंवा परिणाम रूप, खर्च हानी किंवा नुकसानीचा, (लाभ वा हानी समाविष्ट), समावेश असणार नाही.

## ३६.६ समाप्ती पश्चात उत्तरजीवी

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



कलम ३६ च्या तरतुदी समाप्ती पश्चात उत्तरजीवी असतील.

**३७ वाद निवारण**

**३७.१ सलोख्याने निवारण**

अ) दोन्ही पक्षांमध्ये ह्या करारान्वये, करारातून किंवा कराराशी संबंधित कुठल्याही प्रकारच्या उद्भवणाऱ्या मतभेद वा वादविवाद ( अर्थउकल समाविष्ट ) हा एका पक्षाने दुसऱ्या पक्षास लेखी सूचित केला असल्यास अशा लेखी सूचनेच्या ३० (तीस) दिवसांच्या आत सलोख्याने निवारण करण्याचा प्रयत्न केला जाईल. सलोख्याने निवारण होण्यासाठी दोन्ही पैकी एका पक्षाने स्वतंत्र अभियंता आणि / किंवा स्वतंत्र हिशेब तपासनीस यांना अशा निवारणाच्या वेळी उपस्थित राहण्यास पाचारण करावे.

आ) दोन्ही पक्ष ह्या करारातून उद्भवणारे सर्व वाद निवारण करण्यासाठी तत्पर, न्याय्य, व पूर्ण विश्वासाने सर्वतोपरी प्रयत्न करतील व एकमेकांना सामान्य कामकाजाच्या वेळेत कोणत्याही वादाशी संबंधित अविशेष नोंदी, माहिती व आधारसामग्री पहावयास पुरवेल.

इ) ह्या करारानुसार प्रदान करावयाच्या मोबद्ल्याबद्दल वाद झाल्यास, कलम १९.२ व ३५ अन्वये द्यावयाचा मोबदला समाविष्ट व ह्या कलमान्वये असणारे विशिष्ट अधिकार व दायित्व याचा विचार न करता, दोन्ही पक्ष वादात नसलेली रक्कम तात्पुरती तडजोड म्हणून अशा वादाचे अंतिम निवारण होईपर्यंत एकमेकांना प्रदान करतील.

**३७.२ लवाद**

अ) जो विवाद कलम ३७. १ प्रमाणे सलोख्याने निवारण होणार नाही, तो अंतिमतः कलम ३७.२ अन्वये लवादाकडे सुपूर्द केला जाईल. असा लवाद हा लवाद व समेट अधिनियम १९९६ च्या तरतुदींच्या अधीन असेल. अशा लवादाचे ठिकाण औरंगाबाद येथे असेल व लवादाच्या कामकाजाची भाषा इंग्रजी आणि / किंवा मराठी असेल.

आ)तीन पंचांचे मंडळ असेल, त्यातील प्रत्येकी एक हा उभय पक्षांनी निवडलेला असेल व तिसरा पंच हा वरीलप्रमाणे नियुक्त पंचांनी निवडलेला असेल.

इ) कलम ३७.२ अन्वये नेमलेले पंच हे अहर्ता धारक अभियंता असतील व त्यांना कायद्याचे ज्ञान असेल. लवादाचा खर्च, यामध्ये पंचांचा खर्च समाविष्ट पण तेवढाच मर्यादित नाही, हा दोन्ही पक्ष समान तत्वावर सोसतील.

ई) पंच हे सुज्ञ निवाडा देतील (निवाडा ). कलम ३७ ला अनुसरून दिलेला कुठलाही निवाडा हा अंतिम व दोन्ही पक्षांवर बंधनकारक असेल व सवलतधारक व औरंगाबाद मनपा हा निवाडा विनाविलंब अमलात आणण्याचे कबुल करतात.

उ) सवलतधारक व औरंगाबाद मनपा हे मान्य करतात की हा निवाडा सवलतधारक आणि/ किंवा औरंगाबाद मनपा यांचे विरुद्ध, जसे प्रकरण असेल तसे, त्यांच्या कुठेही असलेल्या मालमत्तेवर अंमलबजावणी केली जाईल .

ऊ) हा करार व दोन्ही पक्षांचे अधिकार व दायित्वे ही पूर्णपणे अमलात राहतील.

## ३८ संकीर्ण

### ३८.१ अभिहस्तांकन व हवाला

ह्या करारामध्ये निसंदिग्धपणे तरतूद असल्याशिवाय, हा करार दोन्ही पक्षांच्या वारसदारांवर बंधनकारक असेल कोणताही पक्ष ह्या करारान्वये त्यांना असलेले अधिकार, फायदे कोणत्याही तिसऱ्या पक्षास पूर्णतः किंवा अंशतः अभिहास्तंकित अथवा हस्तांतरित करणार नाही.

### ३८.२ बौद्धिक स्वामित्व

अ) सवलतधारक औरंगाबाद मनपास आश्वस्त करतात की

i. सवलतधारकाने ह्या करारातील दायित्वे निभावण्यासाठी आवश्यक व त्याने पुरविलेल्या अभियुक्त माहिती वापरण्यासाठी सर्व परवाने संबंधित वेळेला प्राप्त केले आहेत किंवा ते प्राप्त करेल.

ii. सवलतधारकाने निभावण्याची दायित्वे कुठल्याही व्यक्तीच्या बौद्धिक स्वामित्व अधिकारांचा भंग करणार नाहीत.

आ) हे आश्वासन करार समाप्ती पश्चातही उत्तरजीवी असेल.

इ) बौद्धिक स्वामित्व अधिकारांचे तथाकथित उल्लंघन झाल्याचा थेट परिणाम म्हणून सवलतधारकाला ह्या करारातील दायित्वे निभावता येत नसल्यास किंवा त्याच्या अधिकारांची अंमलबजावणी होत नसल्यास, सवलतधारकाने

i. औरंगाबाद मनपाला वाजविपणे शक्य होईल तेवढ्या लौकर ही बाब कळविली पाहिजे.

ii. स्वतःच्या खर्चाने ह्या दाव्याचा बचाव करण्यासाठी व उद्देशीत पद्धतीने आपले अधिकार व दायित्वे निभावण्यासाठी सर्व उपाय योजावेत.

ई) कलम ३८.२ मध्ये उल्लेखित कामकाजामध्ये सवलतधारक अपयशी ठरल्यास किंवा औरंगाबाद मनपाने विहित केलेल्या मुदतीत ह्या करारान्वये आपले अधिकार शाबित करू किंवा दायित्व निभावू शकला नाही, तर सवलतधारक औरंगाबद मनपाला कोणत्याही खर्चात न पाडता त्यांची खात्री पटेल असे बदल करेल व आपले अधिकार शाबित करेल व दायित्व निभावेल.

## ३८.३ नियमन कायदे व न्यायाधिकार

ह्या कराराचे भारतीय कायद्यांच्या अनुसार अन्वयार्थ लावला व अर्थउकल केली जाईल व औरंगाबाद येथील न्यायालयांना ह्या करारातून किंवा संबंधित बाबीतून उद्भवणाऱ्या बाबींवर न्यायाधिकर असेल.

## ३८.४ उन्मुक्ततेचे अधित्यजन

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा



औरंगाबाद मनपा बिनशर्त व बदल न करता मान्य करते की

अ) ह्या कराराचे त्यांच्याकडून कार्यान्वयन, सोपविणे व पालन व त्याअंतर्गत येणाऱ्या बाबी ही वाणिज्यिक कार्ये असून ते वाणिज्यिक उद्देशाने केले गेले आहे.

आ)ह्या कराराशी संबंधातून त्यांच्या विरुद्ध किंवा त्यांच्या मालमत्ता, संपत्ती किंवा महसुला विरुद्ध काही कामकाज झाल्यास अशा कामकाजापासून किंवा त्यांच्या मालमत्ता, संपत्ती किंवा महसुला संदर्भात कुठलीही सार्वभौम उन्मुक्ततेच दावा करण्यात येणार नाही.

इ) त्यांच्या मालमत्ता, संपत्ती किंवा महसुलाला आत्ता जी उन्मुक्तता लागू आहे किंवा भविष्यात मिळेल किंवा कोणत्याही क्षमतेमध्ये त्यांना लागू होईल अशी सर्व उन्मुक्ततेचे अधित्याजन करीत आहेत.

ई) त्यांच्या विरुद्धच्या कुठल्याही न्याय निर्णयाची किंवा निवाड्याची अंमलबजावणी करताना कुठलाही अनुतोष देण्यास किंवा कुठल्याही न्यायाधिकारामध्ये ह्या कामकाजाशी संबंधित प्रक्रिया जारी करणे ( त्यांच्या विरुद्ध कुठलीही अंमलबजावणी करणे, किंवा मालमत्ता, संपत्ती किंवा महसुला संदर्भात त्याचा वापर किंवा उद्देशीत वापर जमेला न धरता त्याच्याशी संबंधित तो न्यायनिर्णय दिला जाईल तो )

## ३८.५ बदल

हा करार लिखित स्वरुपात व दोन्ही पक्षांच्या स्वाक्षऱ्या करूनच बदलता येईल.

## ३८.६ प्रदानास विलंब

उभय पक्ष हे मान्य करतात की पाण्याचे प्रदान व ह्या करारामाडे तरतूद असलेली एखादी विशिष्ट मागणी किंवा प्रदान वगळून इतर प्रदाने ही एका पक्षाने दुसऱ्या पक्षाकडे सर्व तपशीलासह मागणी केल्यावर १५ (पंधरा) दिवसांचे आत केले जाईल. ह्या कालावधी पेक्षा

जास्त जास्त विलंब झाल्यास, कसूरवार पक्ष विलंब काळाकरिता बँक दरापेक्षा २% (दोन टक्के) जास्त दराने व्याज प्रदान करेल. त्याची वसुली ही ह्या करारान्वये त्या पक्षाच्या अधिकारांना , करार रद्द करण्याचा अधिकार समाविष्ट, बाधा न आणता होईल.

## ३८.७ अधित्यजन

कोणत्याही पक्षाने दुसऱ्या पक्ष्याने ह्या कराराचे दायित्व निभावण्या किंवा तरतुदींचे पालन करण्याबाबत केलेल्या कसुरीमुळे केलेले अधित्यजन, मग ते अंशतः किंवा सशर्त असले तरीही

अ) इतर कुठल्याही किंवा नंतरच्या ह्या कराराचे दायित्व निभावण्या किंवा तरतुदींचे पालन करण्याबाबत केलेल्या कसुरीमुळे केलेले अधित्यजन आहे असा अर्थ लावला जाणार नाही

आ) ते लेखी व पक्षाच्या यथाविधी अधिकृत प्रतिनिधीने स्वाक्षरीत केल्याशिवाय प्रभावी होणार नाही.

इ) कुठल्याही तऱ्हेने ह्या कराराच्या वैधतेवर व अंमलबजावणीवर कोणताही परिणाम होणार नाही.

## ३८.८ अभिप्रेत हमी वगळणे

अ) हा करार कायद्याने किंवा परंपरेने किंवा दोन्ही पक्षांच्या इतर कोणत्याही करारातून उद्भवणाऱ्या किंवा कोणत्याही पक्षाने दोन्ही पक्षांना कायद्याने बाध्य करणाऱ्या करारात न दिलेल्या कोणत्याही अभिप्रेत हमी, शर्त किंवा वचन स्पष्टपणे वगळत आहे.

आ) तसेच कलम ९.२ (ऐ) मधील व्यक्त हमीच्या अधीन राहून, हा करार, बोली किंवा सल्लामसलत प्रक्रिये (औपचारिक किंवा अनौपचारिक ) दरम्यान दिलेल्या कुठल्याही माहितीबद्दलची हमी, शर्त किंवा वचन वगळत आहे.

## ३८.९ उत्तरजीवित्व

करार म्हणजे हा बदली करार व त्यातील तरतुदीनुसार त्यात केलेली दुरुस्ती व बदल समाविष्ट आहेत.

सवलत करार म्हणजे औरंगाबाद मनपा व सवलतधारक यांच्यात सेप्टेम्बर २२, २०११ रोजी झालेला सवलत करार

सवलतधारकाचा भंग म्हणजे सवलत करारानुसार सवलतधारकाकडून झालेला भंग.

आर्थिक साहाय्य म्हणजे अनुसूची अ मधील यादी दिलेल्या धनकोनी सवलतधारकाला प्रकल्पासाठी द्यावयाचे मान्य केलेले आर्थिक साहाय्य.

आर्थिक भंग म्हणजे आर्थिक करारातील महत्वाच्या शर्ती व अटींचा भंग किंवा कमीत कमी ३ ( तीन) महिन्यांसाठी सवलतधारकाने कर्जाचे हप्ते न भरणे.

क्षतीपुरक पक्ष म्हणजे कलम ७.२ नुसार निर्देशित केलेला अर्थ लागू होईल.

क्षतिपूर्तीग्राही पक्ष म्हणजे कलम ७.२ नुसार निर्देशित केलेला अर्थ लागू होईल.

धनको म्हणजे ज्यांची नावे व पत्ते अनुसूची अ मध्ये नमूद केली आहेत अशा वित्त संस्था व बँका व ज्या बँका / वित्त संस्था पुनर्वित्त / प्रतीस्थापनेच्या माध्यमातून, धनको यांचे प्रतिनिधी जसे अधिसूचित करतील तशी त्यांची जागा घेतील.

आर्थिक भंगाची सूचना म्हणजे कलम ३.२(अ) नुसार निर्देशित केलें अर्थ लागू होईल.

शिल्लक सवलत कालावधी म्हणजे जर सवलत करार रद्द झाला नसता तर ज्या कालावधी करिता सवलत करार लागू राहिला असता असा काळ.

नियम म्हणजे कलम ८. २ नुसार निर्देशित केलें अर्थ लागू होईल.

निवड झालेला म्हणजे ह्या कराराच्या तरतुदीनुसार धनको किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी शिल्लक सवलत कालावधी साठी सवलतधारकाच्या बदल्यात प्रस्तावित केलेली व्यक्ती.

## १.२) अर्थउकल

ह्या करारात अन्यथा तरतूद असल्याशिवाय :

अ) कलमे, पोटकलमे, परिच्छेद, व अनुसूची यांचा असलेला उल्लेख हा ह्या करारातील कलमे, पोटकलमे, परिच्छेद, व अनुसूची यांचाच असेल.

आ) कुठल्याही लिंगाचा उल्लेखात इतर लिंगाचाही समावेश असेल.

इ) कुठल्याही “कंपनी” ह्या उल्लेखामध्ये कुठल्याही किंवा कशाही प्रकारे स्थापन केलेल्या किंवा कुठल्याही कायद्यांने संस्थापित झालेल्या कंपनी, महामंडळ, किंवा निगम निकाय याचा समावेश गृहीत धरला जाईल.

ई) कुठल्याही “व्यक्ती” ह्या उल्लेखामध्ये कुठल्याही व्यक्ती, संस्था, कंपनी, सरकार, राज्य अथवा राज्य, स्थानिक स्वराज्य संस्था,वा नगरपालिका प्राधिकरण, शासकीय मंडळ किंवा संयुक्त जोखीम संघटना, किंवा भागीदारी ( स्वतंत्र वैधानिक अस्तित्व असल्यास किंवा नसल्यास ) याचा समावेश गृहीत धरला जाईल.

उ) कुठल्याही कायदा अथवा कायदेशीर तरतुदीच्या उल्लेखामध्ये तो जणूकाही वेळोवेळी दुरस्त केलेला, बदल केलेला किंवा पुनर्पारीत केलेला असेल असे गृहीत धरले जाईल.

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



ऊ) कुठल्याही “दिवस” (“कामकाजाचा दिवस “ ह्या शब्दाप्रयोगासह ) ह्या उल्लेखाचा अर्थ मध्यरात्र ते मध्यरात्र असा २४ (चोवीस ) तासांचा कालावधी असेल.

ऋ)कुठल्याही “कामकाजाचा दिवस “ह्या उल्लेखाचा अर्थ ज्या दिवशी (रविवार सोडून ) औरंगाबाद महानगरपालिका कामकाज करण्यासाठी सामान्यतः उघडी असते तो दिवस

ऌ) वेळेचा उल्लेख म्हणजेच भारतीय प्रमाण वेळ असेल

ऍ) ह्या करारात उल्लेख असलेल्या कुठल्याही कागदपत्राचा उल्लेख हा वेळोवेळी दुरुस्त केलेल्या, बदल केलेल्या, नवीनता असलेल्या, अथवा पुरवणी म्हणून तयार केलेल्या त्या कागदपत्राचा असेल.

ऎ) सर्व शीर्षके व मथळे यांचा उल्लेख केवळ सोयीकरिता असून ह्या कराराची अर्थउकल करताना त्याचा विचार होणार नाही.

ए) ह्या करारात वापरलेल्या पण कुठेही व्याख्या न केलेल्या पुंजीकरण शर्तींना सवलत करारात निर्देशित केलेला अर्थ असेल.

ऐ) सवलत कराराच्या कलम १.३ व १.४ मध्ये नमूद केलेले अन्वयार्थ लावण्याचे नियम योग्य त्या बदलासहित ह्या कराराला सुद्धा लागू होतील.

**१.३) कराराचा प्राधान्यक्रम**

दोन्ही पक्ष हे मान्य करतात की ह्या कराराचा पूर्ण व योग्य परिणाम साधण्यासाठी सवलत करार व हा करार हे एकत्रित वाचले गेले पाहिजेत व त्याचा सुसंवादी अन्वयार्थ काढला पाहिजे. जर सवलत करार व हा करार यात विरोध असल्यास, सवलत करारातील तरतुदीना ह्या करारातील तरतुदीपेक्षा प्राधान्य राहील.

**२) अभिसाक्षांकन**

२.१) हक्क व अधिकार यांचे अभिसाक्षांकन

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



सवलतधारक ह्या द्वारे ह्या व सवलत कराराच्या तरतुदीप्रमाणे व त्यांना अनुसरून, धनकोनी वित्त करारानुसार केलेल्या वित्त पुरवठ्याला प्रतिभूती म्हणून या प्रकल्पातील आपले हक्क, अधिकार व हितसंबंध यांचे धनको यांना अभिसाक्षांकन करीत आहे.

**३) सवलतधारक बदलणे**

**३.१ बदलाचे अधिकार**

अ) कलम २.१ नुसार अभिहस्तांकित झालेल्या हक्क अधिकार व हितसंबंधांच्या अभिसाक्षांकनाला अनुसरून सवलत करार व ह्या कराराच्या तरतुदी प्रमाणे धनको यांना सवलतधारकाच्या बदली दुसरा निवड झालेला नियुक्त करता येईल

आ) ह्या करारानुसार धनको ह्यांनी निवड झालेल्याची सवलतधारकाच्या जागी केलेल्या निवडीचे सवलत करारावर पृष्ठांकन करीत आहे. कुठलाही संशय न राहण्यासाठी, धनको यांना प्रकल्प परिचालन व देखभालीचे अधिकार असणार नाहीत.

**३.२) आर्थिक कसूर उदभवल्यास बदल**

अ) आर्थिक कसूर उदभवल्यास धनको / धनको यांचे प्रतिनिधी हे सर्व तपशिलासहित सवलतधारकाला सूचना जारी करतील (आर्थिक कसुरीची सूचना) व औरंगाबाद मनपाला त्याची प्रत माहितीसाठी व त्यांच्या नोंदीसाठी प्रेषित करतील. कलम ३ नुसार दिलेली अशी आर्थिक कसूर सूचना हा आर्थिक कसूर झाल्याचा निर्णायक पुरावा असेल व ह्या कराराकरिता ते सवलतधाराकावर बंधनकारक राहील.

आ)येणे प्रमाणे अशी कसुरीची सूचना जारी केल्यानंतर, ह्या किंवा आर्थिक करारातील त्यांच्या हक्कांना किंवा इतर उपाययोजनांना बाधा न आणता, धनको किंवा त्यांचे

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



प्रतिनिधी सवलतधारकाच्या बदल्यात निवड झालेल्याला या कराराच्या तरतुदी प्रमाणे नियुक्त करू शकतात.

इ) कोणत्याही वेळेस धनको किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी आर्थिक कसुरीची सूचना जारी केल्यानंतर, ते सूचना देऊन औरंगाबाद मनपाला सवलतधारकाचे हक्क निलंबित करावयास भाग पाडू शकतात व प्रकल्पाचे परिचालन व देखभाल हाती घेऊ शकतात व अशी सूचना प्राप्त झाल्यावर औरंगाबाद मनपाला सवलतधरकाचे असे हक्क निलंबित करावे लागतील.

मात्र सवलतधारकाच्या जागी निवड झालेल्याची नियुक्ती झाल्यावर हे निलंबन रद्द होईल व असे निलंबन झाल्यावर १८० ( एकशे ऐंशी ) दिवसानंतर बदली नियुक्ती न झाल्यास, औरंगाबाद मनपा सवलत कराराच्या तरतुदीनुसार ताबडतोब एक समाप्तीची सूचना जारी करून सवलत करार रद्द करेल.

मात्र धनको किंवा त्यांचे प्रतिनिधी व सवलतधारक यांचेकडून लेखी विनंती झाल्यास, औरंगाबाद मनपा हा १८० ( एकशे ऐंशी ) दिवसांचा कालावधी आणखी ९० (नव्वद) दिवसांकरिता वाढवू शकेल.

## ३.४ बदलाची प्रक्रिया

अ) औरंगाबाद मनपा व सवलतधारक हे मान्य करतात की आर्थिक कसुरीची सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकाच्या दिवशी किंवा नंतर किंवा कलम ३.३ नुसार औरंगाबाद मनपाच्या निवेदनानंतर, जशी बाब असेल तसे, धनको किंवा त्यांचे प्रतिनिधी, त्यांच्या धनको म्हणून असलेल्या अधिकारांना किंवा इतर उपाययोजनांना बाधा न आणता, सवलतधारकाच्या बदल्यात व सवलत करारातील अधिकार व दायित्वे घेण्यासाठी संभाव्य नियोक्त्यामधून खासगी वाटाघाटी किंवा सार्वजनिक लिलाव किंवा निविदाद्वारे, देकार आमंत्रित, वाटाघाटीत किंवा प्राप्त करू शकतात.

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



आ) सवलतधारकाची जागा घेण्यासाठी पात्र होण्यासाठी नियोक्त्याने, प्रकल्प बहाल करण्यासाठी बोलीदारांची लघु निवड यादी करताना जे अर्हतेचे निकष घालून दिले होते, ते नियोक्त्याने पूर्ण केलेले असले पाहिजेत.

मात्र धनको किंवा त्यांचे प्रतिनिधी हे प्रकालापाच्या हितासाठी एखादा अर्हतेच्या निकषाचे अधित्यजन करण्यासाठी औरंगाबाद मनपाला विनंती करू शकतात व अशा अधित्यजनामुळे प्रकल्पावर कोणताही महत्वाचा प्रतिकूल परिणाम होणार नाही असा औरंगाबद मनपाचा निर्णय झाल्यास, ते असा किंवा सर्व अर्हतेचे निकष अधित्याजित करू शकतात.

इ) नियुक्त्याची निवड केल्यानंतर, घनको किंवा त्यांचे प्रतिनिधी औरंगाबाद मनपाला

i. सवलत करार, प्रकल्प जमीन करार, जल प्रदान राखीव खाते करार व इतर संबंधित करारान्वये असलेले अधिकार व दायित्वे निवड झालेला हस्तांतरित करण्यासाठी रुकार द्यावा

ii. सवलत करार, प्रकल्प जमीन करार, जल प्रदान राखीव खाते करार व इतर संबंधित करार यांचे नुतनीकरण अशा तऱ्हेने करावी जेणे करून शिल्लक सवलत कालावधीसाठी निवड झालेला नियुक्ता सवलतधारकाची जागा घेऊन सवलतधारकाचे अधिकार व दायित्वे निवड झालेल्या नियुक्ताला हस्तांतरित होतील.

ई)औरंगाबाद मनपाला ह्या करारानुसार निवड झालेल्या नियुक्ताबद्दल आक्षेप असल्यास, तर धनको किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी प्रस्ताव दिल्यानंतर ७ ( सात) दिवसांचे आत धनको किंवा त्यांच्या प्रतिनिधींचे म्हणणे ऐकल्यानंतर कारण मिमांसे सहित औरंगाबाद मनपाने आदेश दिले पाहिजेत. औरंगाबाद मनपा हे मान्य करीत आहे की त्यांच्या प्रकल्पाशी संबंधित दिनांक {.} च्या मूळ RFQ किंवा RFG मध्ये विनिर्देशीत केलेल्या आर्थिक व तांत्रिक क्षमतेच्या गरजा निवड झालेला पूर्ण करीत असल्यास ते धनको यांच्या नियुक्तीला आक्षेप घेणार नाहीत. जर औरंगाबाद मनपाने ७ ( सात) दिवसांचे आत कोठलाही आक्षेप घेतला नाही तर निवड झालेला मान्य असल्याचे मानले जाईल.

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



त्यानंतर औरंगाबाद मनपाने निवड झालेला मान्य केल्यानंतर / मान्य केला असे मानल्यानंतर ७ ( सात) दिवसांचे आत सवलत कराराचे नवीनीकरण केले पाहिजे.

जर औरंगाबाद मनपाने आक्षेप घेतला तर धनको यांच्या प्रतिनिधींनी दुसरा निवड झालेला प्रस्तावित केल्यास, त्यानंतर कलम ३.४ मध्ये सवलतधारकाच्या जागी दुसरा नियुक्ता बदली करण्यासाठी नमूद केलेली प्रक्रिया पार पाडावी लागेल.

## ३.५ निवड बंधनकारक असेल

निवड झाल्याची निवड करण्याबाबत धनको व औरंगाबाद मनपा यांचा निर्णय अंतिम असेल व तो सवलतधाराकावर बंधनकारक असेल. नियुक्ती झाल्याच्या पक्षात सवलत करार, प्रकल्प जमीन करार, जल प्रदान राखीव खाते करार व इतर संबंधित करार यांचे नुतनीकरण/ हस्तांतरण, धनको व औरंगाबाद मनपा ह्यांनी केल्यास त्या कारवाईला आव्हान देण्याचा आपला अधिकार सवलतधारक अधित्यजित आहे. सवलतधारक हे मान्य करून अशी पृष्टी करतात की सवलतधरकाचे भाग किंवा प्रकल्पामध्ये असलेल्या मालमत्तेचे पुनर्मुल्य निर्धारण करण्याची मागणी करण्याचा त्यांना काहीही अधिकार असणार नाही. हे अभिस्वीकृत केले जाते की धनको / त्यांचे प्रतिनिधी यांचे अधिकार बदलता न येणारे असून ते कोणत्याही न्यायालयाच्या किंवा औरंगाबाद मनपा पुढील कार्यवाहीपुढे आव्हान देता येणार नाही व धनको किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी विनंती केल्यानंतर औरंगाबाद मनपा व धनको किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या आवश्यकतेप्रमाणे प्रकल्पाचे हस्तांतरण थांबविण्याचा किंवा मनाई करण्याचा कोणताही अधिकार सवलतधारकाला असणार नाही.

## ४) सवलत करारामध्ये निवड झालेल्याचे नाव

प्रत्येक करारामध्ये निवड झालेला सवलतधारकाची जागा घेऊ शकेल व अशी जागा घेतल्यावर सवलत करारा प्रमाणे सवलतधारकाची सर्व दायित्वे व अधिकार अंगिकारू शकेल अशा तरतुदी असतील ह्याची सवलतधारकाने काळजी घेतली पाहिजे.

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा



## ५) सवलत कराराची समाप्ती

### ५.१) आर्थिक कसूर उदभवल्यास कराराची समाप्ती.

आर्थिक कसुरीची सूचना जारी केल्यानंतर कोणत्याही वेळी, धनको / धनकोंचे प्रतिनिधी लेखी विनंती करून अशी सूचना देऊ शकतात की औरंगाबाद मनपाने हा सवलत करार समाप्त करावा व अशी लेखी सूचना प्राप्त झाल्यावर, सवलत करारात परवानगी दिल्या प्रमाणे व सवलत करारानुसार, औरंगाबाद मनपा हा करार समाप्त करेल.

### ५.२) निवड झालेला निवडला न गेल्यास कराराची समाप्ती

एकशे ऐंशी (१८०) दिवसांचे कालावधीत धनको / धनकोंचे प्रतिनिधी यांनी निवड व शिफारस केलेला औरंगाबाद मनपाला मान्य नसल्यास, कलम ३.३ (ब) मध्ये नमूद केल्यानुसार औरंगाबाद मनपा सवलत करारानुसार सवलत करार समाप्त करू शकेल.

### ५.३ ) देय ऋणाची वसुली

औरंगाबाद मनपा व सवलतधारक हे मान्य करतात की त्यांच्या कुठल्याही अधिकाराला किंवा उपाययोजनेला बाधा न आणता, करार समाप्त झाल्यावर सवलतधारकाला कुठल्याही निर्देशा किवा त्यांच्या संमती शिवाय ऋणाची देय असलेली रक्कम सवलतधारका कडून परत प्राप्त करण्याचा  धनकोंना अधिकार आहे.

## ६) कराराचा कालावधी

### ६.१) कराराचा कालावधी

हा करार यापुढील दिनांकास अमलात येईल व खालीलपैकी कोणतीही घटना घडल्यास समाप्त होईल.

अ) हा करार समाप्त झाल्यास

आ)आर्थिक करारानुसार धनकोंना कुठलाही रक्कम अग्रिम द्यावयाची शिल्लक नाही किंवा देणे नाही.

७) क्षतिपूर्ति

७.१ सामान्य क्षतिपूर्ति

अ) सवलतधारक, त्यांच्याकडून ह्या करारातील दायित्वाचे भंग किंवा पालन न झाल्यामुळे किंवा कोणत्याही लागू कायद्याचे किंवा परवान्याचे पालन न झाल्यामुळे , उद्भवलेल्या सर्व किंवा कोणत्याही दावा, कामकाज, कारवाई, मागणी, व तृतीय पक्षाच्या कुठल्याही प्रकारच्या व स्वरूपाच्या नुकसान व खर्चापासून औरंगाबाद मनपा, व धनको किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना क्षतिपूर्त, व कोणत्याही नुकसानीपासून मुक्त ठेवीत आहेत.

आ)औरंगाबाद मनपा, त्यांच्या, त्यांच्या अधिकाऱ्यांच्या, सेवकांच्या व प्रतीनिधीच्या विधीसंमत कार्याचे निर्वाहन करताना उद्भवलेल्या कृती सोडून, त्यांच्याकडून ह्या करारातील दायित्वाचे पालन न झाल्यामुळे , उद्भवलेल्या सर्व किंवा कोणत्याही दावा, कामकाज, कारवाई, मागणी, व तृतीय पक्षाच्या कुठल्याही प्रकारच्या व स्वरूपाच्या नुकसान व खर्चापासून व ज्यामुळे सवलतधारकांना ह्या किंवा सवलत करारा नुसार असलेल्या त्यांच्या दायित्वाचे निर्वाहन करण्यावर प्रतिकूल व महत्वाचा परिणाम करणाऱ्या बाबीपासून सवलतधारक यांना क्षतिपूर्त, व कोणत्याही नुकसानीपासून मुक्त ठेवीत आहेत.

इ) धनको / धनकोंचे प्रतिनिधी, त्यांच्या, त्यांच्या अधिकाऱ्यांच्या, सेवकांच्या व प्रतीनिधीच्या विधीसंमत कार्याचे निर्वाहन करताना उद्भवलेल्या कृती सोडून, त्यांच्याकडून ह्या करारातील दायित्वाचे पालन न झाल्यामुळे , उद्भवलेल्या सर्व किंवा कोणत्याही दावा, कामकाज, कारवाई, मागणी, व तृतीय पक्षाच्या कुठल्याही प्रकारच्या व स्वरूपाच्या नुकसान व खर्चापासून व ज्यामुळे सवलतधारकांना ह्या किंवा सवलत करारा नुसार असलेल्या त्यांच्या दायित्वाचे निर्वाहन करण्यावर प्रतिकूल व महत्वाचा

परिणाम करणाऱ्या बाबीपासून सवलतधारक यांना क्षतिपूर्त, व कोणत्याही नुकसानीपासून मुक्त ठेवीत आहेत.

### ७.२ दाव्यांची सूचना व लढविणे

एखाद्या पक्षास तृतीय पक्षाकडून, कलम ७ नुसार ज्या बाबतीत क्षतीपुरित असण्याचा किंवा प्रतिपूर्ती प्राप्त करण्याचा त्याचा अधिकार आहे (क्षतिपूर्तिग्राही पक्ष), दावा किंवा मागणी प्राप्त झाल्यास तर क्षतीपुरण करणाऱ्या पक्षास (क्षतीपुरक पक्ष) अशी दावा किंवा मागणी प्राप्त झाल्याच्या १५ दिवसांचे आत सूचना दिली पाहिजे व क्षतीपुरक पक्षाच्या पुर्वानुमती शिवाय दाव्यात तडजोड किंवा रक्कम अदा करता कामा नये. जर क्षतीपुरक पक्षास हा दावा लढवायचा असेल, तर क्षतिपूर्तिग्राही पक्षाचे दाव्याच्या खर्चाबाबत ते क्षतीपुरित असल्याचे संयुक्तिक समाधान करून क्षतीपुरक पक्षास क्षतिपूर्तिग्राही पक्षाच्या नावाने दावा लढविता येईल. क्षतिपूर्तिग्राहक पक्षाने असा दावा लढविण्यासाठी क्षतीपुरक पक्षाला आवश्यक असलेले सहकार्य केले पाहिजे व क्ष्तीपुरक पक्षाला जी कागदपत्रे व लिखाण वाजविपणे आवश्यक वाटेल तिथे स्वाक्षऱ्या केल्या पाहिजेत.

## ८) दाव्याचे निराकरण

### ८.१ दाव्याचे निराकरण

अ) ह्या करारातून किंवा त्याच्याशी संबंधित बाबीतून उद्भवलेला विवाद, मतभेद वा दावा सलोख्याने निवारण न झाल्यास तो सवलतधारक, औरंगाबाद मनपा व धनको / त्यांचे प्रतिनिधी यांचा प्रत्येकी एक सदस्य असलेल्या लवादाकडे सुपूर्द केला जाईल. असा लवाद हा आंतरराष्ट्रीय पर्यायी विवाद निवारण केंद्र, नवी दिल्ली यांच्या किंवा परस्पर संमतीने मान्य असलेल्या नियमांच्या नुसार लवाद आपले काम करेल व लवाद व समेट अधिनियम १९९६ च्या तरतुदींच्या अधीन असेल.

आ) पंच हे सुज्ञ निवाडा देतील (निवाडा ). अशा लवादाचे ठिकाण औरंगाबाद येथे असेल व लवादाची भाषा इंग्रजी असेल

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



## ९) संकीर्ण तरतुदी

### ९.१ कार्यान्वयन करावयाचे अधिकार

सर्व पक्ष अभिव्यक्त करून असे आश्वस्त करतात की त्यांना हा करार हस्ताक्षारीत व कार्यान्वित करण्याचा पूर्ण अधिकार आहे.

### ९.२ नियमन कायदे व न्यायाधिकार

ह्या करारचे भारतीय कायद्यांच्या अनुसार अन्वयार्थ लावला व अर्थउकल केली जाईल व औरंगाबाद येथील न्यायालयांना ह्या करारातून किंवा संबंधित बाबीतून उद्भवणाऱ्या बाबींवर न्यायाधिकर असेल.

### ९.३ उन्मुक्ततेचे अधित्यजन

औरंगाबाद मनपा बिनशर्त व बदल न करता मान्य करते की

अ) ह्या कराराचे त्यांच्याकडून कार्यान्वयन, सोपविणे व पालन व त्याअंतर्गत येणाऱ्या बाबी ही वाणिज्यिक कार्ये असून ते वाणिज्यिक उद्देशाने केले गेले आहे.

आ)ह्या कराराशी संबंधातून त्यांच्या विरुद्ध किंवा त्यांच्या मालमत्ता, संपत्ती किंवा महसुला विरुद्ध काही कामकाज झाल्यास अशा कामकाजापासून किंवा त्यांच्या मालमत्ता, संपत्ती किंवा महसुला संदर्भात कुठलीही सार्वभौम उन्मुक्ततेच दावा करण्यात येणार नाही.

इ) त्यांच्या मालमत्ता, संपत्ती किंवा महसुलाला आत्ता जी उन्मुक्तता लागू आहे किंवा भविष्यात मिळेल किंवा कोणत्याही क्षमतेमध्ये त्यांना लागू होईल अशी सर्व उन्मुक्ततेचे अधित्याजन करीत आहेत.

ई) त्यांच्या विरुद्धच्या कुठल्याही न्याय निर्णयाची किंवा निवाड्याची अंमलबजावणी करताना कुठलाही अनुतोष देण्यास किंवा कुठल्याही न्यायाधिकारामध्ये ह्या कामकाजाशी संबंधित प्रक्रिया जारी करणे ( त्यांच्या विरुद्ध कुठलीही अंमलबजावणी

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

करणे, किंवा मालमत्ता, संपत्ती किंवा महसुला संदर्भात त्याचा वापर किंवा उद्देशीत वापर जमेला न धरता त्याच्याशी संबंधित तो न्यायनिर्णय दिला जाईल तो )

## ९.४ बदल

हा करार लिखित स्वरुपात व दोन्ही पक्षांच्या स्वाक्षऱ्या करूनच बदलता येईल.

## ९.५ इतर आर्थिक करारांचे अल्पीकरण नाही

हा करार इतर आर्थिक करारांच्या शर्तींच्या अतिरिक्त असून त्या शर्तीचे अल्पीकरण होणार नाही.

## ९.६ अधित्यजन

कोणत्याही पक्षाने दुसऱ्या पक्ष्याने ह्या कराराचे दायित्व निभावण्या किंवा तरतुदींचे पालन करण्याबाबत केलेल्या कसुरीमुळे केलेले अधित्यजन, मग ते अंशतः किंवा सशर्त असले तरीही

अ) इतर कुठल्याही किंवा नंतरच्या ह्या कराराचे दायित्व निभावण्या किंवा तरतुदींचे पालन करण्याबाबत केलेल्या कसुरीमुळे केलेले अधित्यजन आहे असा अर्थ लावला जाणार नाही

आ) ते लेखी व पक्षाच्या यथाविधी अधिकृत प्रतिनिधीने स्वाक्षरीत केल्याशिवाय प्रभावी होणार नाही.

इ) कुठल्याही तऱ्हेने ह्या कराराच्या वैधतेवर व अंमलबजावणीवर कोणताही परिणाम होणार नाही.

## ९.७ तृतीय पक्ष लाभार्थी नाहीत

हा करार दोन्ही पक्षांच्या त्यांच्या वारसदारांच्या व परवानगीधारक अभिहस्तांकीतांच्या फायद्यासाठी उद्देशीत असून ह्या करारातील कशाचाही ह्या कराराशी संबंधित नसलेल्या व्यक्तीप्रती दायित्व किंवा कर्तव्य निर्माण करण्यासाठी असल्याचा अन्वयार्थ काढला जाऊ नये

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



## ९.८ उत्तरजीवित्व

अ) सवलतकाळाची समाप्ती किंवा रद्दीकरण

v. सवलतधारक किंवा औरंगाबाद मनपा , जशी बाब असेल तशी, यांना व्यक्तपणे किंवा अभिप्रेत अशा कोणत्याही दायित्वातून मुक्त होता येणार नाही.

vi. ह्या कराराच्या कोणत्याही तरतुदीमध्ये कोणत्याही पक्षाचे दायित्व मर्यादित करणारी तरतूद, हा करार समाप्त किंवा रद्द होण्यापूर्वी किंवा त्यातून उद्भवणाऱ्या कुठल्याही कृतीमुळे किंवा वगळ यामुळे झालेल्या नुकसानीतून किंवा हानीतून उद्भवणाऱ्या दायित्वामधून दोन्ही पक्षांची मुक्तता होणार नाही.

ई) सवलतीचा कालावधी संपल्यानंतर उत्तर्जीवी असलेली सर्व दायित्वे असा कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकानंतर १(एक) वर्ष्याच्या कालावधीकरिता उत्तरजीवी असतील.

९.९ उपाय योजना समाप्त करणे

ह्या करारातील तरतुदी आवाहन करण्यापूर्वी धनको किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी इतर उपाय योजना अमलात आणणे आवश्यक असणार नाही हे सवलतधारक मान्य व कबुल करतात.

## ९.१० पृथक्करण

काही कारणाने ह्या कराराची कुठलीही तरतूद अवैध, बेकायदेशीर किंवा अमलात आणण्यायोग्य नसल्यास किंवा सक्षम कार्यकक्षा असलेल्या कुठल्याही न्यायालयाने किंवा निमित्तात्वाने अवैध, बेकायदेशीर किंवा अमलात आणण्यायोग्य नसल्याचे घोषित केल्यास, त्याच इतर तरतुदींवर काहीही परिणाम होणार नाही व दोन्ही पक्ष अशा अवैध, बेकायदेशीर किंवा अमलात आणण्यायोग्य नसलेल्या तरतुदीच्या बदली एक किंवा अनेक तरतुदी करण्यासाठी वाटाघाटी करतील. ह्या करारामध्ये कोठेही काही विपरीत असल्यास त्याचा विचार न करता, दोन्ही पक्ष सहमत आहेत की अशा तरतुदींवर सहमती न झाल्यास तो ह्या करारात नमूद वाद निवारण प्रणालीचा विषय असणार नाही.

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



९.११वारसदार व परवानाधारक अभिहस्तांकिती

हा करार दोन्ही पक्ष, त्यांचे वारसदार व परवानाधारक अभिहस्तांकिती ह्या दोघांवरही बंधनकारक असेल व त्यांच्या लाभाकरिता निर्धावला असेल .

९.१२  मुद्रांक शुल्क

ह्या कराराला किंवा सवलत कराराच्या दुरुस्तीला किंवा आधी उल्लेख केल्याप्रमाणे बदली साठी नवीन सवलत करार कार्यान्वीत करण्यासाठी लागू असलेले मुद्रांक शुल्क व इतर खर्च, औरंगाबाद मनपा किंवा धनको /  धनकोंचे प्रतिनिधी यांनी केले असले तरीही, यांची जबाबदारी सवलतधाराकावर असेल.

११.१२  सूचना

कोणत्याही पक्षाने दुसऱ्या पक्षाला ह्या करारांतर्गत किंवा संबंधित बाबींबाबत द्यावयाची सूचना  ही लेखी स्वरुपात हाती, मान्यता प्राप्त अंगाडिया, नोंदणीकृत डाक, किंवा फॅक्स द्वारे खालील पत्त्यावर पाठविण्यात  किंवा प्रसारित करण्यात येईल

जर औरंगाबाद मनपाला असल्यास :

[.]
दूरध्वनी : [.]
फॅक्स : [.]
इमेल : [.]

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



सवलतधारकाला असल्यास :

श्री सुशील सेठी
व्यवस्थापकीय संचालक,
एसपीएमएल इन्फ्रा मर्यादित,
भूखंड क्र ६५, विभाग क्र ३२,
गुरगाव १२२००१
दूरध्वनी : +९१-११-४६८६१२००
फॅक्स : +९१-११-४६८६१२२२
इमेल : info@spml.co.in

धनको किंवा धनको यांच्या प्रतिनिधींना असल्यास :
[.]
दूरध्वनी : [.]
फॅक्स : [.]
ई-मेल : [,]

### ११.१३ भाषा

ह्या करारान्वये एका पक्षाने दुसऱ्या पक्षास द्यावयाच्या सूचना, व इतर पत्रव्यवहार, लेखी कागदपत्रे, व कामकाज हे लेखी स्वरुपात मराठी / इंग्रजी भाषेमध्ये केल्या जातील.

### ११.१४ अधिकृत प्रतिनिधी

प्रत्येक पक्ष लेखी सूचनेद्वारे प्रत्येकी त्यांचे अधिकृत प्रतिनिधी पदनिर्देशित करतील व तय्न्च्या मार्फत सर्व पत्रव्यवहार केला जाईल. तसेच प्रत्येक पक्षाला असा अधिकृत प्रतिनिधी सूचनेद्वारे काढून टाकण्याचा आणि / किंवा बदलण्याचा किंवा नवीन नियुक्तीचा अधिकार आहे.

### ११.१५ प्रतिरूप

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



हा करार तीन  प्रतीरुपांमध्ये स्वाक्षरीत होऊन सुपूर्द केला जाईल, तेव्हा तो मूळ करार असेल.

**११.१६ सौम्यकरण**

ह्या करारातील दोन्ही पक्षांचे सौम्यकरण दायित्वाच्या व्यक्त तरतुदीनां बाधा न आणता सवलत धारक व औरंगाबाद मनपा, ह्या करारानुसार संबंधित पक्षाला दुसऱ्या पक्षांविरुद्ध दावा करण्याचा अधिकार आहे अशा बाबींपासून होणारी हानी सौम्य व कमीतकमी करण्यासाठी आवश्यक ते सर्व उपाय करतील.

ह्याचे साक्षी म्हणून दोन्ही पक्षांनी स्वाक्षरी करून हा करार उपरोल्लेखित दिनांकास सोपविला.

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता
सही /-
नाव
पदनाम
पत्ता
फॅक्स

औरंगाबाद महानगरपालिके करिता व वतीने
सही /-
नाव
पदनाम
पत्ता
फॅक्स

धनकोंचे वतीने व करिता
सही

नाव
पदनाम
पत्ता
फॅक्स

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
| --- | --- | --- |
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



अनुसूची २३ – बोलीची कागदपत्रे

अर्हते करिता विनंती

अर्हतेच्या विनंतीला संघाचा प्रतिसाद

प्रस्तावाकरिता विनंती ( खंड १ – बोली करणाऱ्यांसाठी सूचना )

प्रस्तावाकरिता विनंती ( खंड २ – प्रकल्प माहिती निवेदन )

प्रस्तावाच्या विनंतीला संघाचा प्रतिसाद

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



## अनुसूची २४ – सेवा पातळी आवश्यकता

सेवा पातळी आवश्यकता दोन प्रकारांमध्ये विभाजित करता येईल

१) भाग अ : सीओडी पूर्व सेवा पातळी आवश्यकता : सीओडी पूर्व सेवा पातळी आवश्यकता ह्या प्रकल्पाच्या बांधकाम व पुनर्वसन कालावधी व सवलत कालावधीच्या वर्ष १ ते वर्ष ३ ह्या साठी लागू असतील

२) भाग ब : सीओडी उत्तर सेवा पातळी आवश्यकता : सीओडी उत्तर सेवा पातळी आवश्यकता ह्या प्रकल्पाच्या परिचालन व देखभाल कालावधीच्या व सवलत कालावधीच्या वर्ष ४ ते वर्ष २० ह्या साठी लागू असतील

सीओडी पूर्व सेवा पातळी आवश्यकता:

बदलणारी वार्षिक परीचालन आधार अनुदान रक्कम प्रदान करण्यासाठी सवलतधारकाने बांधकाम व पुनर्वसन कालावधीमध्ये खालील तक्त्यानुसार सेवा पातळी आवश्यकता साध्य केल्या पाहिजेत (सीओडी पूर्व सेवा पातळी आवश्यकता)

| अक्र | चलित मूल्य | वर्ष १ | वर्ष २ | वर्ष ३ |
|---|---|---|---|---|

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | पिण्यायोग्य पाण्याचे उत्पादन | कमीतकमी १३५ दशलक्ष लिटर | कमीतकमी १३५ दशलक्ष लिटर | कमीतकमी १३५ दशलक्ष लिटर |
| २ | घाऊक उत्पादन मापकांचे संस्थापन | सवलतधारक व स्वतंत्र अभियंता यांनी सूचित केलेल्या १००% ठिकाणी | या मापकांची नियमित देखभाल | या मापकांची नियमित देखभाल |
| ३ | घाऊक वितरण मापकांचे संस्थापन | सवलतधारक व स्वतंत्र अभियंता यांनी सूचित केलेल्या १००% ठिकाणी | या मापकांची नियमित देखभाल | या मापकांची नियमित देखभाल |
| ४ | सेवा क्षेत्राचा समावेश | औरंगाबाद मनपाच्या सध्या अस्तित्वात असलेल्या १००% ग्राहकांना व मनपाच्या हद्दीत असलेल्या नवीन ग्राहकाला १००% पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा करणे | औरंगाबाद मनपाच्या सध्या अस्तित्वात असलेल्या १००% ग्राहकांना व मनपाच्या हद्दीत असलेल्या नवीन ग्राहकाला १००% पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा करणे | औरंगाबाद मनपाच्या सध्या अस्तित्वात असलेल्या १००% ग्राहकांना व मनपाच्या हद्दीत असलेल्या नवीन ग्राहकाला १००% पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा करणे |
| ५ | घरगुती सर्वेक्षण १ | १००% घरे | नवीन जोडांवर आधारित आधारसमग्र अद्ययावत करणे | नवीन जोडांवर आधारित आधारसमग्र अद्ययावत करणे |
| ६ | ग्राहकांच्या जोडाच्या ठिकाणी मापक संस्थापित करणे | एकूण ग्राहकांच्या १००% | एकूण ग्राहकांच्या ४०% | एकूण ग्राहकांच्या १००% |

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



| | २ | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | ग्राहक तक्रार नोंदणी व देखरेख प्रणाली | | सवलत कालावधीच्या दुसऱ्या वर्षाच्या समाप्तीपूर्वी कार्यान्वित | प्रणालीची नियमित देखभाल करणे |
| ८ | संगणकीकृत देयक व वसुली प्रणाली | | सवलत कालावधीच्या दुसऱ्या वर्षाच्या समाप्तीपूर्वी कार्यान्वित | प्रणालीची नियमित देखभाल करणे |
| ९ | पाणी पुरवठा | | सर्व ग्राहकांना नित्य पुरवठा | सर्व ग्राहकांना नित्य पुरवठा |

बांधकाम व पुनर्वसन कालावधीतील बदलती वार्षिक परिचालन अनुदान खालील आधारावर प्रदान केले जाईल

१) वर्ष १ : सेवा पातळी आवश्यकतेशी कुठलाही संबंध न जोडता

२) वर्ष २ : सवलत कालावधीच्या प्रथम वर्षाच्या नमूद सेवा पातळी आवश्यकता पूर्ण झाल्यावर. जर सवलतधारक प्रथम वर्षाच्या नमूद सेवा पातळी आवश्यकता पूर्ण करण्यास असफल ठरला तर संबंधित बदलती वार्षिक परिचालन अनुदानाची रक्कम रोखून धरली जाईल. अशी रोखून धरलेली दुसऱ्या वर्षाची बदलती वार्षिक परिचालन अनुदानाची रक्कम प्रथम वर्षाची नमूद सेवा पातळी आवश्यकता पूर्ण झाल्यावरच प्रदान केली जाईल.

३) वर्ष ३ : सवलत कालावधीच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या नमूद सेवा पातळी आवश्यकता पूर्ण झाल्यावर. जर सवलतधारक प्रथम व द्वितीय वर्षाच्या नमूद सेवा पातळी आवश्यकता पूर्ण करण्यास असफल ठरला तर संबंधित बदलती वार्षिक परिचालन अनुदानाची रक्कम रोखून धरली जाईल. अशी रोखून धरलेली तिसऱ्या वर्षाची बदलती वार्षिक परिचालन अनुदानाची रक्कम प्रथम व द्वितीय वर्षाची नमूद सेवा पातळी आवश्यकता पूर्ण झाल्यावरच प्रदान केली जाईल.

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



## सीओडी उत्तर सेवा पातळी आवश्यकता:

बदलणारी वार्षिक परीचालन आधार अनुदान रक्कम प्रदान करण्यासाठी सवलतधारकाने परिचालन व देखभाल कालावधीमध्ये खालील तक्त्यानुसार सेवा पातळी आवश्यकता साध्य केल्या पाहिजेत (सीओडी उत्तर सेवा पातळी आवश्यकता)

| अक्र | चलित मूल्य | पासंग | वर्ष ४ | वर्ष ५ | वर्ष ६ | वर्ष ७ ते २० |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्राहकांचा समावेश करणे | २५% | सेवा क्षेत्रामध्ये १००% समावेश | सेवा क्षेत्रामध्ये १००% समावेश | सेवा क्षेत्रामध्ये १००% समावेश | सेवा क्षेत्रामध्ये १००% समावेश |
| २ | ग्राहकांच्या मापकांचे कार्य ३ | १०% | प्रत्येक तिमाही मध्ये एकूण ग्राहक मापाकांच्या ९५% मापक कार्यान्वित असले पाहिजेत | | | |
| ३ | पाण्याची गळती४ | २५% | जास्तीतजास्त २५% | जास्तीतजास्त २०% | जास्तीतजास्त १५% | जास्तीतजास्त १५% |

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | तक्रार व्यवस्थापन प्रणाली | १०% | प्राप्त तक्रारींपैकी कमीतकमी ८०% तक्रारी २४ तासात अटेंड झाल्या पाहिजेत व नोंदणी झाल्याच्या ७२ तासात त्याचे निराकारण झाले पाहिजे | |
| ५ | पाणी पुरवठा ६ | २०% | सर्व ग्राहकांना नित्य पुरवठा | सर्व ग्राहकांना वर्षाकाठी २४ तास पुरवठा |
| ६ | पुरविलेल्या पाण्याची पिण्यायोग्यता | १०% | सीपीईईएचओ च्या निकषांप्रमाणे असणे आवश्यक | |

परिचालन व देखभाल कालावधीतील बदलती वार्षिक परिचालन अनुदान खालील आधारावर प्रदान केले जाईल

१) अट क्र १ - सवलत कालावधीच्या बांधकाम व पुनर्वसन कालावधीच्या म्हणजेच पहिल्या ते तिसऱ्या वर्षाच्या नमूद सेवा पातळी आवश्यकता पूर्ण झाल्यावर. जर सवलतधारक सवलत काळाच्या बांधकाम व पुनर्वसन कालावधीच्या नमूद सेवा पातळी आवश्यकता पूर्ण करण्यास असफल ठरला तर संबंधित बदलती वार्षिक परिचालन अनुदानाची रक्कम रोखून धरली जाईल. अशी रोखून धरलेली बदलती वार्षिक परिचालन अनुदानाची रक्कम बांधकाम व पुनर्वसन कालावधीच्या नमूद सेवा पातळी आवश्यकता पूर्ण झाल्यावरच प्रदान केली जाईल.

२) अट क्र २ - सवलत कालावधीच्या परिचालन व देखभाल कालावधीतील नमूद सेवा पातळी आवश्यकता पूर्ण झाल्यावर म्हणजेच सवलत कालावधीतील चौथे ते विसावे वर्ष. संबंधित बदलती वार्षिक परिचालन अनुदानाची रक्कम ही प्रत्येक सेवा पातळी आवश्यकतेच्या पासंगाच्या प्रमाणात प्रदान केली जाईल. जर सवलतधारक नमूद सेवा पातळी आवश्यकता पूर्ण करु शकला नाही तर संबंधित बदलती वार्षिक परिचालन अनुदानाच्या देय रकमेतून वजा केली जाईल. सवलत कालावधीतील चौथ्या ते विसाव्या वर्षा पर्यंत अशी वजा केलेली रक्कम सवलतधारकाला प्रदान केली जाणार नाही.

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



१) औरंगाबाद मनपा कडून घरगुती सर्वेक्षणाच्या अटी कळविल्या जातील

२) सर्व नवीन जोड पहिल्या दिवसापासून मापित झाले पाहिजेत.

३) सवलतधारक स्वतंत्र अभियंता यांना सदर केलेल्या तिमाही अहवालावरून ग्राहकांच्या एकूण संस्थापित मापकांचे १% स्वैर नमुना गोळा करून हे परिचलित मूल्य मुल्यामापित केले पाहिजे.

४) पाणी गळती म्हणजे स्त्रोतामधून उचललेले अपरीश्कृत पाणी वजा ग्राहकाला बिजकीत केलेले पाणी अधिक अग्निशमनाकरिता वापरलेले निशुल्क पाणी. बिजाकीत केलेले पाणी हे सर्व ग्राहकांच्या बिजकांची बेरीज असेल तर स्त्रोतातून उचललेले अपरिष्कृत पाणी म्हणजे पाटबंधारे विभागाच्या बिजकाप्रमाणे असेल.

५) हे परीचालीत मूल्य स्वतंत्र अभियंता व सवलतधारक यांनी आधीच ठरवलेल्या ठिकाणी असलेल्या पाण्याच्या दाबाचे मोजमाप करून मुल्यामापित केले पाहिजे.

६) उदाहरणार्थ सवलतधारक बदलती वार्षिक परिचालन अनुदानाची रु ५० लाख रकमेचा हक्कदार असेल व 'ग्राहकांचा समावेश' हे परीचालीत मूल्य जर ते सध्या करू शकले नाहीत तर औरंगाबाद मनपा १०% बदलती वार्षिक परिचालन अनुदानाची रक्कम म्हणजेच रु ५ लाख वजा करून रु ४५ लाख सवलतधारकाला अदा करतील. जर सवलतधारक सेवा पातळी आवश्यकता पूर्ण करू शकला नाही, तर औरंगाबाद मनपा संपूर्ण तिमाही बदलती परिचालन अनुदानाची रक्कम म्हणजेच रु ५० लाख रोखून धरेल

महाराष्ट्र EB ५२५३६३

स्वाक्षरीत
जियाउद्दीन सिद्दिकी
मुद्रांक विक्रेता औरंगाबाद

स्वाक्षरीत
श्री पी एन भापकर
आयुक्त औरंगाबाद मनपा

# मुखत्यारपत्र

जे कोणी हजर असलेले येणारे असतील, औरंगाबाद महाराष्ट्रा येथे कार्यालय असलेली औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद (त्यामध्ये त्यांचे वारस व अनुज्ञात अभिहस्तांकितांचा समावेश असेल) यांचे प्रतिनिधित्व करीत असलेले आयुक्त.

ज्या अर्थी

अ) दि २२ सप्टेंबर २०११ रोजी एका कराराद्वारे (यानंतर याचा उल्लेख "तो करार असा होईल) औरंगाबाद मनपाने १९५६ च्या कंपनी कायद्याअन्वये नोंदणीकृत असलेली व पंजीकृत कार्यालय २०६ मार्तंड इमारत, कॅनरा बँकेच्या वर, डॉ अॅनी बेझंट रस्ता वरळी नाका मुंबई असलेल्या **औरंगाबाद शहर जल सुविधा कंपनी लिमिटेड** (ह्यानंतर

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



यांचा उल्लेख 'सवलतधारक' असा होईल ) ह्यांना सार्वजनिक – खासगी भागीदारी आधारावर औरंगाबाद पाणी पुरवठा प्रकल्प अंमलबजावणी करण्यासाठी नियुक्त करीत आहे.

आ) हा करार नोंदणी करण्यासाठी औरंगाबाद मनपाला आवश्यक ते सर्व अधिकार व प्राधिकर बहाल करण्याची इच्छा व्यक्त करीत आहे

ह्या द्वारे नोंद घेतली जावी की औरंगाबाद मनपा ह्याद्वारे श्री सखाराम धोंडीबा पानझाडे, कार्यकारी अभियंता, औरंगाबाद महानगरपालिका यांना हा सवलत करार नोंदणीसाठी त्यांचे वतीने त्यांचे कायदेशीर कुलमुखत्यारधारक व प्रतिनिधी म्हणून नेमणूक व नामनिर्देशन करण्यात येत आहे.

ह्याचे साक्षी म्हणून हा मुख्त्यारपत्र आम्ही ११ ऑक्टोबर २०११ रोजी कार्यान्वित केला आहे.

स्वाक्षरीत
डॉ. पुरुषोत्तम भापकर
आयुक्त
औरंगाबाद महानगरपालिका

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

स्वाक्षरीत
श्री सखाराम धोंडीबा पानझाडे
कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
औरंगाबाद महानगरपालिका

साक्षीदार : स्वाक्षरीत

१) फालक काशिनाथ मुरलीधर
१०६ अ जयविश्वभारती कॉलनी औरंगाबाद

श्री फलक काशिनाथ
मुरलीधर यचे छायाचित्र

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



स्वाक्षरीत

२) बोरसे दादासाहेब दौलतराव
रा. हुडको औरंगाबाद

श्री बोरसे दादासाहेब
दौलतराव यचे
छायाचित्र

औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद
दूरध्वनी : ०२४०-३३३५३६
नाव : काशिनाथ मुरलीधर फलक
पदनाम : सहायक अभियंता
फोटो
स्वाक्षरीत (धारणकर्ता)
स्वाक्षरीत उपायुक्त मनपा

फोटो
स्थायी खाते संख्या : AAMPP8757D
नाव : सखाराम धोंडीबा पानझाडे
वडिलांचे नाव : धोदिबा सखाराम पानझाडे
जन्म तिथी : १८.०६. १९६३
स्वाक्षरीत
स्वाक्षरीत
आयकर आयुक्त नासिक

## दस्त गोषवारा भाग १

| अ ग ग १ |
|---|
| दस्त क्र ४३४३/२०११ |
| ४-५ |

१३.१०.२०११ दुय्यम निबंधक १

११.२६.५४ औरंगाबाद १

दस्त क्र ४२४३/२०११ दस्ताचा प्रकार : मुखत्यारनामा

| आक्र | पक्षकाराचे नाव व पत्ता | पक्षकाराचा प्रकार | छायाचित्र | अंगठ्याचा ठसा |
|---|---|---|---|---|
| १ | नाव : औरंगाबाद मनपा तर्फे कार्यकारी अभियंता सखाराम धोंडीबा पानझाडे<br>पत्ता : घर / फ्लॅट क्र<br>गल्ली / रस्ता<br>इमारतीचे नाव :<br>इमारत क्र :<br>पेठ / वसाहत : सिडको | लिहून घेणार<br>वय : ४८<br>सही :<br><br>स्वाक्षरीत | | |

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| | शहर / गाव : औरंगाबाद | | | |
| २ | नाव : औरंगाबाद मनपा तर्फे आयुक्त श्री पुरषोत्तम निवृत्ती भापकर<br>पत्ता : घर / फ्लॅट क्र<br>गल्ली / रस्ता<br>इमारतीचे नाव :<br>इमारत क्र :<br>पेठ / वसाहत : दिल्ली गेट<br>शहर / गाव : औरंगाबाद | लिहून घेणार<br>वय : ५०<br>सही :<br><br>स्वाक्षरीत | | |

## दस्त गोषवारा भाग २

| अ ग ग १ |
|---|
| दस्त क्र ४३४३/२०११ |
| ५-५ |

दस्त क्र [अगग१ -४३४३-२०११] चा गोषवारा
बाजार मूल्य १ भरलेले मुद्रांक शुल्क – १००
दस्त हजार केल्याचा दि – १२.१०.२०११ ५.२१
निष्पदानाचा दिनांक – १२.१०.२०११
दस्त हजर करणाराची सही : स्वाक्षरीत
दस्ताचा प्रकार : ४८) मुखत्यारनाम
शिक्का क्र १ ची वेळ : (सादरीकरण ५.२१ दु
शिक्का क्र २ ची वेळ : फी १२.१०.२०११ ५. २४
शिक्का क्र ३ ची वेळ : कबुली १३.१०.११ ११.२६ स
शिक्का क्र ४ ची वेळ : ओळख १३.१०.२०११.२६ स

पावती क्र ४५४५ दि. १२.१०.२०११
पावतीचे वर्णन
महानगरपालिका औरंगाबाद तर्फे कार्यकारी अभियंता श्री सखाराम धोंडीबा पानझाडे
१००.०० नोंदणी फी
१००.०० नक्कल (अ. ११(१) पृष्ठांकनाची रुजवात (अ-१२ ) छायाचित्र (अ-१३) एकत्रित फी
२००.०० एकूण

दस्त नोंद केल्याचा दि. १३.१०.२०११ ११.२६ सकाळ

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



ओळख : खालील इसम असे निवेदित करतात की ते दस्तऐवज करून देणाऱ्यांना व्यक्तिशः ओळखतात व त्यांची ओळख पटवितात

स्वाक्षरीत
नाव : काशिनाथ मुर्लीदार फालक
पत्ता : घर / फ्लॅट क्र
गल्ली / रस्ता
इमारतीचे नाव :
इमारत क्र :
पेठ / वसाहत : विश्वभारती कॉलनी
शहर / गाव : औरंगाबाद

स्वाक्षरीत
नाव : दादासाहेब दौलतराव बोरसे
पत्ता : घर / फ्लॅट क्र
गल्ली / रस्ता
इमारतीचे नाव :
इमारत क्र :
पेठ / वसाहत : हुडको
शहर / गाव : औरंगाबाद

स्वाक्षरीत
दुय्यम निबंधक
औरंगाबाद १

चौथे बुकचे ४३४३ नंबरी नोंदला. दि. १३.१०.२०११
प्रमाणित करण्यात येते की या दस्तामध्ये एकूण ५ पाने आहेत.

भारतीय निवडणूक आयोग
ओळखपत्र
CVT3762986
निवडणूक आयोग
चिन्ह
फोटो
मतदाराचे नाव : ज
कन्हैयालाल सिद्ध
वडिलांचे नाव : कन्हैयालाल सिद्ध
लिंग : पुरुष
जन्मतिथी : १.१.१९६७

महाराष्ट्र सरकार
औरंगाबाद महानगरपालिका
ओळखपत्र
फोटो
नाव : एस एस पानझाडे
पदनाम कार्यकारी अभियंता\
कर्मचारी कोड क्र : २२७१
जन्मतिथी : १८ जुने १९६३
रक्तगट : A+ve
भ्रमणध्वनी : ९८२३०७४०२५ कर्मचारी

फोटो
स्थायी खाते संख्या : ADKPC3457A
नाव : वेंकट रमणा कोन्दुरी
वडिलांचे नाव : श्रीनिवासुलू कोन्दुरी
जन्म तिथी : १२.०६.१९६१
स्वाक्षरीत स्वाक्षरीत
आयकर आयुक्त नासिक

फोटो
स्थायी खाते संख्या : ABFPJ4799M
नाव : सूर्यकांत सुभानराव जायेभाये
वडिलांचे नाव : सुभानराव मोनाजी जायेभाये
जन्म तिथी : ०१.०५.१९६५
स्वाक्षरीत स्वाक्षरीत
आयकर आयुक्त नासिक

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



फोटो

दिल्ली सरकार वाहतूक विभाग
संपूर्ण भारतात वाहन चालविण्यासाठी अनुज्ञप्ती
अनुज्ञप्ती क्र : डीएल ०३२००२००६८०७२ वाहनाचा वर्ग जारी केल्याचा दिनांक
नाव : ऋषभ सेठी मोटारसायकल ०२.०८.२००२
वडिलांचे नाव : श्री सुशील सेठी हलके मोटार वाहन ०२.०८.२००२
जन्म तिथी : १५.०८.१९८३ स्वाक्षरीत
पत्ता : एम -२३१ जीके-२ नवी दिल्ली ११००४८ धरणकार्त्याचे हस्ताक्षर
जारी केल्याचा दिनांक : ०९.१०.२००९ स्वाक्षरीत
वैधता : ०१.०८.२०२२ प्राधिकृत अनुज्ञप्ती अधिकारी

| अ ग ग १ |
|---|
| दस्त क्र ४७०७ /२०११ |
| १४८-१४९ |

## दस्त गोषवारा भाग १

३१.१०.२०११ दुय्यम निबंधक १
१.४८.४६ औरंगाबाद १
दस्त क्र ४७०७/२०११ दस्ताचा प्रकार : करारनामा किंवा त्याचे अभिलेख किंवा करार संक्षेप्लेख

| आक्र | पक्षकाराचे नाव व पत्ता | पक्षकाराचा प्रकार | छायाचित्र | अंगठ्याचा ठसा |
|---|---|---|---|---|
| १ | नाव : औरंगाबाद मनपा तर्फे आयुक्त श्री पुरषोत्तम निवृत्ती भापकर<br>कार्यकारी अभियंता सखाराम धोंडीबा पानझाडे<br>पत्ता : घर / फ्लॅट क्र<br>गल्ली / रस्ता<br>इमारतीचे नाव :<br>इमारत क्र : | लिहून घेणार<br>वय : ४८<br>सही :<br><br>स्वाक्षरीत | | |

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| | पेठ / वसाहत : सिडको<br>शहर / गाव : औरंगाबाद | | | |
| २ | नाव : औरंगाबाद शहर पाणी पुरवठा कंपनी तर्फे<br>पत्ता : घर / फ्लॅट क्र<br>गल्ली / रस्ता<br>इमारतीचे नाव :<br>इमारत क्र :<br>पेठ / वसाहत : २०६ मार्तंड इमारत<br>शहर / गाव : अॅनी बेझंट मार्ग | लिहून घेणार<br>वय : २८<br>सही :<br><br>स्वाक्षरीत | | |

| अ ग ग १ |
|---|
| दस्त क्र ४७०७/२०११ |
| १४९-१४९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | नाव : सी व्यंकटरमणा<br>पत्ता : घर / फ्लॅट क्र<br>गल्ली / रस्ता<br>इमारतीचे नाव :<br>इमारत क्र : ५१३/अ पाचवा मजला कोहिनूर सिटी<br>पेठ / वसाहत : एल बी एस मार्ग कुर्ला<br>शहर / गाव : मुंबई | लिहून घेणार<br>वय : ४९<br>सही :<br><br>स्वाक्षरीत | | |

## दस्त गोषवारा भाग २

दस्त क्र [अगग१ -४७०७-२०११] चा गोषवारा
बाजार मूल्य १ भरलेले मुद्रांक शुल्क – ५०००००

पावती क्र ४९५२ दि. ३१.१०.२०११
पावतीचे वर्णन

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद

सहदुय्यम
निबंधक क्र १
औरंगाबाद
यांची मुद्रा

| अ ग ग १ | | |
|---|---|---|
| ४७०७ | १ | १४९ |
| २०११ | | |



दस्त हजार केल्याचा दि – ३१.१०.२०११ ०१.२९

निष्पदानाचा दिनांक – ३१.१०.२०११

दस्त हजर करणाराची सही : स्वाक्षरीत

दस्ताचा प्रकार : ४८) करारनामा किंवा कराराचा अभिलेख

शिक्का क्र १ ची वेळ : (सादरीकरण ३१.१०.२०११ ०१.२९ दु

शिक्का क्र २ ची वेळ : फी ३१.१०.२०११ १.४० दु

शिक्का क्र ३ ची वेळ : कबुली ३१.१०.११ १.४० दु

शिक्का क्र ४ ची वेळ : ओळख ३१.१०.२०१ १.४७ दु

महानगरपालिका औरंगाबाद तर्फे कार्यकारी अभियंता श्री सखाराम धोंडीबा पानझाडे

३००००.०० नोंदणी फी

२९८०.०० नक्कल (अ. ११(१) पृष्ठांकनाची रुजवात (अ-१२ ) छायाचित्र (अ-१३) एकत्रित फी

३२९८०.०० एकूण

दस्त नोंद केल्याचा दि. ३१.१०.२०११ १.४८ दु

---

ओळख : खालील इसम असे निवेदित करतात की ते दस्तऐवज करून देणाऱ्यांना व्यक्तिशः ओळखतात व त्यांची ओळख पटवितात

स्वाक्षरीत

नाव : जायेभाये सूर्यकांत सुभानराव
पत्ता : घर / फ्लॅट क्र
गल्ली / रस्ता
इमारतीचे नाव :
इमारत क्र :
पेठ / वसाहत : पुंडलिकनगर
शहर / गाव : औरंगाबाद

स्वाक्षरीत

नाव : सिद्ध जगदीश कन्हैयालाल
पत्ता : घर / फ्लॅट क्र
गल्ली / रस्ता
इमारतीचे नाव :
इमारत क्र :
पेठ / वसाहत : धावणी मोहल्ला
शहर / गाव : औरंगाबाद

स्वाक्षरीत
दुय्यम निबंधक
औरंगाबाद १

१ले बुकचे ४७०७ नंबरी नोंदला. दि. ३१.१०.२०११
प्रमाणित करण्यात येते की या दस्तामध्ये एकूण १४९ पाने आहेत.

औरंगाबाद शहर पाणी सुविधा कंपनी मर्यादित करिता

सही /-
प्राधिकृत हस्ताक्षरकर्ता

सही /-
आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद